साहित्य संमेलन ▪ मराठी भाषा ▪ व्यवसाय मार्गदर्शन

फेब्रुवारी २०१८/पाने ६०/किंमत ₹१०

# लोकराज्य



विंध्याद्रीपासौंनि दक्षिण दिशेसी । कृष्णानदीपासौंनि उत्तरेसी
झाडीमंडळापासौंनि पश्चिमेसी । महाराष्ट्र बौलिजे...

–डिंभ कृष्णमुनि (महानुभाव कवी)



# सर्वात्मका शिवसुंदरा

सर्वात्मका शिवसुंदरा स्वीकार या अभिवादना
तिमिरातुनी तेजाकडे प्रभू आमुच्या ने जीवना ।।धृ।।

सुमनांत तू, गगनांत तू
ताऱ्यांमध्ये फुलतोस तू
सद्धर्म जे जगतामध्ये
सर्वांत त्या वसतोस तू
चोहीकडे रूपे तुझी जाणीव ही माझ्या मना ।।१।।

श्रमतोस तू शेतामध्ये
तू राबसी श्रमिकांसवे
जे रंजले अन गांजले
पुसतोस त्यांची आसवे
स्वार्थाविना सेवा जिथे तेथे तुझे पद पावना ।।२।।


करुणाकरा करुणा तुझी
असता मला भय कोठले ?
मार्गावरी पुढती सदा
पाहीन मी तव पाऊले
सृजनत्व या हृदयामध्ये नित जागवी भीतीविना ।।३।।

– कुसुमाग्रज

२७ फेब्रुवारी हा कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस. हा दिवस 'मराठी भाषा दिवस' म्हणून साजरा केला जातो. त्यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन...

# अंतरंग

### शारदादेवीची यात्रा ६




मराठी साहित्य संमेलनात मराठी भाषा, साहित्य आणि विचारांबाबत मौलिक अशी मेजवानी साहित्यरसिकांना मिळते. मराठी साहित्य जगतास दिशा दाखवणारे व विचार देणारे अध्यक्षीय भाषण, हे या संमेलनाचे प्रमुख वैशिष्ट्य राहिले आहे. संमेलनातील विविध नावीन्यपूर्ण कार्यक्रमांद्वारे मानवी जीवनमूल्यांचे व विचारांचे पोषण घडते. पुस्तकांचे अफाट विश्व ग्रंथप्रदर्शन व पुस्तकांच्या दुकानांमधून उलगडत जाते.

### सारे काही मराठीसाठी... १२



मराठी भाषा विभागांतर्गत भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ व राज्य मराठी विकास संस्था अशी ४ कार्यालये कार्यरत आहेत. या चार कार्यालयांकडून मराठी भाषा आणि साहित्य यांच्या संवर्धनासाठी विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. या सर्व उपक्रमांना गती देण्यात आली आहे.

### प्रबोधनाचे शिल्पकार १०



नवभारताच्या निर्मितीत महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे योगदान अतिशय मोलाचे आहे. त्यांच्या कार्याला उजाळा देणाऱ्या एकूण बारा खंडांचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होत आहे.

### यशोशिखरावर कसे जाल? २०



कशामध्ये आपला जीव रमतो, काय समोर आल्यानंतर आपल्याला सहजपणाने समजते ते आपले क्षेत्र. आपली बुद्धी ज्या क्षेत्रातच चालते. त्या क्षेत्रातच करिअर करायला हवे. त्यानुसार स्वत:ला ओळखून करिअरची दिशा ठरवावी.

### दर्जेदार संस्था, उत्कृष्ट संधी २७



भारत सरकारने विविध ज्ञानशाखेत शिक्षण–प्रशिक्षण देणाऱ्या आणि संशोधनास वाव देणाऱ्या संस्थांची स्थापना केली आहे. या सर्व संस्था दर्जेदार आणि जागतिक कीर्तीच्या आहेत. या संस्थांमध्ये गेल्या काही वर्षांमध्ये अतिशय अल्प संख्येने मराठी मुलांची निवड होते. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांनासुद्धा या संस्थांच्या प्रवेश प्रक्रियेविषयी विशेष कल्पना नसते.


शारदादेवीची यात्रा ६
आतापर्यंतची साहित्य संमेलने ८
प्रबोधनाचे शिल्पकार १०
सारे काही मराठीसाठी... १२
अशी करावी अक्षरसाधना १४
मराठी आणि करिअर संधी... १७
मराठी भाषेच्या रुपातील सांस्कृतिक वारशाचे जतन आणि संवर्धन १८
यशोशिखरावर कसे जाल? २०
कार्पोरेट प्रशासनाचे सूत्रधार २५
दर्जेदार संस्था, सर्वोत्कृष्ट शिक्षण २७
समाज माध्यमांची शक्ती ३४
कलेचा आनंद आणि आनंदाची कला ३६
डॉ. आंबेडकर थॉट: नवी संधी ३८
पुरातत्त्वशास्त्र : शोध मानववंशाचा ४०
कौशल्यातून उन्नतीकडे... ४२
स्वप्नांना शिष्यवृत्तीचे बळ ४६
यशदामध्ये नागरी सेवा
परीक्षेची तयारी ५३
प्रशासकीय सेवेचा राजमार्ग ५४
मॅग्नेटिक महाराष्ट्र गुंतवणूक परिषद २०१८ ५६
येथे कर माझे जुळती... ५८

वर्ष ६९ वे | अंक ८ | फेब्रुवारी २०१८

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- संपादक मंडळ — अजय अंबेकर, शिवाजी मानकर
- संपादक — सुरेश वांदिले
- उपसंपादक — गजानन पाटील, राजाराम देवकर
- प्रशासन अधिकारी — मीनल जोगळेकर
- वितरण अधिकारी — मंगेश वरकड
- वितरण सहायक — अश्विनी पुजारी
- साहाय्य — भारती वाघ
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, धनश्री पाठारे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा. लि. महापे, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई–४०० ०३२.
Email : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

वर्गणीदार व तक्रार निवारण: ०२२ – २२८१८३१२
Email : lokvitaran.dgipr@maharashtra.gov.in

ई – लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमतच असेल असे नाही.



# साहित्यनिष्ठेची कसोटी

मनुष्याचा भाषाव्यवहार रोजच्या साध्यासुध्या कामापासून तो अत्युच्च पातळीवरील कलाविकास आणि तत्त्वमीमांसा यांच्यापर्यंत चालू असतो. भाषा ही माणसाच्या सुधारणेची व संस्कृतीची वाहक आहे. साहित्यिकाचा तर सदोदित भाषेशीच संबंध येतो. म्हणूनच तुकारामांनी 'शब्दचि आमुच्या जीवाचें जीवन' असे म्हटले आहे. म्हणून प्रत्येक लेखकाने आपल्या भाषामाध्यमाचे पावित्र्य व प्रतिष्ठा सांभाळली पाहिजे.

'लोभ जीभेचा जळू दे,
जे थिजूं विद्वेष सारा,
द्रौपदीचे सत्त्व माझ्या
लाभुं दे भाषाशरीरा
जाऊं दे कार्पण्य 'मी'चें,
दे धरू सर्वांस पोटी,
भावनेला येऊं दे गा
शास्त्र–काट्याची कसोटी'

मराठीतील एक श्रेष्ठ कवी व सौंदर्यमीमांसक मर्ढेकर यांचा हा साहित्यविषयक दृष्टिकोन सदैव ध्यानात ठेवण्याजोगा आहे. विचाराला भावनेची जोड हवी, आणि भावनेला विचाराचे पाठबळ हवे. आपण जे अनुभवले, आपल्याला ज्याची मनोमन प्रचिती आली, त्याला छेद जाईल असा कोणताच सूर आपल्या साहित्यातून निघू नये म्हणून प्रत्येक लेखकाने दक्षता घेतली पाहिजे. आपल्या अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्यावर त्याने कुठलेही अंतर्गत व बाह्य दडपण येऊ देता कामा नये. त्यासाठी पडेल ती किंमत देण्याची तयारी हीच लेखकाच्या साहित्यनिष्ठेची खरी कसोटी म्हटली पाहिजे.

**– गं.बा.सरदार**

**(बार्शी येथे १९८० साली झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील अध्यक्षीय भाषणातून)**

# जिवंत लिखाण

भिन्न परिसरातील लेखकांनीही एक साहित्यिक पथ्य पाळणे अवश्यक आहे हेही या संबंधात नमूद केले पाहिजे. त्यांनी केवळ महाराष्ट्रातील लेखनाच्या नकला करण्याचा प्रयत्न करू नये. ज्या भूमीत आपण राहतो, वावरतो, त्या भूमीचे वैशिष्टय आत्मसात करून एक आगळे मराठीपण उभे करण्याचा त्यांनी ध्यास घेतला पाहिजे. मराठी भाषा आणि साहित्य दोन्ही त्यामुळे अधिक समृध्द होतील. पूर्वी निजामाच्या राजवटीतील बी. रघुनाथ यांनी जे केले आणि आज हैदराबादेतील ए. वि. जोशी जे करीत आहेत, किंवा पूर्वी माळव्यातील भालचंद्र लोवलेकरांनी जे केले आणि आज धारवाडचे जी. ए. कुलकर्णी जे करीत आहेत त्यांचा आदर्श या लेखकांनी पुढे ठेवला पाहिजे. अजमेरात राहून शिवाजीपार्की किंवा सातारी गोष्ट लिहून भागणार नाही. ती अजमेरची, तिच्या परिसराची गोष्ट झाली पाहिजे. तिकडच्या भूमीत रुजून, बहरलेली गोष्ट झाली पाहिजे. हे असले जिवंत लिखाण मग सर्वांनाच हवेहवेसे होईल.

**– पु. शि.रेगे (वर्धा – १९६९, अध्यक्षीय भाषणातून)**

# उत्सव वैभवशाली परंपरेचा....



मंत्री, मराठी भाषा आणि
शालेय, उच्च व तंत्र शिक्षण

या महिन्यात बडोदा येथे ९१वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होत आहे. याच महिन्यात २७ फेब्रुवारीला ज्ञानपीठ पुरस्कार विजेते ज्येष्ठ साहित्यिक कुसुमाग्रजांच्या जयंतीनिमित्त मराठी भाषा दिवस साजरा केला जाईल. यंदा हा सुवर्णयोग साधून आला आहे. मराठी साहित्य संमेलनाची मोठी तेजस्वी परंपरा आहे. भारतात इतर कोणत्याही भाषांमध्ये असे साहित्य संमेलन घेतले जात नाही. महाराष्ट्राचे हे सांस्कृतिक वैभव वैशिष्ट्यपूर्ण आहे. या साहित्य संमेलनाला जवळपास शंभर वर्षांची परंपरा आहे. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी या संमेलनास शारदादेवीचा फिरता उत्सव असे संबोधले आहे. हा उत्सव वर्षानुवर्षे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी तितक्याच उत्साहाने साजरा होत असतो. मराठी साहित्यप्रेमी रसिक या संमेलनास हजारोंच्या संख्येन उपस्थित राहतात. या संमेलनामध्ये विविध विषयांवरील परिसंवाद होतात. साहित्यविषयक चर्चा घडते. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांचे भाषण हे नवा विचार देणारे असते. त्याची चर्चा वर्षभर मराठी जगतात सुरू राहते. या संमेलनात नवेजुने ज्येष्ठश्रेष्ठ साहित्यिक उपस्थित राहतात. सरस्वतीच्या या साधकांना प्रत्यक्ष भेटण्याची संधी हा अनेक रसिकांसाठी आयुष्यभराचा ठेवा ठरतो. या संमेलनातील अत्यंत महत्त्वाची बाब म्हणजे येथे होणारा ग्रंथ व्यवहार. लाखो रुपयांची पुस्तके या संमेलनात दरवर्षी विकली जातात. रसिक वाचक त्याच्या आवडीनिवडीप्रमाणे पुस्तकांची खरेदी करतो. त्यात सर्व प्रकारातील साहित्याचा समावेश असतो. ग्रंथप्रसारासाठी साहित्य संमेलनांनी लावलेला हातभार ही समस्त मराठी जणांसाठी अभिमानास्पद बाब आहे.



या संमेलनानिमित्त 'लोकराज्य'च्या या अंकात या संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांचा विशेष लेख, संमेलनानिमित्त शासनाच्या वतीने प्रकाशित होत असलेल्या महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या जीवनचरित्र खंडाचा परिचय व इतर लेख आम्ही प्रकाशित करत आहोत. मराठी भाषेसाठी राज्य सरकार करत असलेल्या विविध उपक्रमांची विस्तृत माहिती आम्ही या अंकात समाविष्ट केली आहे.

या अंकात आम्ही पालक व विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरेल, अशा विविध अभ्यासक्रमांची माहिती दिली आहे. पुढील महिन्यात १२वीची परीक्षा होत आहे. त्यानंतर मुले व त्यांचे पालक व्यवसाय अभ्यासक्रमांचे विविध पर्याय शोधू लागतात. अभियांत्रिकी आणि वैद्यकीय शिक्षणाशिवाय इतरही आणखी अनेक पर्यायसुद्धा आहेत. आपली आवडनिवड ओळखून असे पर्याय स्वीकारले तर जीवनात उत्तम यश मिळवता येऊ शकते. या अंकात माजी सनदी अधिकारी आणि व्यवसाय अभ्यासक्रमासंदर्भात सातत्याने मार्गदर्शन करणारे अविनाश धर्माधिकारी यांचा विशेष लेख, सर्व विद्यार्थी व पालकांना नवा विचार करायला लावणारा आहे. भारत सरकारच्या वैशिष्ट्यपूर्ण १५ दर्जेदार शैक्षणिक संस्थांची माहितीसुद्धा सर्व विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरणारी आहे. लेखन कसे करावे, मुलाखतीची तयारी, व्यवसाय अभ्यासक्रम, नागरीसेवा परीक्षा प्रशिक्षणासाठी यशदा आणि राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्थेतील प्रवेश प्रकिया हे लेखसुद्धा वाचकांना उपयुक्त ठरतील.


हा अंक आपणास आवडेल, याची खात्री आहे.

**विनोद तावडे**
**(अतिथी संपादक)**


**मराठी साहित्य संमेलनात मराठी भाषा, साहित्य आणि विचारांबाबत मौलिक अशी मेजवानी साहित्यरसिकांना मिळते. मराठी साहित्य जगतास दिशा दाखवणारे व विचार देणारे अध्यक्षीय भाषण, हे या संमेलनाचे प्रमुख वैशिष्ट्य राहिले आहे. संमेलनातील विविध नावीन्यपूर्ण कार्यक्रमांद्वारे मानवी जीवनमूल्यांचे व विचारांचे पोषण घडते. पुस्तकांचे अफाट विश्व ग्रंथप्रदर्शन व पुस्तकांच्या लावलेल्या स्टॉलमधून उलगडत जाते. साहित्य हे जगण्यासाठी महत्त्वाचे सांस्कृतिक मूल्य आहे याची जाणीव अशा संमेलनातून होते. समाज अधिक सुसंस्कृत, विचारी व विज्ञाननिष्ठ, विवेकवाद आणि मानवतावाद या त्रिसूत्रीने आधुनिक होण्यास या साहित्य संमेलनामुळे मदत मिळते.**

# शारदादेवीची यात्रा

**लक्ष्मीकांत देशमुख**
(अध्यक्ष, ९१वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन)



दरवर्षी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्थळ निश्चित झाले, निवडणूका जाहीर झाल्या व अध्यक्ष निवडला गेला की; संमेलन संपन्न होईपर्यंतच्या कालखंडात एक प्रश्न अलीकडे हमखास विचारला जातो किंवा उपस्थित होतो. तो म्हणजे अशा संमेलनाने काय साध्य होते? या प्रश्नात काही गर्भित सूचना असते, ते म्हणजे हा रिकामटेकड्या लेखक-वाचकांचा निरर्थक फल निष्पतीशून्य उद्योग आहे. पुन्हा ही संमेलने दिखाऊ, उरूस-जत्रे सारखी असतात आणि तेथे साहित्यापेक्षा, भोजनावळी, मनोरंजनाचे कार्यक्रम यावर अधिक चर्चा होते, अशी टिंगलवजा टीकाही आता वार्षिक आवर्तन स्वरूप झाली आहे. परंतु साहित्य संमेलनाचे महत्त्व - खासकरून सांस्कृतिक महत्त्वाबाबत विवेचन करण्यापूर्वी या टीकाकारांना मला हे सांगावेसे वाटते की, जी गोष्ट कालबाह्य व निरुपयोगी होते, ती कालौघात टिकत नाही. येथे तर साहित्य संमेलनाची शतकी व वर्धिष्णू स्वरूपाची परंपरा आहे. त्यामुळे ही संमेलने लेखक-वाचक व एकूण समाजास काही एक मूल्यविचार देत असणारच, हे समजून घेतले पाहिजे, तरच साहित्य संमेलनाचे सांस्कृतिक महत्त्व समजण्यास मदत होईल!



### देदीप्यमान परंपरा

मलाही बडोदा अर्थात अखिल भारतीय साहित्य संमेलनाचा अध्यक्ष झाल्यावर हा प्रश्न अनेकदा विचारला गेला, तेव्हा मी एकच उत्तर दिले ते म्हणजे शतकाची उज्ज्वल परंपरा असणारा हा शारदोत्सव आहे व अशी देदीप्यमान परंपरा इतर कोणत्याही भाषा व साहित्याची नाही. न्या. महादेव गोविंद रानडेंनी १८७८ साली सर्वप्रथम मराठी ग्रंथकारांचे संमेलन भरवले. पुढे त्याला महाराष्ट्र किंवा मराठी साहित्य संमेलन संबोधले जाऊ लागले. हा केवळ नावाचा बदल नव्हता, तर व्याप्ती, उद्देश आणि व्यापकता या दृष्टीनेही संमेलन बदलत गेले ही महत्त्वाची बाब लक्षात घेण्याजोगी आहे. पुढे तिला अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचे रूप बृहनमहाराष्ट्रातील साहित्य परिषदांना संलग्नत्व दिल्यामुळे प्राप्त झाले. २०१८चे बडोदे संमेलन त्याचे एक ताजे उदाहरण म्हणून पाहता येईल.

### वार्षिक व्रत

१९२१ साली बडोदे येथे दहावे संमेलन भरले होते व त्याचे अध्यक्ष होते साहित्यसम्राट न. चिं. केळकर. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात, 'साहित्य संमेलन हा सरस्वती देवीच्या क्रीडांगणातला उत्सव आहे' असे एक समर्पक विधान केले होते. त्यांनी आपल्या भाषणाचा समारोप करताना वाङ्मय ग्रंथकारांना कुलपरंपरा किंवा वतन नसले



तरी नि:स्वार्थी बुद्धीने परोपकारच त्यांच्या हातून घडत असतो. त्यांनी मुद्दाम वाङ्मयाची उपासना नित्यनेमाने चालू ठेवली पाहिजे. साहित्य संमेलन हे या उपासनेतले एक वार्षिक व्रत आहे व त्यात खंड पडू देता कामा नये,' असे प्रतिपादन करत वार्षिक साहित्य संमेलनाचे महत्त्व अधोरेखित केले होते. १९३२ साली बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनीही कोल्हापूरच्या संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात अशीच भावना व्यक्त केली होती. 'शारदादेवीच्या या फिरत्या यात्रेला हिंदुस्थानातील सर्व भागातून भक्त येतात. पंढरीचा वारकरी जसा वर्षातून एकदाच सामुदायिक भक्तीकरिता वारीला जातो. एरव्ही पण भक्ती एकटा बसून करतो, तसेच आपणही सर्व शारदेची उपासना करतो.'

### सांस्कृतिक महत्त्व

या दोन संमेलन अध्यक्षांचा दाखला देत मराठी साहित्य संमेलनाच्या अखंड चालत आलेल्या परंपरेचे वाङ्मयीन व सांस्कृतिक महत्त्व सांगायचे आहे, त्याचे पहिले सूत्र हे आहे की, हे वार्षिक मराठी साहित्य संमेलन हा शारदोत्सव आहे. म्हणजेच लेखक–वाचक–प्रकाशन आणि मराठी भाषाप्रेमी रसिकांचा उत्सवी तरीही निष्ठेने भरवला जाणारा मेळावा आहे. पण तिचा गाभा साहित्यप्रेम आणि वाङ्मयीन संस्कृतीचा उद्घोष हा आहे.

भाषा आणि भाषेच्या माध्यमातून विकसित झालेली संस्कृती हीच माणसाच्या अस्तित्वाची खूण आहे, त्याची खास अशी ओळख आहे व असते. महाराष्ट्र आणि व्यापक अर्थाने सीमा नसलेला बृहन महाराष्ट्र हे आमचे राज्य आहे. अर्थातच हे मराठी भाषिक राज्य आहे. आपली संस्कृती म्हणूनच मराठी संस्कृती आहे. ती भारताच्या इतर भाषिक राज्य व संस्कृतीपेक्षा वेगळी आहे. तीच आपल्याला आपले मराठीपण देते. हे मराठीपण जपणे म्हणजेच मराठी संस्कृतीची जपणूक असते. हे संस्कृती रक्षणाचे काम प्रामुख्याने भाषेच्या माध्यमातून होते. त्याचे मुख्य अस्त्र निर्विवादपणे साहित्य आहे. म्हणून त्या उद्देशाने भरणारे गाव पातळीवरचे छोटे एक दिवसीय संमेलन असो की अखिल भारतीय स्वरूपाचे असो, त्याचे एक वाङ्मयीन व सांस्कृतिक महत्त्व आहे.

### चिरकाल टिकणारा अविष्कार

साहित्य हा मानवी प्रज्ञा आणि संस्कृतीचा सर्वाधिक महत्त्वाचा व चिरकाल टिकणारा आविष्कार आहे. कारण माणसाला दैनिक व नैसर्गिक भुकांची पूर्ती झाल्यानंतर (किंवा त्यांचा अभाव असतानाही) त्याचे मन, बुद्धी व आत्म्याला संपन्न, संतुष्ट करणारे काहीतरी लागते. त्यामध्ये कलेसोबत साहित्य हे प्रमुख आहे. त्यातही साहित्य हे चौसष्ट कलेला सामावून घेणारे व तरीही दशांगुळे उरणारे आहे. म्हणून मानवी विकासाच्या परिभाषेत वाङ्मय आणि संस्कृतीचा विकास याची परिगणना झाली पाहिजे असे माझे मत आहे. कारण माणसाच्या




जगण्याला अनेक पदर असतात. त्याचे मानवी विकार आणि जगण्यासाठी करावा लागणारा संघर्ष, त्याच्या वाट्याला येणारे दु:ख, वेदना, धर्म समाजपरंपरेतून उद्भवलेले प्रश्न याचा सामना करताना जे अनुभव येतात, तेच तर ललित साहित्यात शब्दबद्ध केले जाते. ते माणसाला मानवी भावभावनांचा आरसा दाखवते. जगात सर्वत्र मानवी भावना एकसारख्याच आहेत. म्हणून माणूस सहजतेने साहित्याच्या माध्यमातून मानवतेचे संस्कार ग्रहण करतो. ती साहित्याची ताकद आहे. मानवी स्खलनशीलता व विकार दाखवीत त्याला उच्च, आदर्श विश्व संस्कृतीकडे वाटचाल करण्याची प्रेरणा साहित्य देते व दिशा दाखवते. मुख्य म्हणजे साहित्य माणसाला अधिक मानवी, उदार व विशाल बनवते. म्हणूनच पुस्तकांना महापुरुषांनी सर्वात जवळचा मित्र मानला आहे.




### आधुनिक जगाची उभारणी

साहित्य हे आधुनिक जगाच्या उभारणीसाठी मोलाची मदत करतात. विज्ञाननिष्ठता, विवेकवाद आणि मानवतावाद ही आधुनिक जगाच्या निर्मितीची तीन घटकमूल्ये आहेत. चौकस बुद्धी, प्रत्येक गोष्ट तपासून स्वीकारणे, प्रश्न विचारणे व तर्काची कसोटी लावून प्रत्येक गोष्टीचा – मग ती परंपरा असो वा विचार त्याचा स्वीकार करणे म्हणजे विज्ञाननिष्ठता. प्रत्येक माणसाला चांगले काय–वाईट काय, नैतिक काय–अनैतिक काय यांचे उपजत ज्ञान असते. ते अधिक धारदार करत इतर माणसे व संबंध चराचराला त्रास होणार नाही, असे वागणे–बोलणे म्हणजे विवेकवाद होय. जगा व जगू द्या, व प्रेम, दया, करुणा व सहानुभुतीने परस्परांशी वागणे म्हणजे मानवतावाद होय. या तिन्ही बाबींचा अंगीकार करण्यासाठी व त्यानुसार वागण्यासाठी माणसाला साहित्य/पुस्तके सर्वात अधिक उपयोगी ठरतात. म्हणून साहित्य हे मानवी जीवनाचे सर्वात महत्त्वाचे सांस्कृतिक मूल्य आणि उपलब्धी आहे.

मराठीचे एक विचारवंत लेखक डॉ. पु.ग. सहस्त्रबुद्धे यांच्या एका निबंधाचा येथे संदर्भ देत मला असे प्रतिपादन करायचे आहे की, मानवी जीवनाचे अधिष्ठान राजसत्तेऐवजी ग्रंथसत्ता असले पाहिजे.

ग्रंथसत्ता म्हणजे विचारांची सत्ता. माणसापेक्षा विचार मोठा आणि हा विचार ग्रंथ–साहित्य देते, म्हणून साहित्य हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक असायला हवा. म्हणून या अर्थाने देशात व समाजात ग्रंथसत्ता प्रथापित व्हायला हवी!

### विचारांचे आदानप्रदान

साहित्य निर्मिती ही एकांती करायची साधना असली तरी ती पुस्तकांच्या माध्यमातून लोकासमोर येते. त्यामुळे लिहिताना वाचकांचा विचार नसला तरी तो ग्रंथबद्ध झाल्यावर आपणासारखा 'समधर्म भेटावा' ही भावना तिच्या निर्माल्याच्या मनात निर्माण होते. वाचक तर बहुसंख्य असतात, त्यांच्याशी संपर्क–संवाद करण्यासाठी फोन, पत्रे, ई–मेल व व्हॉटसअप आदी साधने असली तरी प्रत्यक्ष वाचक भेटणे व संवाद साधीत विचारांचे आदानप्रदान करणे ही लेखक–कलावंताची नैसर्गिक भूक असते. अशीच भावना वाचकांची सुद्धा असते. ज्यांचे आपण साहित्य वाचले आहे व एक नवे विश्व मनात कल्पनेने अनुभवले आहे किंवा वैचारिक साहित्यात नवा विचार मिळाला आहे त्याला प्रत्यक्ष भेटणे व संवाद करणे वाचकांनाही हवहवसे वाटते. साहित्य संमेलन हे असं परस्पर भेटीसाठी उत्सुक व संवाद साधण्यासाठी आतुर लेखक–वाचकासाठी एक चांगले माध्यम आहे. शतकाहून अधिक काळ नियमितपणे भरणारे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन त्याचे एक उत्तम उदाहरण आहे.

### विचार देणारे अध्यक्षीय भाषण

या संमेलनात मराठी भाषा, साहित्य आणि विचारांबाबत मौलिक असे सहभागी रसिकांना मिळते. या संमेलनाची एक चांगली परंपरा म्हणजे मराठी जगतास दिशा दाखवणारे व विचार देणारे अध्यक्षीय भाषण. याखेरीज उद्घाटनपर भाषण, प्रगट मुलाखत, परिसंवाद आणि कवी–कथा संमेलनाद्वारे मानवी जीवनमूल्यांचे व विचारांचे पोषण सहजतेने घडत जाते. पुन्हा पुस्तकांचे अफाट विश्व ग्रंथप्रदर्शन व पुस्तकांच्या लावलेल्या स्टॉलमधून उलगडत जाते. मुख्य म्हणजे साहित्य हे जगण्यासाठी महत्त्वाचे सांस्कृतिक मूल्य आहे याची जाणीव अशा संमेलनातून होते. संमेलनाचा अध्यक्षही केवळ सेलेब्रिटी नाही तर त्यासोबत तो समाजासाठी सांस्कृतिक नेता असतो ही भावनाही दृढमूल होते. ग्रंथसत्ता म्हणजेच विचारसत्ता, समाजात प्रस्थापित करायची असेल तर लेखक हा समाजाचा नेता बनला पाहिजे. संमेलन अध्यक्षांकडे मराठी जगत त्या दृष्टीने निश्चितच पाहत असते. यातून ग्रंथसत्ता प्रस्थापित होण्यास बळ मिळते आणि समाज अधिक सुसंस्कृत, विचारी व विज्ञाननिष्ठ, विवेकवाद आणि मानवतावाद या त्रिसूत्रीने आधुनिक होण्यास मदत मिळते. हेच साहित्य संमेलनाचे उद्दिष्ट आहे आणि सांस्कृतिक महत्त्वही!

**निवृत्त आयएएस अधिकारी, संपर्क: ०९३२५२९७५०९**

# आतापर्यंतची साहित्य संमेलने

| वर्ष | ठिकाण | अध्यक्षांचे नाव |
|---|---|---|
| १८७८ | पुणे | न्या. महादेव गोविंद रानडे |
| १८८५ | पुणे | कृष्णशास्त्री राजवाडे |
| १९०५ | सातारा | रघुनाथ पांडुरंग करंदीकर |
| १९०६ | पुणे | वासुदेव गोविंद कानिटकर |
| १९०७ | पुणे | विष्णू मोरेश्वर महाजनी |
| १९०८ | पुणे | चिंतापण विनायक वैद्य |
| १९०९ | बडोदे | कान्होबा रामछोडदास कीर्तिकर |
| १९१२ | अकोला | हरी नारायण आपटे |
| १९१५ | मुंबई | गंगाधर पटवर्धन |
| १९१७ | इंदूर | गणेश जनार्दन आगाशे |
| १९२१ | बडोदे | नरसिंह चिंतामण केळकर |
| १९२६ | मुंबई | माधव विनायक किबे |
| १९२७ | पुणे | श्रीपाद कृष्ण कोल्हटकर |
| १९२८ | ग्वाल्हेर | माधव श्रीहरी अणे |
| १९२९ | बेळगाव | शिवराम महादेव परांजपे |
| १९३० | मडगाव | वामन मल्हार जोशी |
| १९३१ | हैदराबाद | श्रीधर व्यंकटेश केतकर |
| १९३२ | कोल्हापूर | सयाजीराव गायकवाड |
| १९३३ | नागपूर | कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर |
| १९३४ | बडोदे | नारायण गोविंद चापेकर |
| १९३५ | इंदूर | भवानराव श्रीनिवासराव पंतप्रतिनिधी |
| १९३६ | जळगाव | माधव जुलियन |
| १९३८ | मुंबई | विनायक दामोदर सावरकर |
| १९३९ | अहमदनगर | दत्तो वामन पोतदार |
| १९४० | रत्नागिरी | नारायण सीताराम फडके |
| १९४१ | सोलापूर | विष्णू सखाराम खांडेकर |
| १९४२ | नाशिक | प्रल्हाद केशव अत्रे |

# साहित्य

| | | |
|---|---|---|
| १९४३ | सांगली | श्रीपाद महादेव माटे |
| १९४४ | धुळे | भार्गवराम विठ्ठल वरेरकर |
| १९४६ | बेळगाव | गजानन त्र्यंबक माडखोलकर |
| १९४७ | हैदराबाद | नरहर रघुनाथ फाटक |
| १९४९ | पुणे | शंकर दत्तात्रय जावडेकर |
| १९५० | मुंबई | यशवंत दिनकर पेंढारकर |
| १९५१ | कारवार | अनंत काकबा प्रियोळकर |
| १९५२ | अमळनेर | कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी |
| १९५३ | अमदाबाद | विठ्ठल दत्तात्रय घाटे |
| १९५४ | दिल्ली | लक्ष्मणशास्त्री बाळजी जोशी |
| १९५५ | पंढरपूर | शंकर दामोदर पेंडसे |
| १९५७ | औरंगाबाद | अनंत काणेकर |
| १९५८ | मालवण | अनिल |
| १९५९ | मिरज | श्रीकृष्ण केशव क्षीरसागर |
| १९६० | ठाणे | रामचंद्र श्रीपाद जोग |
| १९६१ | ग्वाल्हेर | कुसुमावती देशपांडे |
| १९६२ | सातारा | नरहर विष्णू गाडगीळ |
| १९६४ | मडगाव | वि.वा.शिरवाडकर |
| १९६५ | सातारा | वामन लक्ष्मण कुलकर्णी |
| १९६७ | भोपाळ | विष्णू भिकाजी कोलते |
| १९६९ | वर्धा | पु.शि.रेगे |
| १९७३ | यवतमाळ | गजानन दिगंबर माडगूळकर |
| १९७४ | इचलकरंजी | पु.ल.देशपांडे |
| १९७५ | कराड | दुर्गा भागवत |
| १९७७ | पुणे | पु.भा.भावे |
| १९७९ | चंद्रपूर | वामन कृष्ण चोरघडे |
| १९८० | बार्शी | गं. बा. सरदार |
| १९८१ फेब्रु. | अकोला | गो.नी.दांडेकर |
| १९८१ डिसें. | रायपूर | गंगाधर गाडगीळ |
| १९८३ | अंबेजोगाई | व्यंकटेश दिगंबर माडगूळकर |
| १९८४ | जळगाव | शंकर रामचंद्र खरात |
| १९८५ | नांदेड | शंकर बाबाजी पाटील |
| १९८८ | मुंबई | विश्राम बेडेकर |
| १९८८ | ठाणे | वसंत कानेटकर |
| १९८९ | अमरावती | केशव जगन्नाथ पुरोहित |


| | | |
|---|---|---|
| १९९० जाने. | पुणे | यु.म.पठाण |
| १९९० डिसें. | रत्नागिरी | मधु मंगेश कर्णिक |
| १९९२ | कोल्हापूर | रमेश मंत्री |
| १९९३ | सातारा | विद्याधर गोखले |
| १९९४ | पणजी | राम शेवाळकर |
| १९९५ | परभणी | नारायण सुर्वे |
| १९९६ | आळंदी | शांता शेळके |
| १९९७ | अहमदनगर | ना.स.इनामदार |
| १९९८ | परळी-वैजनाथ | द.मा.मिरासदार |
| १९९९ | मुंबई | वसंत बापट |
| २००० | बेळगाव | य.दि.फडके |
| २००१ | इंदूर | विजया राजाध्यक्ष |
| २००२ | पुणे | राजेन्द्र बनहट्टी |
| २००३ | कराड | सुभाष भेंडे |
| २००४ | औरंगाबाद | रा.ग.जाधव |
| २००५ | नाशिक | केशव मेश्राम |
| २००६ | सोलापूर | मारुती चितमपल्ली |
| २००७ | नागपूर | अरुण साधू |
| २००८ | सांगली | म.द.हातकणंगलेकर |
| २००९ | महाबळेश्वर | आनंद यादव |
| २०१० | पुणे | द.भि.कुलकर्णी |
| २०१० डिसें. | ठाणे | उत्तम कांबळे |
| २०१२ | चंद्रपूर | वसंत आबाजी डहाके |
| २०१३ | चिपळूण (रत्नागिरी) | नागनाथ कोत्तापल्ले |
| २०१४ | सासवड (पुणे) | फ. मुं. शिंदे |
| २०१५ | घुमान (पंजाब) | सदानंद मोरे |
| २०१६ | पिंपरी-चिंचवड (पुणे) | श्रीपाल सबनीस |
| २०१७ | डोंबिवली (ठाणे) | अक्षयकुमार काळे |
| २०१८ | बडोदे (गुजरात) | लक्ष्मीकांत देशमुख |

**नवभारताच्या निर्मितीत महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे योगदान अतिशय मोलाचे आहे. बडोदा संस्थानचे संस्थानिक एवढीच त्यांची ओळख नसून, स्वातंत्र्यपूर्व भारताच्या जडणघडणीत त्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता. स्वातंत्र्यलढ्यातील नेत्यांना त्यांनी कधी उघडपणे तर कधी गुप्तपणे मदत केली. भारताच्या प्रबोधनाचे शिल्पकार म्हणूनही त्यांचे नाव आदराने घेतले जाते. महाराष्ट्र शासनाने विविध दस्तऐवजांचा अभ्यास करून महाराजांच्या चरित्रसाधनांची सिद्धता केली आहे.**

# प्रबोधनाचे शिल्पकार

**डॉ. अशोक राणा**

इतिहासाचार्य राजवाडे यांनी शंभर वर्षांपूर्वी लिहिलेल्या एका लेखात महाराष्ट्रातील कर्तृत्ववान शंभर व्यक्तींची यादी तयार केली होती. त्यात पहिले नाव महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे होते. सामाजिक परिवर्तनाच्या चळवळी त्यांच्या आश्रयाने फोफावल्यात, तशाच धार्मिक व सांस्कृतिक चळवळींनाही त्यांच्या प्रोत्साहनाने उभारी आली. यामागील कारण म्हणजे भारतातील इतर तत्कालीन संस्थानिकांपेक्षा त्यांचे सामर्थ्य अधिक होते. इंग्रजांचा प्रतिनिधी त्यांच्या कारभारावर तसेच त्यांच्या बारीकसारीक हालचालींवर नजर ठेवून असे. परंतु ते सार्वभौम अशा बडोदा संस्थानचे महाराजा होते. त्यामुळे काही निर्णय महाराज स्वतः घेऊ शकत असत.




गुजरातमधील बडोदा संस्थान त्या काळी भारतभरातील संस्थानिकांसाठी एक भरभक्कम आधारकेंद्र होते. त्याला कारण होते महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे उत्तुंग व्यक्तिमत्त्व. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात त्यांचा विसर साऱ्यांनाच पडला. गुजरातमध्ये अनेक संस्थानिक होते. त्यामुळे त्यांच्यापैकी एक अशीच त्यांची संभावना केली गेली. सर्वच बाबतीतील त्यांचे वेगळेपण नाकारले गेले. त्याचबरोबर ते गुजरातमधील संस्थानिक असल्यामुळे त्यांचा महाराष्ट्राशी काही संबंध होता की नाही, याची पुरेशी दखलही महाराष्ट्रात घेतली गेली नाही. वास्तविक त्यांचा जन्म महाराष्ट्राच्या नासिक जिल्ह्यातील कवळाणे या गावात झाला व त्यांच्या बालपणाचा बराच काळही तेथेच व्यतीत झाला होता. बडोदा संस्थानच्या युवराजपदी त्यांची निवड होणे ही एक ऐतिहासिक घटना आहे. एका शेतकऱ्याचा मुलगा राजा होतो ही घटनाच रोमहर्षक आहे. या प्रेरणेतून प्रख्यात साहित्यिक बाबा भांड यांनी महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या कार्याला उजाळा देण्यासाठी लेखन व प्रकाशन केले. त्याचप्रमाणे भारत आणि महाराष्ट्राच्या सरकारला त्यांच्या चरित्र साधनांच्या प्रकाशनाचे महत्त्व पटवून दिले. त्यातून महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण विभागाच्या पुढाकाराने महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती निर्माण झाली .

या समितीचे अध्यक्ष उच्च व तंत्रशिक्षण मंत्री विनोद तावडे तसेच उपाध्यक्षपदी उच्च शिक्षण राज्यमंत्री रवींद्र वायकर हे आहेत. सदस्यपदी उच्च शिक्षण व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव सीताराम कुंटे, निमंत्रक उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने तसेच शासन मुद्रण लेखन सामग्री प्रकाशने विभागाचे संचालक हे सदस्यपदी आहेत. या शासकीय सदस्यांशिवाय डॉ. रमेश वरखेडे, नासिक, सौ. मंदाताई हिंगुराव (बडोदा), डॉ. अशोक राणा (अमरावती), डॉ. एकनाथ पगार (नासिक) यांचा अशासकीय सदस्य म्हणून समावेश असलेल्या या समितीचे सदस्य सचिव बाबा भांड हे आहेत. प्रस्तुत समितीच्या सदस्यांनी बडोदा येथील पुराभिलेखागार आणि सयाजीराव गायकवाड यांच्या राजवाड्यातील दस्तऐवजांचा अभ्यास करून महाराजांच्या चरित्र साधनांची सिद्धता केली आहे.

### प्रकाशनासाठी सिद्ध बारा खंड


प्रस्तुत समितीच्या वतीने महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या कार्याला उजाळा देणाऱ्या एकूण बारा खंडांचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होत आहे. पहिले दोन खंड महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या भाषणाचा संग्रह असलेले असून खंड ३ ते ५ मध्ये त्यांच्या पत्रांचा संग्रह आहे. खंड ६ व ७ मध्ये महाराजांच्या इंग्रजी भाषेतील भाषणांचा संग्रह असून, खंड ८ ते ११ मध्ये त्यांच्या निवडक पत्रांच्या इंग्रजी प्रती समाविष्ट कण्यात आलेल्या आहेत. प्रस्तुत प्रकाशनाचा बारावा खंड ‘महाराजा सयाजीराव: गौरवगाथा युगपुरुषाची’ या शीर्षकाचा आहे.

### महाराजांची भाषणे

इ.स.१८७५ ते १९३८ या काळात अनेक सार्वजनिक समारंभांमध्ये सयाजीरावांनी भाषणे दिली. त्यांच्या ४१ भाषणांचे प्रकाशन सर्वप्रथम १९३६ साली दामोदर सावळाराम यंदे या प्रकाशकाने केले होते. त्याची प्रस्तावना महाराजांच्या त्रिखंडी

चरित्राचे लेखक दाजी नागेश आपटे यांनी लिहिली होती. सयाजीरावांच्या १०८ भाषणांचा दुसरा खंड यंदे यांनी १९३७ मध्ये प्रकाशित केला. १९३८ साली पुणे येथील य. गो. जोशी यांनी तिसऱ्या खंडात ८३ भाषणे प्रकाशित केली.

आता महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण विभागाच्या अंतर्गत नेमलेल्या समितीच्या वतीने प्रकाशनासाठी सिद्ध झालेल्या पहिल्या व दुसऱ्या खंडांमध्ये महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या भाषणांचा संग्रह असून, या दोनही भागांचे संपादन डॉ. रमेश वरखेडे यांनी करून; पहिल्या खंडाच्या पहिल्या भागाला त्यांनी संपादकीय प्रस्तावना लिहिली आहे. तब्बल ११६ पृष्ठे आणि ३ पृष्ठांची संदर्भ यादी असे स्वरूप असलेली ही प्रस्तावना म्हणजे सयाजीरावांच्या भाषणांची चिकित्सा करणारे एक स्वतंत्र पुस्तकच आहे. महाराजांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकून, त्यांच्या राज्यकारभाराचे वेगळेपण सूचित करणाऱ्या काही मुद्द्यांवर चर्चा केली आहे. त्यांच्या राज्यकारभाराची बैठक स्वराज्य निर्माता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राजनीतीवर आधारित होती हे त्यांनी सविस्तरपणे पटवून दिले आहे. योगी अरविंद घोष यांनी सयाजीरावांचे राज्यप्रशासन जपानमधील सामुराइंच्या राज्यपद्धतीसारखे होते असे म्हटले होते. त्यामुळे जपानचा कित्ता महाराजांनी गिरवला होता असे डॉ. वरखेडे म्हणतात.




स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताची राज्यघटना डॉ.बाबासाहेब यांनी लिहिली होती. परंतु तिची पूर्वतयारी महाराजांच्या भाषणांमधून झालेली दिसते, असे डॉ. वरखेडे यांनी सूचित केले आहे. विश्वबंधुत्ववादी राष्ट्रवादाचा पुरस्कार महाराजांनी केला होता. त्यांची अर्थनीती शाश्वत विकासाची होती. भारताच्या दारिद्र्याची कारणमीमांसा करताना भारतीय लोकांचा स्वभाव आणि आचारधर्म हे दारिद्र्याचे मूलकारण आहे, असे महाराज म्हणत असत. शेतीचे अर्थशास्त्र त्यांनी उलगडून दाखवले होते.

ग्रामसुधारणा, नगरसुधारणा, आरोग्य, रेल्वे आणि रस्ते यांचे विकासकार्यातील महत्त्व, व्यापार–उद्योगाच्या अभिवृद्धीसाठी करावयाच्या उपाययोजना, बडोदा बँकेची स्थापना, सहकारी चळवळ, सामाजिक न्याय व विकासकेंद्री करप्रणाली, सक्तीचे प्राथमिक शिक्षण, अंत्यजांसाठी शिक्षण, मूल्यशिक्षण, औद्योगिक शिक्षण, स्त्रीशिक्षण, शारीरिक शिक्षण, वसतिगृहाचे महत्त्व, धर्म मीमांसा, मुसलमानांबद्दलची आपुलकी, धर्म आणि संस्कृती, धर्म आणि राजकारण, सर्वधर्मसमभाव, धर्मांतराविषयीचे विचार, धार्मिक आणि सामाजिक सुधारणा, ग्रंथालय चळवळ, कला व संस्कृतीच्या जोपासनेत सहभाग, भाषा व संस्कृतीची जपणूक, पत्रकारिता आणि संस्कृती इ. विषयांवर अभ्यासपूर्ण भाषणे देण्याकरिता सयाजीरावांनी काढलेली टिपणे, त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यासाठी केलेली मदत तसेच टिपणे न काढता दिलेल्या




भाषणांच्या त्यांच्या स्वीय सचिवांनी केलेल्या नोंदी इ, विषयांचा विस्तृतपणे केलेला ऊहापोह; हे या प्रस्तावनेचे एक वैशिष्ट्य आहे. प्रस्तुत खंडात समाविष्ट भाषणांची अनुक्रमणिका पाहिल्यास त्यांचा काळ आणि स्थळ तसेच त्यामागील प्रयोजन आपल्याला समजते. पहिल्या खंडात एकूण १०५ भाषणे तर दुसऱ्या खंडात १२७ भाषणांचा समावेश असून, प्रत्येक खंडाच्या शेवटी व्यक्तिनाम,स्थळ आणि विषयसूची जोडलेली आहे.

### इंग्रजी भाषणे

प्रस्तुत प्रकल्पातील खंड ६ आणि ७ मध्ये सयाजीरावांची इंग्रजी भाषणे समाविष्ट असून, त्यांचे संपादन अविनाश सप्रे यांनी केले आहे. दोन्ही भागांना यापूर्वी प्रकाशित झालेल्या भाषण संग्रहाला अल्बन ग्रेगरी विझोरी यांनी दिलेली दहा पृष्ठांची प्रस्तावनाही सोबत जोडली आहे. सहाव्या खंडाच्या पहिल्या भागात एकूण ९२ तर दुसऱ्या भागात १०८ भाषणे संग्रहित करण्यात आलेली आहेत. या भागांमध्ये महाराजांनी इ.स.१८७७ ते १९३६ पर्यंतच्या भाषणांचा समावेश करण्यात आलेला आहे. भाषणांप्रमाणेच महाराजांच्या पत्रांचाही संग्रह या प्रकल्पात समाविष्ट केलेला दिसून येतो.

### महाराजांचा पत्रसंग्रह

प्रस्तुत प्रकल्पातील खंड ३ ते ५ मध्ये सयाजीरावांच्या एकूण २०७३ मराठी पत्रांचा संग्रह करण्यात आला आहे. ही पत्रे सयाजीरावांनी इ.स.१८८६ ते १९२० या कालावधीत लिहिलेली आहेत. त्याचबरोबर खंड ८ ते ११ हे महाराजांच्या इंग्रजी पत्रांचे संग्रह आहेत. यात २१९० पत्रांचा संग्रह करण्यात आला आहे. ही पत्रे इ.स.१८८६ ते १९३३ या काळात लिहिलेली आहेत.

मराठी भाषेतील तीन आणि इंग्रजी मधील चार अशा सर्वाधिक म्हणजे सात खंडांचे संपादन डॉ.एकनाथ पगार यांनी केलेले आहे. त्यांनी यापैकी पहिल्या भागाला म्हणजे तिसऱ्या खंडाला एकूण ११९ पृष्ठांची संपादकीय प्रस्तावना लिहिलेली आहे. त्यांच्या मराठी प्रस्तावनेचे इंग्रजी भाषांतर गायत्री पगडी यांनी केले आहे. त्याचप्रमाणे या पत्रांच्या जुन्या आवृत्तीला रियासतकार जी.एस.सरदेसाई यांनी लिहिलेली दोन पृष्ठांची प्रस्तावनाही इंग्रजी पत्रांच्या पहिल्या भागाला जोडली आहे. या सर्व खंडांमध्ये ज्या–ज्या व्यक्तींना सयाजीरावांनी पत्रे लिहिली होती. त्यांची सूची पत्रक्रमांकांसह दिलेली आहे.

त्याचप्रमाणे या पत्रांमध्ये ज्या-ज्या व्यक्तींचा संदर्भ आलेला आहे. त्यांची सूचीही सोबत जोडलेली आहे. या खंडांमधील काही पत्रांचे मराठी अनुवाद आराधनाताई कुलकर्णी आणि श्रीनाथ तिवारी यांनी केले आहेत. महाराजांच्या चरित्राचे लेखन करण्याच्या उद्देशाने रियासतकार गो.स. सरदेसाईंनी १८७५ ते १९३३ या काळातील पत्रांचे संकलन केले होते. त्यांच्या ऐतिहासिक दृष्टीमुळे आज मराठी व इंग्रजी वाचकांना ही पत्रे उपलब्ध झाली आहेत. ही पत्रे जवळच्या व्यक्तींना लिहिली आहेत. तशीच ती ब्रिटिश अधिकाऱ्यांनासुद्धा लिहिली आहेत. त्यामुळे त्यांचे स्वरूप भावनिक तसेच औपचारिक अशा दोन्ही प्रकारचे आहे.

'महाराजा','कुशल प्रशासक','लोकांच्या कल्याणाची आस्था असणारा', 'प्रोत्साहक आणि विनम्र जाणता राजा' म्हणून हे पत्रलेखन झालेले दिसते. या संपादकांच्या निवेदनातून आपणास या पत्रसंग्रहाचे महत्त्व आगळेच आहे, याची खात्री पटते. मराठी व इंग्रजी अशा दोन्ही भाषांमधील एकूण सात खंडांचे प्रकाशन म्हणजे महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या भावविश्वाचे प्रकटीकरण होय.

### महाराजा सयाजीराव-गौरवगाथा युगपुरुषाची

या शीर्षकाचा बारावा खंड संपादित केला आहे. तो बाबा भांड यांनी. प्रस्तुत प्रकल्पातील इतर खंडांपेक्षा या खंडाचे स्वरूप वेगळे आहे. त्यापैकी पहिले वेगळेपण म्हणजे त्याचा बाह्याकार होय. इतर खंड १/८ डेमी या आकारमानाचे आहेत, तर हा खंड १/४ क्राऊन या आकारमानात सिद्ध केलेला आहे. दुसरे या खंडाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यात समाविष्ट साहित्य होय. त्याचप्रमाणे या खंडाचे तिसरे वैशिष्ट्य म्हणजे प्रख्यात चित्रकार सरदार जाधव यांनी विषयानुसार रेखाटलेली रेखाचित्रे. महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या कार्यकर्तृत्वावर महात्मा गांधी, वि.का.राजवाडे, दत्तो वामन पोतदार, विठ्ठल रामजी शिंदे, भगवंत बळवंत पाळेकर, वि.द.घाटे, चिंतामण विनायक वैद्य, चिं.ग.कर्वे, दाजी नागेश आपटे, चिंतामण विनायक जोशी, वि.पा.दांडेकर या थोरांनी लिहिलेले लेख या खंडात समाविष्ट करण्यात आले आहेत. या साहित्याचे संपादकांनी केलेले वर्गीकरण या खंडाचे एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. चरित्र, शिक्षण सुधारणा, ग्रंथ, ग्रंथकार, ग्रंथालयांचे पोशिंदे, सामाजिक सुधारणा, ललित कला, सहकार, उद्योग, बांधकाम व शिल्पकला, शेती-दुष्काळ, अस्पृश्योद्धार, व्यायामाचे क्षेत्र, स्वातंत्र्य लढ्यास मदत, आंतरराष्ट्रीय शतपावली, युगद्रष्टा सयाजीराव, महाराजांची वचने, महाराजांचे निवडक कायदे, महाराजा सयाजीरावांबद्दलची सात परिशिष्टे आणि लेखकांचा अल्प परिचय अशा सोळा शीर्षकाखाली या खंडातील साहित्याचे वर्गीकरण करण्यात आले आहे. एकूण ६८८ पृष्ठांच्या या खंडाचे मूल्य केवळ १२० रुपये एवढेच आहे. प्रस्तुत खंडाप्रमाणे सर्वच खंडांना महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समितीचे सदस्य सचिव बाबा भांड यांनी प्रस्तावना लिहिलेल्या आहेत. मराठी वाचकांच्या भेटीस उत्सुक असा हा नजराणा महाराष्ट्र उच्च शिक्षण विभागाच्या तत्परतेने लवकरच येत आहे.

**लोकायत,१३,राजर्षी शाहूनगर,पिंपळगाव रोड, यवतमाळ**

**मराठी भाषा विभागांतर्गत भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ व राज्य मराठी विकास संस्था अशी ४ कार्यालये कार्यरत आहेत. या चार कार्यालयांकडून मराठी भाषा आणि साहित्य यांच्या संवर्धनासाठी विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. या सर्व उपक्रमांना गती देण्यात आली आहे.**

# सारे काही मराठीसाठी...




**अपर्णा गावडे**

### राज्य मराठी विकास संस्था, मुंबई.

- **पुस्तकांचे गाव - भिलार :** या प्रकल्पांतर्गत सुरुवातीस २५ घरांमधून प्रत्येकी ५०० पुस्तके वाचक/पर्यटकांसाठी उपलब्ध करून देण्यात आली होती. लोकसहभागातून सुरू केलेल्या या प्रकल्पास वाचकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असल्याने घरांच्या संख्येत वाढ करण्यात येत आहे. सध्या येथे साहित्यिक व भाषिक उपक्रमांचे नियमित आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमाकरिता वाचकांसाठी निवास व्यवस्था, रस्ते, वाहनतळ, सार्वजनिक प्रसाधनगृह तसेच खुले प्रेक्षागृह इत्यादी पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरू आहे.
- राज्य मराठी विकास संस्थेकडून अमराठी भाषिकांसाठी अध्यापन साधने विकसित करण्यासाठी मुंबई विद्यापीठाच्या जर्मन विभागाच्या पुढाकाराने 'मायमराठी' हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. चालू वर्षी या प्रकल्पांतर्गत ३८ लाख रुपये अर्थसाहाय्य वितरित करण्यात आले आहे.
- मराठी बोलींचे प्रतिमांकन हा प्रकल्प डेक्कन कॉलेज, पुणे यांच्या साहाय्याने हाती घेण्यात आला असून यामध्ये ६०

बोली भाषांचा समावेश करण्यात आला आहे.

- **दासोपंतकृत गीतार्णव शब्दार्थ-संदर्भकोश :** नाथपंचकातील एक महत्त्वाचे कवी दासोपंत यांनी लिहिलेली गीता टीका म्हणजेच 'गीतार्णव' हा ग्रंथ होय. या साहित्यकृतीची माहिती मराठी वाचकांना व्हावी, याकरिता हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.

### भाषा संचालनालय, मुंबई.

- भाषा संचालनालयाने दैनंदिन प्रशासन व न्याय व्यवहारात सातत्याने उपयोगी होणाऱ्या अ) कार्यदर्शिका ब) प्रशासन वाक्प्रयोग क) शासन व्यवहार कोश ड) न्याय व्यवहार कोश या भ्रमणध्वनी ॲपचे काम पूर्ण केले आहे. वरील चार कोशांमध्ये सुमारे ८६ हजार मराठी / इंग्रजी शब्दांचा समावेश आहे.
- परिभाषा कोश अद्ययावतीकरण करण्याचे काम सातत्याने सुरू असते. सध्या शासन व्यवहार कोश, कृषिशास्त्र, अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान आणि तर्कशास्त्र तसेच शिक्षणशास्त्र परिभाषा कोश या कोशांच्या अद्ययावतीकरणाचे काम पूर्ण होत आहे.
- आतापर्यंत ३४ परिभाषा कोश / शब्दकोश तसेच शासन मार्गदर्शक पुस्तिकांची निर्मिती केली आहे.

### महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

#### नवीन लेखन प्रकल्प

- मराठी भाषेत मौलिक व वैचारिक विषयांवर नावीन्यपूर्ण लिखाण करण्याकरिता मंडळाकडून २० नवीन लेखन प्रकल्प हाती घेतले आहेत. ते पुढीलप्रमाणे आहेत. – १) नाट्यसंज्ञा कोश, २) मराठी नाटक आणि रंगभूमीचा समग्र इतिहास, ३) महाराष्ट्राच्या सामाजिक – सांस्कृतिक स्थित्यंतराचा इतिहास, ४) महाराष्ट्र दृश्यात्मक कलांच्या परंपरांचा आढावा – बृहद्ग्रंथ प्रकल्प, ५) १९ व्या व २० व्या शतकातील अध्यात्म मार्गदर्शकाचा बोध, ६) मराठी सारस्वतांचे चित्रचरित्र, ७) सत्यशोधकांचे अंतरंग, ८) गुरुवर्य कृ.अ. केळुसकर यांचे समग्र वाङमय, ९) सुफी तत्त्वज्ञान : सखोल विश्लेषण – बृहद्ग्रंथ, १०) भारतातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीची ऐतिहासिक वाटचाल – एक दृष्टिक्षेप, ११) महाराष्ट्राबाहेरील मराठी माणसांच्या कामगिरीचा समग्र आणि सम्यक इतिहास, १२) अभंगसेतू – संतवचनांचे अनुवाद, १३) अक्षर बालवाङ्मय : संहिता शोध व बृहद् संदर्भग्रंथ, १४) नक्षत्र नीलनभीचे – समग्र बालकवी, १५) महाराष्ट्राच्या प्रयोगात्म लोककला : परंपरा आणि नवता (१८५० ते २०१६), १६) कविवर्य नामदेव ढसाळ यांचे समग्र वाङमय – बृहद्प्रकल्प, १७) नागेश विनायक बापट यांचे समग्र वाङमय, १८) मराठीतील बालसाहित्य : इतिहास लेखन आणि समीक्षा संपादन, १९) आधुनिक महाराष्ट्र : अन्वेषणात्मक कालपट, २०) महाराष्ट्रातील नाथ, महानुभाव, वारकरी, दत्त, गाणपत्य, चैतन्य, लिंगायत, आनंद व अन्य. संप्रदायांच्या मध्ययुगीन वाङमयातील अप्रकाशित व असंग्रहित स्फुट कवितांचे प्रकाशन




#### नवे पुस्तक प्रकाशन

- दरवर्षी २७ फेब्रुवारी रोजी मराठी भाषा गौरवदिन समारंभाच्या वेळी या ग्रंथांचे प्रकाशन करण्यात येते. चालू वर्षी अशा वैविध्यपूर्ण विषयांवर पूर्ण केलेल्या पुढील पुस्तकांचे प्रकाशन करण्यात येणार आहे. – १) जी.डी. बापू लाड – (महाराष्ट्राचे शिल्पकार चरित्र योजनेंतर्गत), २) शंकरराव माहिते-पाटील (महाराष्ट्राचे शिल्पकार चरित्र योजनेंतर्गत), ३) डॉ. दिनकर जी. केळकर (महाराष्ट्राचे शिल्पकार चरित्र योजनेंतर्गत), ४) उर्दू-मराठी शब्दकोश, ५) ज्ञानेश्वरी, ६) समग्र वा.रा.कांत, ७) लोककलांचा इतिहास, ८) समग्र नामदेव ढसाळ, ९) शाहीर अमर शेख निवडक साहित्य, १०) अभंगसेतू – संत वचनांचे हिंदी / इंग्रजी अनुवाद


#### अनुदानात वाढ

- अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ व त्यांच्या ४ घटक संस्था तसेच कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी व दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर या ७ साहित्य संस्थांच्या साहित्यिक उपक्रमांना प्रोत्साहन देण्याकरिता आतापर्यंत या संस्थांना दरवर्षी प्रत्येकी ५ लाख रुपये इतके अनुदान देण्यात येत होते. या अनुदानात वाढ करून पुढील आर्थिक वर्षापासून प्रत्येकी १० लाख रुपये इतके अनुदान मंजूर करण्याचा निर्णय घेतला आहे.

### महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.

- मराठी विश्वकोशाचे १ ते २० या सर्व खंडाचे काम पूर्ण झाले असून यामध्ये सुमारे १८०५७ इतक्या नोंदींचा समावेश आहे.
- हा विश्वकोश शासनाच्या संकेतस्थळावर तसेच कार्ड-पेनड्राईव्हच्या स्वरूपात वाचकांना उपलब्ध करून देण्यात आला आहे.
- या विश्वकोशांच्या नोंदींचे अद्ययावतीकरण करण्याकरिता महाराष्ट्रातील विद्यापीठे, शैक्षणिक व संशोधन संस्था यांची मदत घेण्यात येत असून विषयनिहाय विविध ४७ ज्ञानमंडळांची स्थापना करण्यात आली आहे. या ज्ञानमंडळांकडून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ऑनलाइन पद्धतीने विश्वकोशांच्या नोंदींचे अद्ययावतीकरण करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.
- आधुनिक कार्यपद्धतीने विश्वकोशातील नोंदी अद्ययावत करण्यासंबंधी सर्व संबंधितांना विश्वकोश मंडळाकडून मार्गदर्शन करण्यात येते. त्याकरिता वेळोवेळी कार्यशाळेचे आयोजन करण्यात येते.

**सहसचिव, मराठी भाषा विभाग**




# अशी करावी अक्षरसाधना

**आनंद हर्डीकर**

एखाद्या भाषेची बाराखडी लिहिता येऊ लागली म्हणजे लगेच त्या भाषेत चांगले लेखन करता येणे शक्य होत नाही. त्यासाठी प्रयत्न करावे लागतात, अभ्यास करावा लागतो, लेखन कौशल्य जाणीवपूर्वक वाढवत न्यावे लागते. पायरीपायरीने अधिकाधिक उंची गाठत यशाच्या शिखरापर्यंत पोहोचायचे असते. अगदी पहिली पायरी असते प्रेमाची. आपले लेखानवर मुळातून प्रेम असायला हवे. आपल्या मनातील भावना जशा बोलून व्यक्त करता येतात, तशाच त्या लिहूनसुद्धा व्यक्त करता येतात. पण बोलता येऊ शकणारा प्रत्येक माणूस चांगला संवादक असतोच असे नाही. मग वक्ता होणे तो सुद्धा प्रभावी वक्ता होणे दूरचे ठरते. त्यासाठी सुद्धा प्रयत्न आवश्यक असतातच. तसेच लेखनाचेही आहे. आपल्याला चांगल्या शब्दात व्यक्त व्हायचे आहे असे मनापासून वाटायला हवे. तशी ऊर्मी आपल्या अंत:करणात निर्माण व्हायला हवी आणि एकदा ती अंकुरली की, तिची नीट जोपासनाही करायला हवी.

### जोपासनेची प्रक्रिया

जोपासनेच्या या प्रक्रियेमध्ये अनेक पायऱ्या चढायच्या असतात. शालेय स्तरापासून लेखनकौशल्य हवेसे वाटायला लागणे गरजेचे असते. गणितातील आकडेवारी अधिक गुण मिळवून देणारी ठरत असली आणि विज्ञानातले प्रयोग जिज्ञासू वृत्तीला खतपाणी घालत असले तरीही भाषाविषय आवडतात का, त्यातही कल्पना विस्ताराचा किंवा निबंधलेखनाचा प्रश्न कंटाळवाणा न वाटता व्यवस्थित सोडवावासा वाटतो ना, हे आपल्याच मनाला विचारून पाहावे. पुढील आयुष्यात काय करायचे? या प्रश्नाचा विचार करताना विज्ञानशाखेला गेल्यानंतरचे अगणित पर्याय खुणावत असतात. आर्थिक सुबत्तेकडे नेणारे अभ्यासक्रम लोभसवाणे वाटत असतात. तशा स्थितीतही मराठी (इंग्रजी माध्यमातून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी त्या भाषेतील) साहित्यही आवडीने वाचावेसे वाटत असेल, तर लेखनकौशल्य जोपासण्यासाठी अनुकूल भूमी तयार आहे. असे मानावे. हे कौशल्य कलाशाखेकडे जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीच आवश्यक असते. अशी विज्ञान शाखेकडे जाऊ इच्छिणाऱ्या काही विद्यार्थ्यांची (गैर) समजूत असते. पालकांनी आणि शिक्षकांनी ही (गैर) समजूत दूर करण्यासाठी जाणीवपूर्वक वातावरणनिर्मिती करायला हवी. पण त्यांच्याकडून होणाऱ्या तशा प्रयत्नांसाठी थांबून न राहता विद्यार्थ्यांनी आपल्या मनाचा कौल विचारत राहावे. आपल्या कर्तबगारीचे क्षेत्र कोणतेही निवडले गेले. तरीही लेखनकौशल्य अंगी बाणले, तर ते वाया जाणार नसून आपल्या व्यक्तीमत्त्वाचे प्रभावक्षेत्र वाढवण्यासाठी कायम उपयुक्त ठरणार आहे, हे सर्वांनीच समजून घ्यावे.

### दैनंदिनी लिहायची सवय

विद्यार्थीदशेपासून दैनंदिनी लिहायची सवय लावून घेतली तर लेखनकौशल्य योग्य वेळी आविष्कृत करताना ती कमालीची सहायक ठरू शकते. या दैनंदिनात रोज नोंदवत जायचे, ते आपले चाकोरीबद्ध आयुष्य नाही. त्या त्या दिवशी जे जे विशेष घडले असेल किंवा जाणवले असेल, ते ते संक्षेपाने नोंदवत जायचे. शाळा–महाविद्यालयाच्या प्रवेशद्वाराशी असणाऱ्या फलकावरचा एखादा

टवटवीत सुविचार... शिक्षकांनी वर्गावर धडा शिकवताना सांगितलेला एखादा किस्सा.. रिकाम्या तासाला आलेल्या बाईंनी सांगितलेली एखाद्या गाजलेल्या चित्रपटाची कथा...मित्रांच्या मनमोकळ्या गप्पांमध्ये हसू पसरवणारा एखादा भन्नाट विनोद.... शिक्षकांनी घातलेले पाठ्यपुस्तकाबाहेरचे कठीण गणित चुटकीसरशी सोडवता आल्यामुळे झालेला मनस्वी आनंद... या आणि अशा कितीतरी त्या त्या दिवशी मनात रेंगाळणाऱ्या आठवणी नोंदवत जायचे. आठ-पंधरा दिवसांनी आपलीच दैनंदिनी पुन्हा चाळायची. दिसायला अगदी साधी वाटणारी ही सवय सुरुवातीला कदाचित त्रासदायक वाटली, तरी एकदा अंगवळणी पडली की, मग मात्र ती जिवाभावाची मैत्रीणच होऊन जाते.

## कल्पनाविस्तार आणि सारसंक्षेप

अशा नोंदी करायची सवय लागली की, आपोआप कल्पनाविस्तार आणि सारसंक्षेप करण्याची सवय लागते. फक्त परीक्षेसाठी प्रश्नपत्रिकेतील उताऱ्याचा सारसंक्षेप किंवा दिलेल्या तीन-चार कल्पनांचा विस्तार करण्याचा शाळेत करून घेतला जाणारा सराव, फारच मर्यादित असतो. त्याऐवजी अप्रत्यक्षपणे दैनंदिनी लिहिण्याचा अनौपचारिक सराव आपल्या सुप्त लेखन कौशल्याला खतपाणी घालत असतो. निबंधलेखनाची वेळ आली की, आपण केलेल्या नोंदीपैकी काही अचानक आठवतात, मागचेपुढचे संदर्भ लक्षात घेऊन त्या नोंदींचा वापर केला तर आपण आपला मुद्दा अधिक चांगल्या पद्धतीने मांडू शकतो, हे आपले आपल्यालाच लक्षात येऊ लागते.

याच सुमारास आपल्याला आविष्काराची वेगवेगळी माध्यमे कमी-अधिक प्रमाणात आवडू लागतात. कुणाला कविता ऐकायला-वाचायला आणि करायलाही आवडते, तर कुणाला कथा जवळची वाटते. कुणाला ललित निबंध आवडतात, तर कुणाला वैचारिक वाङ्मय वाचावेसे वाटते. चालू घडामोडींबद्दल उलटसुलट प्रतिक्रिया व्यक्त कराव्याशा वाटतात. वेगवेगळ्या विचारसरणींचा अभ्यास करावासा वाटतो. कुणाला विज्ञान आणि ललित साहित्य यांची सांगड घालावीशी वाटते, तर कुणाला कलासभा आपली खरी ओळख निर्माण करील, असा विश्वास वाटू लागतो. आपल्या सुप्त लेखनगुणांना किशोरावस्थेत जसे खतपाणी मिळालेले असेल, तशा प्रकारे घुमारे फुटू लागतात. तो अंतर्मनाचा कौल मानून पुढची साधना करायला जो पुढे सरसावतो, तो लेखनकौशल्याचे संवर्धन करू पाहणाऱ्या हौशी उमेदवाराच्या पायरीवर जाऊन पोहोचतो.



## लेखनाविष्काराच्या वाटा

शाळा-कनिष्ठ/वरिष्ठ महाविद्यालयामध्ये असताना ज्यांच्या मनात लेखनाबद्दलच्या ऊर्मीने काहीशी अस्वस्थता, काहीशी हुरहुर निर्माण केलेली असते, ते आपल्या लेखनाविष्काराच्या वाटा धुंडाळू लागतात. अशा वेळी आप्तेष्टांच्या, मित्रमैत्रिणींच्या प्रतिक्रिया आजमाव्याशा वाटतात. तथापि सर्वांनाच यथायोग्य मार्गदर्शन वा





अनुकूल प्रतिक्रिया लाभत नाही. कधीकधी तर जवळचे लोकच खिल्ली उडवतात. कधीकधी पहिल्या-दुसऱ्या-तिसऱ्या लेखनाविष्कारावर प्रसिद्ध नियतकालिकांकडून 'साभार परत'ची सप्तमुद्रा उमटते. अशा स्थितीत नाउमेद न होता आत्मविश्वासाने पुढची वाटचाल चालू ठेवायची असते. परखड आत्मपरीक्षण करायचे असते. आपल्या उणिवांवर वा दोषांवर जिद्दीने मात करण्याची इच्छा बाळगायची असते.'अप्पदीपोभव!' आपणच आपला अंतरीचा दिवा प्रज्ज्वलित करायचा असतो आणि त्या प्रकाशात हळूहळू पुढची वाटचाल करायची असते.

## पुनर्रचना आणि पुनर्लेखन

आत्मपरीक्षणाच्या या टप्प्यावर थोडेसे तटस्थ होऊन आपले लेखन आपण न्याहाळले, तर आपल्याला काही उणिवा पटकन समजू शकतात. लक्षात येते, आपण जे लिहिले आहे, ते पुरेसे मुद्देसूद नाही. मनात येईल तसे आपण नुसते लिहीत सुटलो आहोत. वाऱ्यावर भिरभिरणाऱ्या एखाद्या पानासारखे इकडून तिकडे आणि तिकडून इकडे आपले लेखन गिरक्या घेत आहे. कुठेही ते नीट स्थिरावलेले नाही... अशा वेळी एखाद्या कागदावर आपल्या लेखनात आलेल्या वेगवेगळ्या मुद्द्यांची यादी करावी. त्या यादीवरून नजर फिरवल्यावर आपल्यालाल हे जाणवू शकते की, मुद्द्यांची क्रमवारी लावायला हवी आहे. ती यादी सुसंगत लावली म्हणजे पुनर्रचना संपत नाही. काही ठिकाणी आपण एखादा मुद्दा अगदी त्रोटक स्वरूपात मांडलेला असतो आणि त्यामुळे तो महत्त्वाचा असूनही तितकासा प्रभावी ठरलेला नसतो. एखादे योग्य उदाहरण किंवा एखादे उद्धरण जोडले, तर चांगले ठरले, असे आपल्याच लक्षात येऊ शकते... कधीकधी नेमके उलटे झालेले असते. आपला एखादे छोटा मुद्दा आपण विनाकारण ताणलेला असतो. अनावश्यक पुनरुक्ती झालेली असते. त्यामुळे तो भाग कंटाळवाणा ठरलेला असतो. जर त्या तेवढ्या भागाचे संक्षेपाने पुनर्लेखन केले, तर ते योग्य ठरू शकते... असे पुनर्लेखन केल्यानंतर आपलाच लेख आपल्याला नवा, ताजातवाना वाटू लागतो.

कधी दीर्घकथा लिहिली असेल, तर त्याबाबतही असे आत्मपरीक्षण आणि आवश्यक ते पुनर्लेखन गरजेचे असते. कथेतील पात्रे जिवंत वाटली पाहिजेत, त्यांना त्यांचे त्यांचे स्वतंत्र अस्तित्व असले पाहिजे. ज्या काळात ती कथा घडत असेल, तो काळ

आपल्या वर्णनांमुळे जाणवायला हवा, निव्वळ एखाद्या वाक्यात त्याबद्दलचा उल्लेख करून भागत नाही. तीच गोष्ट पार्श्वभूमीसाठी वापरलेल्या जागेची कथा जेथे घडते, त्या प्रदेशातील निसर्ग किंवा शहरी वास्तव शब्दांच्या माध्यमातून चित्रित होणे गरजेचे असते. कोकणातली कथा ब्रम्हपुत्रेसारख्या विस्तीर्ण नदीच्या किनाऱ्यावर घडू शकत नाही किंवा महानगरांमध्ये वाहतुकीची होणारी कोंडी ही अपवादात्मक ठरलेली दाखवता येत नाही. कथा काल्पनिक असते, हे जरी खरे असले, तरी वास्तवतेपासून ती जर ढळलेली असेल, तर ती वाचकाचे लक्ष वेधून घेऊ शकत नाही. हे लक्षात घेऊन कच्च्या कथेचे पुनर्लेखन केले, तर तिला प्रसिद्धी मिळण्याची शक्यता बळावते.



### मर्यादा लक्षात घ्या...

आत्मपरीक्षणाच्या या प्रक्रियेतून जात असतानाच आपली बलस्थानेसुद्धा आपल्याला जाणवतात. आपले चौफेर वाचन उपयोगात आणून आपण जर एखादा विचार मांडला तर त्याचा प्रतिवाद करणे समोरच्याला कठीण जाते, तथापि आपण एखादे व्यक्तिचित्र रंगवायला गेलो, तर मात्र आपली कल्पनाशक्ती तोकडी पडते. त्रिमिती-चित्राची निर्मिती आपण साधू शकत नाही, हे आपल्या लक्षात येऊ लागते. आपल्या सामर्थ्यस्थळांप्रमाणेच आपल्या मर्यादासुद्धा लक्षात येणे गरजेचे असते. तसे झाले म्हणजे आपण लेखनाच्या कोणत्या क्षेत्रात, चांगली मुशाफिरी करू शकतो, याचा प्राथमिक अंदाज घेणे शक्य होते. एका अर्थी आपण 'बेसकॅम्प'वर पोहोचलो आहोत, याची जाणीव होते. खरी चढण पुढे आहे, सर करू ते शिखर कळसूबाई असेल किंवा एव्हरेस्ट असेल, हे आपल्याच चिकाटीवर आणि अदम्य इच्छाशक्तीवर अवलंबून आहे, हेसुद्धा स्वाभाविकपणे जाणवते.

ज्ञानपीठ पारितोषिक विजेते मराठी कादंबरीकार (कै.) वि.स.खांडेकर यांनी एकदा असे म्हटले होते की, 'वेलीवरच्या प्रत्येक कळीचे फूल होतेच, असे नाही. तसेच मनातल्या कथाबीजांचे असते. प्रत्येक कथाबीज अंकुरत नाही.'

कधीकधी एखाद्या कादंबरीचा विषय मनात रुंजी घालू लागतो. आपण त्या संदर्भात आवश्यक ती पूर्वतयारी करू लागतो. ती पूर्ण होण्याची घटिका समीप आलेली असतानाच अचानक आपलाच एखादा परिचित तरुण समोर उभा राहतो आणि त्याच विषयावर कादंबरीलेखनाचा संकल्प सोडल्याचे सांगतो. अशा वेळी काय करायचे, हा प्रश्न निर्माण होतो. 'याच विषयावर आपणही लिहू इच्छितो आहेत, बरीचशी तयारी पूर्ण झाली आहे. त्यामुळे शक्यतो तू आता नव्या विषयाचा शोध घे', असे सांगून ह्या तरुणाला नाउमेद करणे शक्य असते किंवा याच विषयावर आपण दोघेही लिहू. प्रत्येकाचा दृष्टिकोन आणि कथनशैली वेगवेगळी असल्यामुळे दोन्ही कादंबऱ्या वाचकांसमोर आल्या, तरी हरकत नाही, असा सावध पवित्रा घेणेही शक्य असते. तथापि माधवराव पेशव्यांच्या जीवनावर कादंबरी लिहिण्याच्या संदर्भात असा प्रश्न उपस्थित झाला, तेव्हा मात्र वि.स. तथा भाऊसाहेब खांडेकरांनी तिसरा उदारमतवादी पर्याय निवडला होता. रणजित देसाई यांनी 'स्वामी' कादंबरीच्या लेखनसंकल्पाबद्दल बोलणे करताच भाऊसाहेबांनी त्या विषयावरची आपली सारी टिपणे देसायांच्या हवाली केली आणि 'तूच ही कादंबरी लिही, माझ्या ययातीला जसे यश मिळाले, तसेच तुझ्या या कादंबरीला मिळू दे,' असा तोंड भरून आशीर्वादही दिला... मराठी साहित्यविश्वात असे वारंवार घडत मात्र नाही, हे लेखनाचा ध्यास घेणाऱ्या तरुणांनी लक्षात ठेवायला हवे.

### व्यासंग महत्त्वाचा

प्रज्ञा आणि प्रतिभा या दोघांचीही साथ घेतल्याशिवाय साहित्याची प्रभावी निर्मिती होऊ शकत नाही. विषयाची निवड पक्की झाली की, त्या अनुषंगाने उपलब्ध साहित्याचा धांडोळा घेणे, त्याचे गांभीर्याने वाचन करून टिपणे काढणे, पूर्वप्रकाशित पुस्तकांपेक्षा आपण वेगळे काय सांगायचे आणि ते कशा पद्धतीने मांडायचे, याबद्दलचा निर्णय घेणे हे झाले पुढचे टप्पे. त्यासाठी जागतिक ज्ञानभाषा असणाऱ्या इंग्रजीमधील त्याच विषयावरील साहित्याचा व्यासंग करावा. त्यामुळे आत्मविश्वास निर्माण होतो. लेखक म्हणून पुढे येण्यासाठी अशा व्यासंगाची नितांत आवश्यकता असते. याची खूणगाठ मनाशी बांधून ठेवायलाच हवी. आपले म्हणणे अभिनिवेशाविरहित पद्धतीने मांडायचे, आपले संदर्भ पारदर्शीपणे वाचकांसमोर ठेवायचे, त्या पुरावासदृश संदर्भांची सत्यासत्यता पारखणे कुणाही जिज्ञासू अभ्यासकाला सोपे जाईल, अशा रीतीने त्यांचे सुस्पष्ट उल्लेख करायचे... ही रीत अनुसरली म्हणजे आपले गिर्यारोहण सुकर होते, शिखरे पादाक्रांत करणे शक्य होते.

### आत्मानुभूतीची गरज

प्रतिभावान साहित्यिक होण्यासाठी आणखी एका गोष्टीची आवश्कता असते, ती म्हणजे आत्मानुभूती. ज्या समस्येवर लिहायचे आहे, तिचा अभ्यास संबंधित प्रदेशात वा त्या लोकसमूहामध्ये काही दिवस घालवून केल्यास आपण जी वर्णने करू, ती अधिक वास्तवदर्शी ठरतील, हे असे लेखन करू इच्छिणाऱ्यांनी लक्षात ठेवायला हवे. वर्षानुवर्षे ध्यास घेऊन भटकंती करायची, तो तो प्रदेश पायाखाली घालायचा आणि मग कथा सांगायची, कादंबरी लिहायची, ही रीत भल्याभल्यांनी अनुसरली आहे. ज्यांना उत्तम ललित लेखनाच्या वाटेने जाऊन, साहित्यशारदेच्या दरबारातील मानकरी व्हावेसे वाटत असेल, त्यांनी पायरीपायरीने अशी साधना करीत जावे म्हणजे त्यांना सार्थकता लाभू शकेल!

संपादक, राजहंस संपर्क: ०९१५८६३४२१३

# मराठी आणि करिअर संधी...

**२७ फेब्रुवारी आली की, महाराष्ट्रात मराठीचा गर्जा जयजयकार सुरू होतो. मराठी भाषेचे श्रेष्ठत्व सांगण्याची अहमहमिका सुरू होते. त्याचबरोबर मराठीच्या भविष्याविषयी चिंता व्यक्त केली जाते. मराठी शिकून करायचे काय, असा सवाल विचारला जातो. मराठी विषय हा करिअर करण्यासाठी उपयुक्त ठरू शकत नाही, असेसुद्धा लिहिले बोलले जाते. मात्र मराठीवर प्रभुत्व मिळवल्यास उत्तमोत्तम संधी मिळू शकतात.**

मराठीचा अभिमान बाळगायला हवा असे सांगणारेच मराठी भाषा करिअर करण्यासाठी उपयुक्त ठरू शकत नाही, असे कां सांगतात? वस्तुस्थिती अशी आहे की मराठी ही सक्षम भाषा असल्याने या भाषेचे परिपूर्ण ज्ञान मिळवले तर विविध संधी मिळू शकतात.
**हे करिअर पुढीलप्रमाणे राहू शकतात –** १) चांगल्या प्रकाशक संस्थांना मराठीवर प्रभुत्व असलेल्या व्यक्तींची कायम गरज भासत असते. संपादन, मुद्रितशोधन, कॉपीलेखन यासाठी अशा व्यक्ती हव्या असतात. २) सध्या अनुवादाचे मोठे प्रकल्प वेगवेगळ्या संस्थांमार्फत राबवण्यात येत आहेत. मराठीभाषेवर प्रभुत्व मिळवलेल्या व्यक्तींना या प्रकल्पांमध्ये काम करण्याची चांगली संधी मिळू शकते. राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळामार्फत सुद्धा अनुवादाची योजना राबवण्याची शक्यता आहे. त्यासाठीही अनुवादकांची गरज भासू शकते. अशीच संधी साहित्य अकादमीमार्फत इतर भाषेतील पुस्तके/ग्रंथ मराठीत अनुवादित किंवा भाषांतरित करण्यासाठी मिळू शकते. ३) महाराष्ट्रात प्रकाशित होणाऱ्या सर्व मोठ्या कंपन्यांच्या जाहिराती या मराठीतूनच देण्याचा कल वाढत आहे. त्यामुळे या जाहिराती मराठीत लिहिण्यासाठी किंवा मूळ इंग्रजीतील जाहिराती मराठीत अनुवाद करण्यासाठी जाहिरात कंपन्यांना मराठीवर प्रभुत्व असणाऱ्या तज्ज्ञांची गरज भासते. केंद्र सरकाराच्या जाहिराती सातत्याने प्रकाशित होत असतात. त्यांच्या भाषांतरासाठीही मराठी तज्ज्ञांची गरज भासते.
४) पत्रकारिता– मराठी पत्रकारितेमध्ये येण्यासाठी मराठी भाषा उत्तम येत असल्यास प्राधान्याने संधी मिळू शकते. पुढे प्रगतीच्या संधीही गतीने मिळू शकतात. मराठी वृत्तवाहिन्यांमध्ये सुद्धा मराठीवर प्रभुत्व असणाऱ्या व्यक्तींना चांगली संधी मिळू शकते. ५) राज्य शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामध्ये प्रतिवेदक, उपसंपादक, साहाय्यक संचालक, जिल्हा माहिती अधिकारी, उपसंचालक या पदांसाठी कोणत्याही विषयातील पदवी आणि पत्रकारिता पदवी किंवा पदविका घेतलेल्या व्यक्तींना संधी मिळू शकते. मात्र मराठी विषयातील पदवी वा पदव्युत्तर पदवी असल्यास अशा उमेदवारांचे एक पाऊल पुढे राहू शकते. ६) आकाशवाणीच्या वृत्तशाखेत वृत्तनिवेदक/ वार्ताहर/ वृत्तसंपादक आणि कार्यक्रम निर्मिती शाखेत कार्यक्रम अधिकारी म्हणून संधी मिळू शकते. दूरदर्शनची वृत्तशाखा, पत्र सूचना कार्यालय (प्रेस इन्फर्मेशन ब्यूरो), क्षेत्रीय प्रसिद्धी (फिल्ड पब्लिसिटी), योजना (मराठी मासिक) येथे संधी मिळू शकते. ७) राज्य शासनाच्या मराठी भाषा विभागांतर्गत येणाऱ्या विश्वकोश निर्मिती मंडळ, भाषा संचालनालय, राज्य मराठी विकास संस्था, राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळामध्ये मराठी हा विषय घेऊन पदवी किंवा पदव्युत्तर पदवी घेतलेल्या उमेदवारांना संचालक, उपसंचालक, सचिव आदी पदांवर संधी मिळू शकते. ८) मराठीचे प्राध्यापक आणि शिक्षक या संधी तर कायम उपलब्ध होतात. ९) केंद्रीय नागरी सेवा परीक्षा (भारतीय प्रशासनिक सेवा/भारतीय पोलीस सेवा व इतर पदासांठी घेण्यात येणारी परीक्षा) ही परीक्षा मराठी भाषेतून देता येते. मराठी वाङ्मय विषय घेऊन बरेच विद्यार्थी चांगले गुण मिळवतात. मराठीतून मुलाखत सुद्धा देता येते. १०) मराठीवर प्रभुत्व मिळवल्यास चांगली ग्रंथसंपदा वा इतर वाङ्मय निर्मितीवर लक्ष केंद्रित करता येऊ शकते. ११) चित्रपट–दूरचित्रवाणी मालिकांसाठी संवाद लेखन, पटकथा, संवाद, लेखन, गीतकार अशी संधी मिळू शकते. १२) महाराष्ट्राबाहेरील काही विद्यापीठांमध्ये मराठी भाषा विभाग आहेत. त्यांनाही वेळोवेळी मराठी भाषा तज्ज्ञांची गरज भासत असते. अशी संधी कोणत्याही विद्यार्थ्याला मिळू शकते. पण त्यासाठी मराठीवर विज्ञान आणि गणिताइतकेच किंबहुना त्यापेक्षा अधिक प्रेम करायला हवे. या दृष्टीने शिक्षकांची महत्त्वाची जबाबदारी आहे. ज्याप्रमाणे गणित आणि विज्ञानाचा पाया मजबूत करण्यासाठी मूलभूत संकल्पना विद्यार्थ्यांना कळाव्यात म्हणून कष्ट घेतले जातात किंवा विद्यार्थ्यांकडून परिश्रम करवून घेतले जातात. तसेच मराठीसाठी कष्ट आवश्यक आहेत.



१२ वी नंतर मराठी वाङ्मयाच्या पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेता येतो. हा अभ्यासक्रम महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठांमध्ये शिकवला जातो. मराठी विषयात पदव्युत्तर पदवी, एमफिल, पीएच.डी. करण्याची संधीही या विद्यापीठांमार्फत उपलब्ध करू दिले जातात. मराठीचा अभ्यास मनापासून केला तर चांगले करिअर घडवणे अशक्य नाही.

**टीम लोकराज्य**




**मराठी ही केवळ राज्याची राजभाषा नसून तो सर्वांच्या जिव्हाळ्याचा प्रश्नही आहे. त्यामुळे ही भाषा विकसित व वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने मराठी भाषा धोरण हे सर्वसमावेशक असणे क्रमप्राप्त ठरते. विविध क्षेत्रांतील अभ्यासक, संशोधक व भाषातज्ज्ञांचा समावेश असलेल्या भाषा सल्लागार समितीने मराठी धोरण तयार करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. याविषयी या समितीचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांच्याशी साधलेला संवाद.**

# मराठी भाषेच्या रुपातील सांस्कृतिक वारशाचे जतन आणि संवर्धन

**विनय मावळणकर**

**महाराष्ट्र राज्याचे राजभाषा मराठीचे धोरण ठरवणाऱ्या भाषा सल्लागार समितीमध्ये कोणाकोणाचा समावेश होता?**

भाषा सल्लागार समितीचा अध्यक्ष या नात्याने भाषा धोरण ठरवताना मी सदस्यांबाबत सुदैवी ठरलो. विविध क्षेत्रांतील अभ्यासक, संशोधक व भाषातज्ज्ञ या समितीचे सदस्य आहेत. अधिवक्ता शांताराम दातार (न्यायालय व मराठी), अनिल गोरे (भाषाआग्रही मराठीकाका), डॉ. अविनाश बिनीवाले (भाषातज्ज्ञ), डॉ. गिरीश दळवी (माहिती तंत्रज्ञान व मराठी), माधव जोशी (प्रकाशक), संतोष क्षीरसागर (लिपितज्ज्ञ), डॉ. प्रकाश परब (प्राध्यापक व समीक्षक) इत्यादी विविध क्षेत्रांतील व्यासंगी व कृतिशील सदस्य बहुमूल्य योगदान देत आहेत.



डॉ. सदानंद मोरे

**भाषा धोरण तयार करताना कोणत्या क्षेत्रांबाबत विचार झाला?**

सर्वंकष व सर्वांगीण भाषाविकास होण्याच्या दृष्टीने अनेक क्षेत्रांचा विचार आम्ही बैठकांमध्ये केला.

युनेस्कोने, एखाद्या भाषेचा विकास व विस्तार होणे म्हणजे नेमके काय, याबाबतचे मार्गदर्शन केले आहे. त्या अनुषंगाने, शालेय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण, नव तंत्रज्ञान (माहिती तंत्रज्ञानासह), मराठीच्या बोली, न्यायव्यवहार, वित्त व उद्योगजगत, शासन-प्रशासन आणि प्रसारमाध्यमे या सर्व क्षेत्रांत मराठी भाषेचा विकास कसा साधता येईल, याबाबतचा ऊहापोह आम्ही केला. त्याचबरोबर, लिपिशिक्षण आणि कोशनिर्मिती या मूलभूत घटकांबाबतही आम्ही सखोल विचार केला.

**धोरणातील कोणत्या प्रमुख शिफारशी उदाहरणादाखल सांगाल?**

देवनागरी अक्षराकारांचे प्रमाणीकरण, मराठी भाषेचा विकास या दृष्टीने शाळा व महाविद्यालयांचे मूल्यमापन (लँग्वेज ऑडिट), स्वतंत्र भाषा अभियांत्रिकी यंत्रणेची उभारणी, राष्ट्रीय शिखर शिक्षण संस्थांमध्ये मराठी विभागाची निर्मिती, संशोधन व अध्ययन या दोन्ही घटकांना महत्त्व देणाऱ्या मराठी विद्यापीठाची टप्प्याटप्प्याने उभारणी, युनिकोड व भारतलिपी (इन्स्क्रिप्ट) कळफलकाचा सार्वत्रिक आग्रह, मराठीच्या बोलींचे प्रतिमांकन, मराठीच्या वापराबाबत तक्रार निवारण केंद्राची स्थापना, बुकलेट ऑफ जेनेरिक मेडिसिन ही प्रत्येक औषध विक्रेत्याकडे उपलब्ध असलेली पुस्तिका मराठीतून निर्माण करणे, मराठी भाषेला प्राधान्य देणाऱ्या स्टार्टअप कंपन्यांना सहकार्य करणे, अशा अनेक शिफारशी आम्ही शासनाकडे सुपुर्द केल्या आहेत. शासनाचे विविध विभाग याबाबत सकारात्मक कार्यवाही करतील, अशी आम्हा समिती सदस्यांना खात्री आहे.

**धोरणाची व धोरणाच्या मसुद्याची सद्य:स्थिती काय आहे?**

ऑगस्ट २०१५ मध्ये माझ्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या समितीने दोन वर्षांत अनेक



बैठकांमध्ये सखोल व सर्वंकष चर्चा करून, साधक–बाधक विचारांचे आदान–प्रदान करून या धोरणाचा मसुदा ३० जून, २०१७ रोजी मराठी भाषा मंत्री मा. ना. श्री. विनोद तावडे यांच्याकडे सुपूर्द केला. यापुढे विविध विभागांचे प्रधान सचिव आणि महाराष्ट्र राज्याचे मंत्रिमंडळ हे धोरण लागू करण्याबाबत अंतिम निर्णय लवकरच घेईल, अशी अपेक्षा आहे.

**भाषा धोरण मराठी भाषेच्या विकासाला चालना देईल, असे आपल्याला वाटते काय?**

नक्कीच! ह्या धोरणाचा अंतरिम मसुदा तयार झाल्यावर त्यात मांडलेल्या काही मुद्द्यांची व्यवहार्यता तपासण्यासाठी, शासनाच्या विविध विभागांतील वरिष्ठ अधिकारी आणि विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ यांच्या उपसमित्या तयार करण्यात आल्या. या उपसमित्यांनी धोरणाला आणखी प्रभावी व परिणामकारक केले. म्हणूनच या धोरणाच्या अंमलबजावणीमुळे मराठी भाषाविकासाला चालना मिळेल, यात शंका नाही.






**धोरणाविषयी चर्चा करताना आणि मसुद्याला अंतिम स्वरूप देताना आपल्या समितीने कोणत्या दिशेने विचार केला?**

धोरण सर्वसमावेशक होण्याच्या दृष्टीने आम्ही अधिकाधिक क्षेत्रांचा विचार केलाच. पण, महत्त्वाचे म्हणजे केवळ सैद्धान्तिक व वैचारिक मुद्दे न मांडता आम्ही कृतिशीलतेवर भर दिला आहे. व्यावहारिक दृष्टिकोन समोर ठेवून भाषेचा सार्थ विकास साधण्याला आम्ही प्राधान्य दिले आहे. हे काम करत असताना आग्रह आणि हट्टाग्रह यांतील सीमारेषा लक्षात घेऊन समितीने काम केले आहे. मराठी भाषा मंत्री श्री. विनोद तावडे यांनी वेळोवेळीच्या बैठकांमध्ये गांभीर्याने सहभाग घेऊन अनेक व्यवहार्य मुद्द्यांकडे लक्ष वेधले. त्यांच्या राजकीय व सामाजिक अनुभवाचा समितीला निश्चितच लाभ झाला. श्री. विनोद तावडे यांनी मराठी भाषा मंत्री म्हणून कार्यभार स्वीकारल्यानंतर लगेचच भाषाधोरण या विषयाला प्राधान्य दिले. त्यांनी राज्यातील विद्यापीठांमध्ये धोरणाबाबत चर्चासत्रे आयोजित केली. या चर्चासत्रांतून भाषाविकासाचे असंख्य मुद्दे समितीला प्राप्त झाले. मराठी भाषेविषयीची जाण व आपुलकी असलेल्या प्रधान सचिव श्री. भूषण गगराणी यांचे याबाबतचे सहकार्यही मोलाचे होते, आहे.



**हे राजभाषा धोरण नेमके काय परिणाम साधेल, असे आपल्याला वाटते?**

प्रस्तुत राजभाषा मराठी धोरण ज्ञानव्यवहारात, व्यापार, उद्योग तसेच तंत्रज्ञानात्मक स्पर्धेत मराठी माणसाचा टक्का वाढवण्यासाठी आणि मराठी भाषेला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी राज्याच्या नियोजनावर प्रभाव टाकेल. जागतिक स्पर्धात्मक वातावरणात मराठी माणसाचा कार्यात्मक व मूल्यात्मक सहयोग मराठी भाषेतून वाढवण्याच्या दृष्टीने हे राजभाषा मराठी धोरण मांडले जात आहे. या राजभाषा मराठी धोरणामुळे मराठी भाषेच्या वापराची व्याप्ती व गुणवत्ता वाढेल. या धोरणामुळे मराठी माणसाच्या अस्मितेचे व मराठी भाषेच्या रूपातील सांस्कृतिक वारशाचे जतन आणि संवर्धन होईल.

अविनाश धर्माधिकारी



आपल्या अपत्याच्या जन्मापासूनच किंवा त्याही आधीपासून आईवडिलांचा विचार चालू होतो, की आपल्या अपत्याने आयुष्यात कोण व्हावे, काय करावे. आई-वडील मंडळींची आपल्या स्वतःच्या आयुष्याबद्दल स्वप्नं असतात. अडचणी, वंचना, दारिद्र्य अपघात, अपयश अशा अनेक कारणांनी ही स्वप्ने अपुरी राहिलेली असतात. मग आपल्या मुलाबाळांच्या माध्यमातून ती पूर्ण करण्याची स्वप्ने आईवडिलांना पडतात. आपल्या वाट्याला जे दुःख, वंचना, अपयश आलं ते आपल्या मुलाबाळांच्या वाट्याला येऊ नये, त्यांना काही कमी पडू नये यासाठी आई-वडील छाती फुटेपर्यंत पळत राहतात.

पुढे ती मुले मोठी होऊ लागली की, आपल्या आयुष्याचा आपोआपच विचार करू लागतात. बदलते भोवताल आणि बदलत्या परिस्थितीनुसार इंजिन ड्रायव्हरपासून आयएएस अधिकाऱ्यांपर्यंत आणि विराट- रोहित (अनुष्का, दीपिका) पासून जीवनाच्या विविध क्षेत्रातल्या विविध रोल मॉडेलसपर्यंत, मुले स्वतःच्या आयुष्याचा, करिअरचा विचार करतात.

या सर्व विचाराला व्यावहारिक टोक येऊ लागते, यावे लागते, सर्वसाधारणपणे वय वर्षे १६ आणि इयता १० वीपाशी. तिथे करिअरचा, आयुष्याचा विचार करण्याची काही सर्वसाधारण सूत्रे, काही ठोकताळे ठरलेले आहेत.

## सध्याची सर्वसाधारण सूत्रे

सध्याची करिअर आणि आयुष्याची दिशा ठरवण्याची सूत्र, थोड्याफार फरकाने पुढील प्रमाणे सांगता येतील.

१० वी च्या परीक्षेत खूप (पुरेसे) टक्के मिळाले पाहिजेत. त्यासाठी ९ वी पासूनच क्लासेस, शिकवण्या, व्हेकेशन बॅच, स्पेशल बॅच वगैरे वगैरे प्रकार सुरू होतात. जीवनाचे सगळे भवितव्य जणू त्या दहावीतल्या बोर्डाच्या परीक्षेतल्या मार्का-टक्क्यांवरून ठरणार असल्यासारखे. १० वीला खूप टक्के का हवेत? तर ११ वी विज्ञान शाखेला प्रवेश मिळण्यासाठी. आणि ११ वीला सायन्सलाच प्रवेश का हवा तर १२ वीला (भौतिकशास्त्र, रसायन शास्त्र, जीवशास्त्र) किंवा (गणित) किंवा दोन्ही द्विलक्ष्यी अभ्यासक्रम घेता यावा. आणि १२ वीला एवढे पीसीएमबीचे काय पडलेय? तर कळत-नकळत, प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या समाजाने, पालकांनी, समवयीन मित्रमैत्रिणींनी, विविध धोरणांनी ठरलेय की, वैद्यकीय, अभियांत्रिकी म्हणजेच काय ते चांगले, सर्वात उत्तम. प्रथम प्राधान्याचे करिअर. तिथे प्रवेश न मिळाल्यास बाकीच्या पर्यायांचा विचार करायचा. अशी करिअरची एक उतरंड रचलीय -एक प्रकारची नवी वर्ण किंवा जातिव्यवस्था!

वर्ण-जातिव्यवस्थेइतकीच करिअरची दिशा ठरवण्याची ही सूत्र चुकीची, अशास्त्रीय, मुख्य म्हणजे मुलांवर अन्याय करणारी आहेत.

त्या वैद्यकीय, अभियांत्रिकी अंतर्गतसुद्धा अशीच एक पसंतीक्रमाची उतरंड आहे. तीसुद्धा अशास्त्रीय आणि अन्यायकारक.

उदाहरणार्थ, वैद्यकीय शाखेत पदवी पातळीला पहिला पसंतीक्रम-

**विषयाचे ज्ञान आणि परीक्षेतील गुण या दोन पूर्णतः वेगळ्या गोष्टी आहेत. त्यामुळे गुणांवरून आपण मुलगा-मुलगी हुशार आहे की, नाही हे मोजमाप करू लागलो तर तर ते चुकीचे आहे. शाळा-महाविद्यालयांमध्ये मोठे होताना आपण वेगवेगळ्या उपक्रमांमध्ये सहभागी होतो. त्यातील कशामध्ये आपला जीव रमतो, काय समोर आल्यानंतर आपल्याला सहजपणाने समजते ते आपले क्षेत्र. आपली बुद्धी त्या क्षेत्रातच चालते. आपले करिअर त्या क्षेत्रातच करायला हवे. ही समज येण्याला नाव दिले आहे. करिअर घडवण्याची त्रिसूत्री... स्वतःला ओळखा... त्यानुसार करिअरची दिशा ठरवा...आणि मुख्य आव्हान आहे ते निवडलेल्या क्षेत्रामध्ये उत्तम आणि प्रतिभावंत व्हा...!**



# यशोशिखरावर कसे जाल?

व्यवसाय मार्गदर्शन


एमबीबीएस. तिथे प्रवेश न मिळाल्यास आयुर्वेद, होमिओपॅथी, योग, आहार फिजिओथेरपी. अशा पर्यायांचा उतरत्या क्रमाने विचार करतात. एमबीबीएसनंतर पदव्युत्तर प्रवेशासाठीही अशीच पसंतीक्रमांची उतरंड आहे.

अभियांत्रिकीच्याही पदवी–पदव्युत्तरबाबत अशीच उतरंड आहे. सर्वसाधारणपणाने इन्स्ट्रूमेंटेशन, इलेक्ट्रॉनिक्स, टेलिकम्युनिकेशन, नंतर मग इलेक्ट्रिकल, मॅकॅनिकल, सिव्हिल, मेटॉलर्जी वगैरे...

आणि मग अशा रीतीने नववीपासून खूप कष्ट करूनही हवी ती पदवी, हवी ती ज्ञानशाखा मिळाली नाही तर त्या मुलामुलीला, त्यांच्या आईवडिलांना, नातेवाइकांना वाटते जणू आता या मुला मुलीला काही भवितव्यच नाहीये आणि हा मुलगा हुशार नाहीये.

मग काय ! आता मान खाली घालून विज्ञान शाखेमध्ये पदवी

## करिअर निवडीमागची सध्याची सूत्रे



आतापर्यंत करिअर निवडीची जी सर्वसाधारण पद्धती सांगितली तिचा मुळात जाऊन शोध घेतला तर त्यामागची सूत्रे लक्षात येतील. ती पुढीलप्रमाणे सांगता येतील. एखादा मुलगा–मुलगी हुशार, बुद्धिमान आहे का, त्याचे भवितव्य उज्ज्वल आहे की नाही, हे कसे ठरवायचे...? तर परीक्षेतल्या टक्क्यांवरून– मार्कांवरून. बुद्धिमत्ता मुख्य, अंतिम, एकमेव मोजमाप परीक्षेतले मार्क्स! ते सुद्धा सगळ्या विषयातील नाहीत. भौतिकशास्त्र, रसायन शास्त्र, जीवशास्त्र, गणित ! त्यानुसार ठरणारी करिअरची उतरंड. अशी सूत्रे नुसती समोरासमोर मांडली तरी ती किती चुकीची, अशास्त्रीय – म्हणून अन्यायकारक आहेत हे समजेल.

मिळवा ! भौतिकशास्त्र, रसायन शास्त्र, जीवशास्त्र, गणित, जैव तंत्रज्ञान, संगणक शास्त्र इत्यादी...

पण दहावीलाच विज्ञानशाखेला प्रवेश मिळण्याएवढे गुण नसतील तर? कारण दरवर्षीचे निकाल लागले की तिकडे सरकारी धोरण काहीही असो आणि कितीही केंद्रीय–वस्तुनिष्ठ प्रवेश पद्धती असो– महाविद्यालयाचे, विद्याशाखानिहाय कटऑफ जाहीर होतातच. आमच्या विज्ञानशाखेचा प्रवेश ९३ टक्क्याला बंद. वाणिज्य शाखेचा ८९ टक्के आणि कला आणि मानव्यशाखेचा ८३ टक्के.

मग काय, १० वीच्या टक्केवारीनुसार मिळेल ती विद्याशाखा आणि तिचं मिळेल ते महाविद्यालय.

तर काय, विज्ञानशाखेला अकरावीत प्रवेश मिळत नाहिये? मग– आणि म्हणून– जा वाणिज्य शाखेकडे. मग बारावीत सीए (चार्टर्ड अकौंटंट–सनदी लेखापाल)ची प्रवेश परीक्षा द्या. ती पार झाली तर सीए– त्याला आर्टिकलशिप म्हणतात ती – करा. बारावीनंतर लॉ–विधी शाखा हाही एक पर्याय असतो. तो न जमाल्यास मान खाली घालून बीकॉम करा. त्यानंतर पुन्हा सीएसाठी प्रयत्न करा किंवा एम कॉम, सीएस (कंपनी सेक्रेटरी), आयसीडब्ल्यू ए (कॉस्ट अकौंटस्), एलएलबी (कायदा), व्यवस्थापनशास्त्र.... इत्यादी.

अखेरीस १० वीत वाणिज्य शाखेलाही प्रवेश मिळण्याएवढे टक्के–गुण नसतील तर मान खाली घालून कला–मानव्य (आर्टस् ह्युमॅनिटीज) ची वाट धरायची. दुसरे काही जमले नाही, तर आर्टस् ! आर्टसला गेलेल्या मुलामुलींचे पालकच काही वेळ मला म्हणतात, पण आर्टस म्हणजे गाळ ना!

असंच पुढे आपापल्या विषय किंवा ज्ञानशाखेतला शिक्षक–प्राध्यापक कुणी व्हायचे? तर दुसरे काही जमले नाही, तर कर डीएड, बीएड किंवा हो तुझ्या ज्ञानशाखेतला प्राध्यापक (त्यासाठी आता नेट–सेट किंवा एम.फिल, पीएच.डी. करणे अपरिहार्य आहे.)

नकारात्मकतेवर आधारलेली आणि न्यूनगंड जोपासणारी ही विचार किंवा निर्णयपद्धती आहे. तरुण पिढीवर अन्याय करणारी.

### योग्य सूत्रांची रूपरेषा

परीक्षेतले टॅलेंट हे योग्य बुद्धिमत्ता मोजण्याचे एक मोजमाप आहे; पण 'एकमेव' नाही. आपण बहुतेक सर्वांनी आलटून–पालटून हा अनुभव घेतलेला असतो की, आपल्या वर्गातील एखादा मुलगा–मुलगी 'हुशार' आहे... तासाला चालू असलेले विषय त्याला–तिला भरभर समजतात... इतकेच नाही तर एखाद्या विषयातील काही अडचण आल्यास वर्गातील मुलेमुली त्या हुशार मुलामुलीला प्रश्न विचारतात... पण परीक्षेत मात्र या 'हुशार' मुलामुलीला गुण कमी मिळतात. त्याऐवजी दुसराच एखादा कोणी तरी चांगले गुण मिळवून जातो.

विषयाचे ज्ञान आणि परीक्षेतील गुण या दोन पूर्णतः वेगळ्या गोष्टी आहेत. त्यामुळे गुणांवरून आपण मुलगा–मुलगी हुशार आहे की नाही हे मोजमाप करू लागलो तर तर ते चुकीचे आहे. 'तुला दहावीमध्ये ६०० पैकी किती गुण मिळाले, त्यातही विज्ञानमध्ये किती मिळाले, त्यानंतर अकरावीला विज्ञान शाखेला जाऊन आणि पुढे बारावीला वैद्यकीय अभियांत्रिकीला जाण्याएवढे गुण मिळाले असतील तरच तू बुद्धिमान' असं जर पालक म्हणत असतील तर तो तरुणपिढीवर फार मोठा अन्याय आहे.

माणूस छापाचा गणपती नाही. सर्व मुलामुलींना, तरुणांना, माणसांना छापाचा गणपती समजून आपण एकाच साच्यात घालू लागलो तर अशी स्थिती होईल की, करायला गेलो गणपती; तयार होताहेत माकडे !

पुस्तकी अभ्यास हे बुद्धिमत्तेचे एक महत्त्वाचे क्षेत्र आहे, ज्याला

वैज्ञानिक शब्द आहे. 'ॲकॅडमिक इंटेलिजन्स'. ज्याच्याकडे ॲकॅडमिक इंटेलिजन्स आहे, त्याने त्याचे पुढचे करिअर त्या ॲकॅडमिक्सनुसार करावे. याचा अर्थ डॉक्टर अथवा इंजिनिअर होऊ नये असा नाही. हीदेखील चांगलीच करिअर आहेत. ज्यांचे जीवशास्त्र चांगले आहे, त्याचा जीव त्यामध्ये रमतो, त्याला त्यात उत्साह वाटतो, त्याने आनंदाने विज्ञान आणि नंतर भौतिक, रसायन व जीवशास्त्र घेऊन डॉक्टर जरूर व्हावे. तेच गणिताबद्दलही आहे. मात्र जीवशास्त्र आणि गणित असेल तरच तो मुलगा-मुलगी बुद्धिमान आहे, डॉक्टर-इंजिनिअर म्हणजेच उत्तम करिअर आहे, या गैरसमजुती आहेत.

ॲकॅडमिक्स इंटेलिजन्समध्येही केवळ पीसीबी अथवा पीसीएम म्हणजेच ॲकॅडमिक्स नाहीये. प्युअर सायन्स, कॉमर्समधील अकौंटन्सी, मॅनेजमेंट, इकॉनॉमिक्स, स्टॅटेटिक्ससारखे विषय किंवा आर्ट्‌समधील राज्यशास्त्र, समाजशास्त्र अथवा हिंदी, मराठी, उर्दू, कन्नड साहित्य हीदेखील बुद्धिमत्तेची क्षेत्रे आहेत आणि चांगले करिअरपर्याय आहेत.

त्यामुळे ॲकॅडमिक इंटेलिजन्स म्हणजे सर्वस्व नाही आणि त्या ॲकॅडमिक इंटेलिजन्सचेही मोजमाप परीक्षेतील गुणांवर करणे हे त्याहून खरे नाही.

आमच्या एका मित्रानेच शब्दरचना वापरली होती की, आजचे सगळे विद्यार्थी 'मार्क्सवादी' झाले आहेत. या अर्थाने 'मार्क्सवादी' होणे म्हणजे गुणवत्ता नाहीये. विषयांचा अभ्यास आणि त्यानंतर हुशारीने परीक्षेत गुण मिळवणे याचा अर्थ केवळ तो मुलगा-मुलगीच हुशार आहे असे नाही. क्रिकेटसारखा कोणताही खेळ उत्तम खेळता येणे, अंगामध्ये कोणतीही एखादी कला असणे की जी उत्तम करता येणे, कोणते तरी सामाजिक कार्य हाती घेणे आणि टीम एकत्र करून त्याला आकार देणे, राजकीय नेतृत्व देणे, शेती उत्तम करणे, फुलांची रचना करणे, केस चांगले कापता येणे ही सर्वही बुद्धिमत्तेचीच क्षेत्रे आहेत. याला वैज्ञानिक शब्द आहे 'बिहेवियरल इंटेलिजन्स'. जगण्या-वागण्यातील बुद्धिमत्ता. ती दरवेळी केवळ पुस्तकी अभ्यासावरून दिसत नाही.

## करिअर घडवण्याची सूत्रे

तुम्हा सर्वांना अनुभव असेलच... एखाद्या मुला-मुलीला परीक्षेत कमी गुण मिळालेले असतात; पण जीवनाच्या अनेक क्षेत्रांसाठी त्याच्या अंगात अनेक अनमोल गुण असतात. लोकहो, तीसुद्धा बुद्धिमत्ताच आहे. त्यामुळे करिअरसंदर्भात साचेबद्ध विचार न करता मला कळलेल्या भारतीय विचारातीलही मूळ सूत्रे आणि त्या सर्वांचा आधुनिक प्रगतीशीही मेळ घालून करिअर कसे घडवावे याची जी सूत्रे समोर येतात ती पाहू या.

१) **'स्व'ची ओळख** : विज्ञानाने आपल्याला हे सिद्ध करून दिलेय की, ज्याचा मेंदू शाबूत आहे, ज्याच्या मेंदूला जीवन जगताना कोणत्याही टप्प्यावर कोणतीही इजा झालेली नाही असा प्रत्येक माणूस बुद्धिमान आहेच. जन्माच्या वेळी काही गुंतागुंत झाली असेल, प्राणवायू पुरेसा मिळाला नसेल किंवा पुढे जाऊन आयुष्यात काही अपघात झाला असेल किंवा काही मानसिक कारणांचा परिणाम मेंदूवर झाला असेल तर माणूस म्हणून आपण त्यांच्याप्रति प्रेम आणि सहानुभूती बाळगली पाहिजे. पण विज्ञानाने हे सिद्ध केले आहे की, असे काही न झालेली आपण कोट्यवधी सामान्य माणसे – याला शास्त्रीय शब्द आहे. मेंदूला फिजिऑलॉजी इजा न झालेली – बुद्धिमान आहेत. पण प्रत्येकाची बुद्धी वेगवेगळ्या क्षेत्रात चालते.

सगळ्यांनीच ठरलेले विषय, त्यातील ठरलेली परीक्षा आणि त्यात अपेक्षित असणारे गुण यामागे लागूनही योग्य नाही आणि त्यामापानं सर्वांना मोजणेही योग्य नाही.



मग योग्य काय आहे? तर तुझी बुद्धी कोणत्या क्षेत्रात चालते ते ओळख. ते तुझे करिअर आहे. याला आपला भारतीय शब्द आहे 'स्व'ची ओळख'. हा या देशामध्ये वेद-उपनिषद आणि बुद्ध-महावीरांपासून चालत आला; तिकडे ग्रीक संस्कृतीमध्ये सॉक्रेटिस, प्लूटो, ॲरिस्टोटलही हेच म्हणत होते, चिनी संस्कृतीतील लाओत्से कन्फ्युशियसही हेच म्हणतात आणि आजच्या आधुनिकातील आधुनिक सर्व विचारातही हेच सांगितले जाते. तुझ्या जीवनाची इमारत उभी करायची असेल तर आत डोकावून पाहा. तुला काय येते, तुझा जीव कशात रमतो हे पाहा.

शाळा-कॉलेजमध्ये मोठे होताना आपण वेगवेगळ्या ॲक्टिव्हिटिज करतो. त्यातील कशामध्ये आपला जीव रमतो, काय समोर आल्यानंतर आपल्याला सहजपणाने समजते ते तुझे क्षेत्र आहे. तुझी बुद्धी त्या क्षेत्रातच चालते. तुझे करिअर त्या क्षेत्रातच करायला हवे. याला मी नाव दिलेय करिअर घडवण्याची त्रिसूत्री.

ही त्रिसूत्री म्हणजे स्वतःला ओळख...

त्यानुसार करिअरची दिशा ठरव...

आणि मुख्य आव्हान आहे ते निवडलेल्या क्षेत्रामध्ये उत्तम आणि प्रतिभावंत हो...!

## तुलना टाळा...

आपल्यापैकी बहुतेकांना दुसऱ्याशी तुलना करण्याची वाईट खोड

असते. खरे तर आपण वगळता इतर जसे आहेत तसे असूदेत. त्यांना शुभेच्छा द्या. त्यांचा मत्सर करण्यापेक्षा तू तुझ्या आत डोकावून पाहा. तुझ्या जीवनाची इमारत तुला काय येते यावर उभी कर. तुला काय येत नाही यावर उभी करण्याचा प्रयत्नच करू नको. तरच त्यातून होणारे दुःख, त्यातून निर्माण होणारा न्यूनगंड आणि ते आले पाहिजे अशी करून घेतलेली चुकीची समजूत आणि ज्यांना ते येते त्यांविषयीचा मत्सर हे काहीच होणार नाही. स्वतःबद्दल न्यूनगंड आणि दुसऱ्याबद्दल मत्सर या दोन्हीही अत्यंत विघातक – भावना आहेत. निर्मितीक्षम आहे तुझ्या आत डोकावून पाहा. स्वतःला शोध आणि त्यानुसार करिअर ठरव.

राज्यभरातील, देशभरातील पालकांकडून करिअर निवडीसंदर्भात एक आश्चर्यकारक वाक्य नेहमी ऐकायला मिळते. ते म्हणजे विशिष्ट करिअरला संधी आहे का? या वाक्याचे आश्चर्य वाटण्याचे कारण म्हणजे संधी कधीही करिअरला नसते. ते –ते करिअर करण्यासाठी आवश्यक असणारे गुण तुझ्यात असतील तर तुला संधी आहे. म्हणजेच करिअरला संधी नसून त्या व्यक्तीला संधी असते. करिअरला स्कोप आहे असे म्हणणे म्हणजे गणितामध्ये १०० पैकी १०० गुण मिळवायला संधी असल्यामुळे तुम्ही सर्वांनीच गणित घ्या असे म्हणण्यासारखे आहे. त्यामुळे करिअर सगळी समान असतात. वैद्यकीय, अभियांत्रिकी, आयएएस केले तरच तो मुलगा–मुलगी हुशार आहे हा गैरसमज आहे.

आपण आपले व्यक्तिमत्त्व ओळखले पाहिजे. आवडनिवड ओळखली पाहिजे. याचे कमालीचे महान पण साधे सोपे सूत्र आहे जीवन जगण्यातला आनंद कशात आहे ते शोधणे !

स्वामी विवेकानंदांचे एक सुंदर वाक्य आहे. इन युवर लाईफ डू व्हॉट यू एन्जॉय; बट इफ यू कांट; देन लर्न टू एन्जॉय व्हॉट यू डू. क्षेत्र निवडताना तुझ्या आनंदाचे निवड. त्यानुसार करिअर कर आणि खरे आव्हान म्हणजे निवडलेल्या क्षेत्रामध्ये उत्तम आणि प्रतिभावंत बनणे. त्यासाठी आवश्यक असते ती तपश्चर्या.



एखादा डॉक्टर किंवा इंजिनिअर झाला म्हणजेच तो आयुष्यात यशस्वी होईल, हे मुळातच चुकीचे आहे. तो उत्तम आणि प्रतिभावंत डॉक्टर अथवा इंजिनिअर झाला तर तो खऱ्या अर्थाने यशस्वी झाला असे म्हणता येईल. हेच सूत्र इतरही क्षेत्रांना लागू आहे. विज्ञान विषय घेऊन कुणी शास्त्रज्ञ झाला, कला शाखेत जाऊन कुणी लेखक झाला किंवा वाणिज्य शाखा निवडून सीए, सीएस, आयसीडब्ल्यू, विधी, व्यवस्थापन यामध्ये 'उत्तम' बनला तर तोही यशस्वीच.

इतकेच नव्हे तर पुस्तकी शिक्षण थांबल्यानंतर मैदानावर शतक ठोकणे, उत्तम अभिनय करणे, गाता उत्तम येणे, समाजाला सामाजिक किंवा राजकीय नेतृत्व देणे, उत्तम पत्रकारिता करता येणे, लेखन करता येणे हे सर्वही बुद्धिमत्ताच आहे.

करिअरमधले सर्वांत मोठे आव्हान आहे ते निवडलेल्या क्षेत्रात उत्तम आणि प्रतिभावंत पाहिजे.

**व्यवसाय मार्गदर्शन**

'स्व'ची ओळख कशी करणार?, विषय वाचताना तुमच्या मनात एक प्रश्न आला असेल की त्रिसूत्री तर समजतेय; पण कशी करायची स्वची ओळख. याची सूत्रे आश्चर्य वाटेल इतकी साधी आहेत. आतापर्यंत लिहिलंय त्यामध्ये ती आली आहेत. पण पुढची सूत्रे सांगण्यापूर्वी एका ओळीत ती मांडतो : 'स्व'ची ओळख करण्यासाठी तुझ्या आत तू डोकावून पाहा. जरा शांतपणाने स्वतःला प्रश्न विचार – तुला काय आवडते, तुला काय समजते, तुझा जीव कशात रमतो, काय करताना तुला ते कष्ट न वाटता मजा वाटते, आनंद मिळतो, काय करत असताना तुला तहानभुकेचे भान राहत नाही. यातून मिळणारे उत्तर म्हणजेच तुझे क्षेत्र.

तरीही यासाठी काही साधने आहेत का? निश्चितच आहेत. यातील एक म्हणजे डायरी लिहिणे. दुसरे म्हणजे पालकांची भूमिका. जन्मापासून मूल पालथे पडते, धडपडते, चालू लागते, पहिला शब्द उच्चारते इथपासून पालकांनी आपल्या मुलामुलींना पाहिलेले असते. त्यामुळे आपल्या मुलाचा जीव कशात रमतो, त्याची बुद्धी कशात चालते हे आईवडील निश्चितपणाने चांगले सांगू शकतात. आई–वडिलांच्या अतिअपेक्षांचे ओझे मुलामुलींवर नसेल तर आईवडील मुलामुलींमधील गुण ओळखून दिशा देऊ शकतात. मला वाटते आपल्या संस्कृतीतले 'मातृदेवो भव', 'पितृदेवो भव' हे सूत्र याच जाणिवेमधून निर्माण झालेले असावे.

त्यापाठोपाठ येते आचार्य देवो भव. शिक्षक मुलामुलींना शाळेपासून वाढत्या वयात पाहत असतो. शिक्षकाचे काम नुसते तो–तो विषय शिकवणे नाहीये. कारण विषय हे केवळ माध्यम आहे. घडवायचाय तो विद्यार्थी. चांगला शिक्षक त्या विद्यार्थ्यामधील गुण ओळखतो. त्याची त्याला जाणीव करून देतो. म्हणजेच त्या विद्यार्थ्याची तो दिशा ठरवतो.

याखेरीज समवयीन मित्र–मैत्रिणींचाही –ज्याला मानसशास्त्रातला शब्द आहे 'पीअर ग्रुप्स'– करिअरची दिशा ठरण्यामध्ये मोठा प्रभाव असतो. अनेक वेळा आईवडील आणि शिक्षकांपेक्षा आपले समवयीन काय सांगताहेत याचा प्रभाव मुलामुलींवर अधिक असतो.


याखेरीज अलीकडच्या काळात करिअरची दिशा ठरवण्यासाठी तुमचा कल कशाकडे आहे, हे तपासण्यासाठी नवी शास्त्रीय साधनेही निघाली आहेत. उदाहरणार्थ कल चाचणी. पण ती अंतिम समजण्याचे कारण नाही. तरीही शास्त्रशुद्ध चाचणी, तिचा आलेला निकाल, त्याची मानसशास्त्रातील तज्ज्ञाबरोबर केलेली चर्चा या साऱ्यांचा उपयोग होऊ शकतो.

काही वर्षांपूर्वीपर्यंत आयक्यू म्हणजेच इंटेलिजन्स कोशन्ट

(बुद्ध्यांक) ही संकल्पना होती. मुलगा अथवा मुलगी किती बुद्धिमान आहे हे तपासण्याची चाचणी. पण शास्त्रज्ञांना असे लक्षात आले की आयक्यूचं आणि जीवनातील यशाचे काही नाते दिसत नाहीये. त्यातूनच संकल्पना पुढे आली ती म्हणजे इक्यू अर्थात इमोशनल कोशन्ट (भावनांक). तिचा निर्माता आहे डॅनियल गोलमन. त्याने आपल्या ग्रंथांमध्ये सांगून ठेवलेय की, भारताच्या अध्यात्म विचारातून मला ही संकल्पना सुचली.

जीवनातील प्रेरणा, जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन, यशाने चढून न जाणे आणि अपयशाने खचून न जाणे आणि सतत शिकण्याची तयारी हे सर्व मिळून असते ते 'इक्यू'. शास्त्रज्ञ म्हणाले की, ज्याच्याकडे हे आहे तो होतो जीवनामध्ये यशस्वी. यासाठी आपला स्वतःचा इक्यू ओळखणे महत्त्वाचे आहे. तो इक्यू घडवताही येतो. हे आहे करिअर घडवण्याचे सूत्र. म्हणून आहे ही जीवन आणि करिअर घडवण्याची त्रिसूत्री. ती त्रिसूत्री घेऊन जीवनामधला 'जिनियस' घडवण्याकडे जायचे आहे.

## जिनियस'ची जोपासना



मेंदूच्या शास्त्राचा अत्यंत अभ्यास करून ही मांडणी करण्यात आली आहे की प्रत्येक माणूस हा जन्मजात बुद्धिमान असतोच. मेंदूशास्त्र आपल्याला सांगते की, कळणे ही सर्व प्रक्रिया मेंदू करत असतो. नाक, कान, डोळे, त्वचा या आपल्या ज्ञानेंद्रियांकडून माहिती गोळा करून मेंदूकडे पाठवली जाते. त्या माहितीचा अर्थ लावणे, पृथक्करण करणे, ती माहिती संग्रहित करून ठेवणे आणि गरजेनुसार त्यातील माहिती वापरून कृती करणे हे सगळे काम मेंदू करतो. एवढेच नव्हे तर हात-पाय या कर्मेंद्रियांनाही आदेश मेंदूच देतो. भोवतीची ज्ञानेंद्रियांनी गोळा केलेली माहिती मेंदूपर्यंत जाणे, त्याचे मेंदूने पृथक्करण करून सुसंगत अर्थ लावणे आणि त्यानुसार मेंदूने कर्मेंद्रियांना आदेश देणे आणि कर्मेंद्रियांची त्या आदेशांची पालन करण्याची क्षमता असणे याच्या मुळाशी आहे न्युरल सर्किट. हे मेंदूतील सर्किट आहे.

विज्ञानाने हे सांगितले आहे की, एखादा माणूस त्याच्या क्षेत्रातील जिनियस आहे याचा अर्थ त्या क्षेत्रातील माहितीचे संकलन, पृथक्करण, आदेश देणे या सर्वांचे त्याच्या मेंदूतील सर्किट अतिशय वेगाने आणि तत्परतेने काम करत आहे. या अर्थाने सर्वजण बुद्धिमान आहेत.

इतकेच नव्हे तर मेंदूचे न्युरल सर्किट गतिमान बनवता येते.

आपण म्हणतो की, सचिन तेंडुलकर अजब स्ट्रोक मारतो किंवा मेसी जबरदस्त फुटबॉल खेळतो किंवा अटलबिहारी वाजपेयींचे वक्तृत्व अत्यंत अजब आहे... अशी अनेक उदाहरणे सांगता येतील. याचा अर्थ त्या विषयात त्या व्यक्तींचा मेंदू गतीने चालतो. मेंदूच्या शास्त्राने सिद्ध केलेय की, प्रत्येक जण आपला मेंदू अशा रितीने काम करू शकेल अशी उंची गाठू शकतो. त्याला आधुनिक मेंदूविज्ञानाने असे म्हटलेय की, विचारपूर्वक त्या एका क्षेत्राला केलेली १० हजार तासांची तपश्चर्या.

## कसे घडवायचे स्वतःला जिनियस?

भारतीय विचारांसहित मेंदूचे हे न्युरोसायन्स मला असे शिकवते की, पहिले पाऊल आहे दृढसंकल्प. तो लागतो मनाशी. त्या मनाला दिलेली जाणीव म्हणजे कॉन्शसनेस. संकल्प आणि कॉन्शसनेस घेऊन करावा लागतो कागदावरचा प्लॅन. तो प्लॅन १० हजार तासांचा आहे. रोजचे दोन-तीन-चार तास आपण स्व ओळखून निवडलेल्या क्षेत्रासंदर्भात शिकत जाणे, घडत जाणे या टप्प्याने १० हजार तासांची तपश्चर्या. मला हे न्युरोसायन्स वाचतानाही हे वाटले की, एखाद्या क्षेत्रातील तज्ज्ञ होण्यासाठी १२ वर्षे लागतात. त्याला तप म्हणतात. याचप्रमाणे निवडून एका क्षेत्राला १० हजार तास देणे म्हणजेच ८ ते १२ वर्षे लागतात. दहावीच्या सुमाराला मुला-मुलींनी, पालकांनी, शिक्षकांनी, त्याच्या भोवतीच्या समाजाने आणि त्याला आधार असणाऱ्या सरकारी योजनांनी प्रत्येक मुलामुलीमधील 'स्व' ओळखायला मदत केली आणि त्यानुसार निवडलेल्या क्षेत्रात - जी सर्व समान आहेत- उत्तमता आणि प्रतिभेची जोपासना करत जिनियसची उंची गाठली तर त्या व्यक्तीचेही आयुष्य उत्तम घडणार आहे आणि त्यातून समाज व राष्ट्राचेही उत्थान घडून येणार आहे.

ही जिनियसची जोपासना प्रत्येकाने कशी करायची यासाठी प्राथमिक आणि साधी-सोपी कृतीची सूत्रे आहेत.

१) **योग** : योग हे तुमचे-माझे भारतीय असण्यातलेही लेणे आहे. चित्ताची एकाग्रता, चित्ताची प्रसन्नता, उत्तम आरोग्य, ह्दयाचे-फुफ्फुसाचे-मेंदूचे कार्य उत्तम होणे, चांगली भूक, चांगली झोप यांसाठी योग हा 'ऑल इन वन' पर्याय आहे.

२) **स्वाध्याय (सेल्फस्टडी)** : समोर येणाऱ्या विषयाचा अभ्यास स्वतः कसा करायचा म्हणजेच ज्ञानसाधना कशी करायची याच कौशल्य.

३) **दोन भाषांवर प्रभुत्त्व (बायलिंग्वॅलिझम)** : न्युरोसायन्सने असे सूत्र मांडले आहे की, आपण एखादी भाषा शिकतो तेव्हा नुसते शब्द, वाक्य, व्याकरण शिकत नाही; तर त्या भाषेबरोबर एक नवी संस्कृती, वागण्याबोलण्याची पद्धत शिकतो. याचाच अर्थ आहे की आपण एक भाषा शिकतो तेव्हा त्या भाषेचे मेंदूत न्युरल सर्किट तयार होते.

न्युरोसायन्सने सिद्ध केल्यानुसार, जेव्हा माणूस दोन भाषा शिकतो तेव्हा त्याच्या न्युरल सर्किटचा वर्ग होतो. कारण दोन भाषांमधील न्युरल सर्किट तयार होते. त्यांचे मेंदूत सिंथॅसिस होते. त्यामधून त्या माणसाची प्रतिभा फुलते. ही जिनियस घडवण्याची सूत्रे आहेत.

**माजी सनदी अधिकारी, पुणे**
**संपर्क: ०९८८१९६८२३४५**

व्यवसाय मार्गदर्शन



**कार्पोरेट क्षेत्रातील व्यवस्थापन सुव्यस्थितपणे नियंत्रित करण्यासाठी कंपनी सेक्रेटरी महत्त्वाची भूमिका बजावतात. कंपनीच्या इतर शाखाप्रमुखांशी समन्वय, सहकार्य, संपर्क आणि सुसंवाद साधण्याचे काम कंपनी सेक्रटरी करत असतो.**

# कार्पोरेट प्रशासनाचे सूत्रधार

उत्कृष्ट कार्पोरेट प्रशासनासाठी उपयुक्त ठरणारे उच्च दर्जाचे मनुष्यबळ विकसित करण्यासाठी कंपनी सेक्रेटरीच्या अभ्यासक्रमाची संरचना करण्यात आली आहे. कार्पोरेट लॉ, प्रशासन आणि व्यवस्थापन या क्षेत्रातील कौशल्यप्राप्त मनुष्यळाच्या निर्मितीसाठी कंपनी सेक्रेटरी हा अभ्यासक्रम उपयुक्त ठरतो. नियामक प्राधिकरण, संचालक मंडळ, शेअरधारक आणि कंपनीचे इतर भागधारक यांच्यामधील महत्त्वाचा दुवा म्हणून कंपनी सेक्रेटरीला कार्य करावे लागते. कंपनी सेक्रेटरी या व्यवसायाला विकसित करणारी आणि नियंत्रित करणारी 'द इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरिज ऑफ इंडिया' ही आपल्या देशातील एकमेव संस्था आहे. ही संस्था कंपनी सेक्रेटरीचा अभ्यासक्रम चालवते. हे अभ्यासक्रम पोस्टल (पत्राचार) आणि मौखिक शिकवणी पद्धतीने करता येतात. वेब आधारित, व्हिडिओ आधारित आणि लाइव्ह व्हर्च्युअल क्लासरूमद्वारे ई-लर्निंगची सुविधा उपलब्ध करून दिली जाते.

**कंपनी सेक्रेटरी होण्याचे टप्पे –** (१) १२ वीनंतर तीन टप्पे आहेत- फाऊंडेशन अभ्यासक्रम विज्ञान, कला, वाणिज्य, उपयोजित कला (फाइन आर्ट्स) या विषयातील १२ उत्तीर्ण विद्यार्थ्यांना करता येतो. या अभ्यासक्रमाला वर्षातून दोनदा प्रवेश घेता येतो. दरवर्षी ३१ मार्चला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षा त्याच वर्षीच्या डिसेंबर महिन्यात घेतली जाते. ३० सप्टेंबरला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षा दुसऱ्या वर्षिच्या जून महिन्यात होते. (२) एक्झिक्युटिव्ह अभ्यासक्रम हा कोणत्याही शाखेतील पदवीधराला करता येतो. मात्र तो फाइन आर्ट्स पदवीधरास करता येत नाही.

(३) प्रोफेशनल प्रोग्रॅम हा अभ्यासक्रम एक्झिक्युटिव्ह अभ्यासक्रम केलेल्या सर्व विद्यार्थ्यांना करता येतो. पदवी अभ्यासक्रमानंतर हा अभ्यासक्रम करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दोन टप्पे आहेत- एक्झिक्युटिव्ह आणि प्रोफेशनल प्रोग्रॅम. तीनही अभ्यासक्रम पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. प्रत्येक विषयात किमान ४० टक्के आणि सरासरीने ५० टक्के गुण मिळालेल्या विद्यार्थ्याला उत्तीर्ण घोषित केले जाते. १५ दिवसाचे मॅनेजमेंट स्किल्स ओरिएंटेशन प्रोग्रॅम- प्रोफेशनल प्रोग्रॅम पूर्ण केल्यावर १५ दिवसांचे प्रोफेशनल प्रोग्रॅम उत्तीर्ण व्हावे लागते. त्यानंतर लायन्सशिएट आयसीएसआय म्हणून नोंदणी करता येते.

**पत्ता-** डायरेक्टोरट ऑफ अकॅडेमिक्स ॲण्ड प्रोफेशनल डेव्हलपमेंट, द इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरिज, आयसीएसआय हाऊस, २२ इन्स्टिट्युशनल एरिया, लोधी रोड, न्यू दिल्ली- ११०००३, **दूरध्वनी-** ०११-२४६४४४३१ **संकेतस्थळ** – www.icsi.edu.in, **ई-मेल-** info@icsi.edu.in

## इंटिग्रेटेड अभ्यासक्रम

द इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरी आणि सेंटर फॉर कार्पोरेट गर्व्हनन्स आणि रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग या संस्थांनी संयुक्त सहकार्याने तीन वर्षे कालावधीचा इंटिग्रेटेड कंपनी सेक्रेटरी कोर्स हा अभ्यासक्रम सुरू केला आहे. यामध्ये एक वर्षाच्या प्रत्यक्ष प्रशिक्षणाचा समावेश आहे. या अभ्यासक्रमास ५० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. अर्हता- कोणत्याही शाखेतील ५० टक्के गुणांसह पदवी किंवा कंपनी सेक्रटरी अभ्यासक्रमातील फाउंडेशन कोर्स उत्तीर्ण. वयोमर्यादा प्रत्येक वर्षीच्या १ जुलै रोजी २६ वर्षापेक्षा अधिक नसावे. अभ्यासक्रमाच्या निवडीसाठी ऑनलाइन परीक्षा घेतली जाते. अंतिम निवड ग्रुप डिस्कशन (समूह चर्चा) आणि मुलाखतीनंतर केली जाते. CAT/XAT/NMAT/SNAP/MH-CET या सारख्या परीक्षांमध्ये सुयोग्य गुणांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना या परीक्षेपासून सूट मिळू शकते. मात्र तशी माहिती अर्जासोबत नोंदवावी लागते. **पत्ता-** प्लॉट नंबर १०१, सेक्टर १५, इन्स्टिट्युशनल एरिया, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई- ४००६१४, **दूरध्वनी-** ०२२- ४१०२१५०१,**फॅक्स-**२७५७४३८४, **संकेतस्थळ** – www.icsi.edu.in/ ccgrt, **ई-मेल-** ccgrticsi.edu.in

**टीम लोकराज्य**

# दर्जेदार संस्था, सर्वोत्कृष्ट शिक्षण

**भारत सरकारने विविध ज्ञानशाखेत शिक्षण-प्रशिक्षण देणाऱ्या आणि संशोधनास वाव देणाऱ्या संस्थांची स्थापना केली आहे. या सर्व संस्था दर्जेदार आणि जागतिक कीर्तीच्या आहेत. या संस्थांमध्ये गेल्या काही वर्षांमध्ये अतिशय अल्प संख्येने मराठी मुलांची निवड होते. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांनासुद्धा या संस्थांच्या प्रवेश प्रक्रियेविषयी विशेष अशी कल्पना नसते. तसेच वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाविषयी जेवढी जागरूकता पालक वा विद्यार्थ्यांमध्ये असते, तेवढी या संस्थांबद्दल दिसून येत नाही.**

**सुरेश वांदिले**

भारत सरकारने विविध ज्ञानशाखेत शिक्षण-प्रशिक्षण देणाऱ्या आणि संशोधनास वाव देणाऱ्या संस्थांची स्थापना केली आहे. या सर्व संस्था दर्जेदार आणि जागतिक कीर्तीच्या आहेत. या संस्थांमध्ये अतिशय दर्जेदार पायाभूत सोयीसुविधा असतात. उच्चशिक्षित व अनुभवी प्राध्यापक असतात. उत्कृष्ट प्रयोगशाळा, वाचनालये असतात. उत्तम दर्जाच्या राहण्याच्या सुविधा असतात. अनेक संस्था प्रवेश मिळालेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती देते. या संस्थांमधील निवड प्रक्रिया अतिशय पारदर्शक असते. म्हणजे फक्त तुमच्या गुणवत्तेवरच प्रवेश दिला जातो. राखीव जागांचे सर्वनियम कसोशीने पाळले जातात. अभ्यासक्रमांची फी अल्प असते. काही संस्थांमधील फी ही जास्त वाटत असली तरी त्यासाठी शैक्षणिक कर्ज मिळवून देण्यासाठी याच संस्थांमार्फत मदत केली जाते. या प्रत्येक संस्थांमध्ये प्लेसमेंट सेल असून, त्यामार्फत विद्यार्थ्यांना भारतातील व नामवंत कंपन्या वा उद्योगांमध्ये नोकरी मिळवून दिली जाते.

या संस्थांमध्ये गेल्या काही वर्षांमध्ये अतिशय अल्प संख्येने मराठी मुलांची निवड होते. या संस्थांमध्ये अल्प प्रमाणात मराठी मुलांना प्रवेश मिळण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांनासुद्धा या संस्थांच्या प्रवेश प्रक्रियेविषयी विशेष अशी कल्पना नसते. तसेच वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाविषयी जेवढी जागरूकता पालक वा विद्यार्थ्यांमध्ये असते, तेवढी या संस्थांबद्दल दिसून येत नाही. या संस्थांमधील अभ्यासक्रम हे जून किंवा जुलै २०१८ मध्ये सुरू होणार असले तरी त्यांची प्रवेश प्रक्रिया ही ऑक्टोबर/नोव्हेंबर-२०१७ मध्ये सुरू झाली असून, पुढील काही दिवसात ही प्रक्रिया संपेल. जर विद्यार्थी किंवा त्यांच्या पालकांनी या संस्थांचे प्रवेश अर्ज भरले नसतील तर त्यांना या संस्थांच्या प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या चाळणी परीक्षेला बसता येणार नाही. दरवर्षी नेमके असेच होत असते. त्यामुळे मराठी मुलांना या संस्थांना प्रवेश मिळण्यात मर्यादा येतात.

अशा महत्त्वाच्या शैक्षणिक संस्था पुढीलप्रमाणे आहेत.

### नॅशनल डिफेन्स अकॅडमी

अनेक विद्यार्थ्यांना भारतीय लष्करातील भूदल, नौदल आणि वायूदल यामध्ये अधिकारी होण्याची महत्त्वाकांक्षा व इच्छा असते. ही इच्छा नॅशनल डिफेन्स अकॅडमी परीक्षा व कम्बाईन्ड डिफेन्स सर्व्हिस एक्झामिनेशन या परीक्षेद्वारे मिळू शकते.

१२ वीच्या विद्यार्थ्यांना नॅशनल डिफेन्स अकॅडमी आणि नेव्हल

अकॅडमी या संस्थेमध्ये प्रवेश दिला जातो.त्यासाठी दरवर्षी एनडीए परीक्षा वर्षातून दोनदा घेतली जाते. एनडीए आणि एनए परीक्षेची प्रवेश प्रक्रिया जानेवारी महिन्यात सुरू होणार आहे. अर्ज भरण्याची शेवटची तारीख ५ फेब्रुवारी २०१८ आहे. ही परीक्षा संघ लोकसेवा आयोगामार्फत घेतली जाते. ही परीक्षा २२ एप्रिल २०१८ रोजी घेतली जाणार आहे. या परीक्षेचे महाराष्ट्रात मुंबई, नागपूर ही केंद्रे आहेत. या परीक्षेद्वारे भूदलात जाण्यासाठी १२वीमधील कोणत्याही शाखेतील विद्यार्थी पात्र आहेत. मात्र नौदल आणि वायुदलात जाण्यासाठी १२वी विज्ञानशाखेत गणित आणि भौतिकशास्त्र हे विषय घेतलेलेच विद्यार्थी पात्र ठरतात. या परीक्षेद्वारे निवडलेल्या विद्यार्थ्यांना एकूण चार वर्षांचे प्रशिक्षण दिले जाते. यापैकी तीन वर्षांचे प्रशिक्षण खडकवासला येथील एनडीए अकॅडमी येथे आणि भूदलासाठी निवड झालेल्या उमेदवारांना एक वर्षाचे प्रशिक्षण इंडियन मिलिटरी अकॅडमी देहरादून येथे, वायू दलासाठी निवड झालेल्या उमेदवारांचे एक वर्षाचे प्रशिक्षण इंडियन एअर फोर्स अकॅडमी हैदराबाद येथे आणि नौदलासाठी निवड झालेल्या उमेदवारांना एक वर्षाचे प्रशिक्षण केरळ राज्यातील एजिमाला येथील इंडियन नेव्हल अकॅडमी येथे दिले जाते.

**संकेतस्थळ** – http://upsconline.nic.in, **दूरध्वनी**– ०११–२३०९८५४३/२३३८५२७१


व्यवसाय मार्गदर्शन

## इंडस्ट्रिअल डिझाईन सेंटर (आयआयटी मुंबई)

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मुंबईस्थित इंडस्ट्रिएल डिझाईन सेंटर या संस्थेमध्ये डिझाईन विषयाशी संबंधित पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम करता येतात. आयआयटी मधील सर्व अभ्यासक्रमाच्यां प्रवेशासाठी जॉईट एन्ट्रन्स एक्झामिनेशन घेतली जाते. मात्र इंडस्ट्रिएल डिझाईन सेंटरमधील अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी स्वतंत्र अशी यूसीड म्हणजे अंडरग्रज्यूएट कॉमन एन्ट्रन्स एक्झामिनेशन फॉर डिझाईन ही परीक्षा घेतली जाते. या परीक्षेद्वारे चार वर्षे कालावधीच्या बॅचलर ऑफ डिझाईन आणि पाच वर्षे कालावधीच्या बॅचलर ऑफ डिझाईन–मास्टर ऑफ डिझाईन म्हणजेच बी.डिझाईन–एम.डिझाईन या इंटिग्रेटेड अभ्यासक्रमास प्रवेश दिला जातो.

या अभ्यासक्रम इंडस्ट्रिअल डिझाईन, व्हिज्युअल कम्युनिकेशन, ॲनिमेशन डिझाईन अशा विषयांमध्ये करता येतो. मुंबई आणि जबलपूर कॅम्पसमधील डिझाईन अभ्यासक्रमासाठी १२वीमधील विज्ञान, कला, वाणिज्य या कोणत्याही शाखेतील विद्यार्थ्याला प्रवेश मिळू शकतो. या परीक्षेसाठी महाराष्ट्रात पुणे, मुंबई, नागपूर ही केंद्रे आहेत.

**पत्ता**– यूसीइडी ऑफिस आयआयटी बॉम्बे पवई, मुंबई–४०००७६, **संपर्क– संकेतस्थळ** – www.uceed.iitb.ac.in, **दूरध्वनी**– ०२२–२५७६४०६३/९०९३/९०९४



## नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन



नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन. ही संस्था डिझाईन या विषयातील जगातील सर्वोत्कृष्ट संस्थांपैकी एक समजली जाते.गेल्या काही वर्षात अल्प संख्येने या संस्थेत मराठी मुलांना प्रवेश मिळाला आहे. या संस्थेची प्रवेश परीक्षा दरवर्षी साधारणत: जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात घेतली जाते. महाराष्ट्रात पुणे, मुंबई,नागपूर या ठिकाणी या परीक्षेचे केंद्रे आहेत. या संस्थेचे कॅम्पस अहमदाबाद, विजयवाडा आणि कुरुक्षेत्र येथे आहे. अहमदाबाद येथील अभ्यासक्रम बॅचलर ऑफ डिझाईन या नावाने ओळखला जातो. या अभ्यासक्रमांतर्गत ॲनिमेशन फिल्म डिझाईन फर्निचर डिझाईन, इंटेरिअर डिझाईन, प्रॉडक्ट डिझाईन, ग्राफिक्स डिझाईन, फिल्म ॲण्ड व्हिडिओ कम्युनिकेशन डिझाईन अशा सारख्या विषयांमध्ये स्पेशलायझेशन करता येते. या अभ्यासक्रमांना आर्ट, कॉमर्स आणि विज्ञान या शाखेतील विद्यार्थ्यांना प्रवेश मिळू शकतो.

विजयावाडा आणि कुरुक्षेत्र येथील अभ्यासक्रम हा ग्रॅज्युएट डिप्लोमा प्रोग्रॅम इन डिझाईन या नावाने ओळखला जातो.

**संपर्क–** ॲडमिशन सेल,नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन पालडी, अहमदाबाद–३८०००७, **संकेतस्थळ**–www.admissions.nid.edu, **ई–मेल**–admissions@nid.edu, **दूरध्वनी:** ०७९–२६६२ ३४६२

### इंडियन इन्स्टिटयूट ऑफ सायन्स एज्युकेशन ॲण्ड रिसर्च

ज्या विद्यार्थ्यांना १२वीनंतर विज्ञान विषयात पुढील शिक्षण घ्यायचे  आहे. ज्या विद्यार्थ्यांना विज्ञान विषयांमध्ये संशोधन करण्याची इच्छा असेल त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी भारत सरकारने इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन ॲण्ड रिसर्च म्हणजेच आयसर या संस्थेची स्थापना केली आहे. देशातील सात ठिकाणी या संस्थेचे कॅम्पस आहे. त्यापैकी एक पुणे येथे आहे. या संस्थेत १२वी विज्ञान विषयातील विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. संस्थेचा अभ्यासक्रम हा पाच वर्षाचा असून, तो पूर्ण केल्यावर बीएस–एमएस म्हणजे बॅचलर ऑफ सायन्स–मास्टर ऑफ सायन्स ही पदवी दिली जाते. एकदा या संस्थेत प्रवेश घेतला की, पदव्युत्तर पदवी म्हणजेच पोस्ट ग्रॅज्यूएट पदवी घेऊनच बाहेर पडता येते. देशातील महत्वाच्या शासकीय आणि खासगी संस्था आणि उद्योगांच्या प्रयोगशाळांमध्ये संशोधक म्हणून कार्य करण्यासाठी चांगली नोकरीही मिळते. या संस्थेत प्रवेश मिळालेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला दरमहा पाच हजार रुपयांची शिष्यवृत्ती दिली जाते.

या संस्थेतील प्रवेश तीन पद्धतीने केला जातो. किशोर वैज्ञानिक प्रोत्साहन योजना परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांना थेट प्रवेश दिला जातो. आयआयटी आणि एनआयटी या संस्थांमधील अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या जॉईंट एन्ट्रन्स ॲडव्हान्स्ड परीक्षा पात्र उमेदवारांनाही थेट प्रवेश दिला जातो. या दोन पद्धतीने प्रवेशासाठी मे महिन्यात दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात प्रवेश प्रक्रिया सुरू केली जाते. संस्थेतील अर्ध्या जागा अशा रीतीने भरल्या जातात. उर्वरित अर्ध्या जागांच्या भरतीसाठी आयसर ॲप्टिट्यूड टेस्ट घेतली जाते. ही परीक्षा जुलै २०१८ च्या साधारणत: पहिल्या आठवड्यामध्ये घेतली जाईल. या परीक्षेसाठी पुणे केंद्र आहे.

**संपर्क –** इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन ॲण्ड रिसर्च,डॉ होमी भाभा रोड पाषाण पुणे–४११००८,**दूरध्वनी–** ०२०–२५९० ८०००, **संकेतस्थळ –** http://www.iiserpune.ac.in/

नॅशनल एन्ट्रन्स स्क्रीनिंग टेस्ट या परीक्षेद्वारे नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन ॲण्ड रिसर्च भुवनेश्वर आणि मुंबई विद्यापीठांतर्गत येणाऱ्या डिपार्टमेंट ऑफ टोमिक एनर्जी सेंटर ऑफ एक्सलंस इन बेसिक सायन्स या विभागात सुरू करण्यात आलेल्या

## नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी



फॅशन तंत्रज्ञान विषयातील अभ्यासक्रम चालवणाऱ्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी भारत सरकारच्या संस्थेचा समावेश जगातील अशा प्रमुख संस्थामध्ये समावेश होतो. या संस्थेमार्फत १२वी नंतरचे बॅचरल ऑफ डिझाईन आणि बॅचलर ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी असे दोन अभ्यासक्रम चालवण्यात येतात. पदवीनंतरचे मास्टर ऑफ फॅशन मॅनेजमेंट आणि मास्टर फॅशन टेक्नॉलॉजी हे अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत.

बॅचलर ऑफ डिझाईन या अभ्यासक्रमांतर्गत ॲक्सेसरी डिझाईन, निटवेअर डिझाईन, फॅशन डिझाईन, लेदर डिझाईन, टेक्सटाइल डिझाईन या विषयांमध्ये स्पेशलायझेशन करता येते. या अभ्यासक्रमाला कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना प्रवेश मिळू शकतो. हा

पाच वर्षे कालावधीच्या इन्टिग्रेटेड एमएस्सी अभ्यासक्रमाला प्रवेश दिला जातो. हा अभ्यासक्रम फिजिक्स, केमिस्ट्री, बॉयलॉजी आणि गणित या विषयांमध्ये करता येतो. या अभ्यासक्रमाला प्रवेश मिळालेल्या सर्व विद्यार्थ्यांना दरमहा ५ हजार रुपयांची शिष्यवृत्ती दिली जाते. ही परीक्षा २ जून २०१८ रोजी देशभरातील विविध केंद्रांवर घेतली जाणार आहे. यामध्ये महाराष्ट्रातील नागपूर मुंबई पुणे शहरांचा समावेश आहे. अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख ५ मार्च २०१८ आहे.

### इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट इंदौर

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट इंदौर ही संस्था भारत सरकारच्या मनुष्य बळ विकास मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत असणारी स्वायत्त संस्था आहे. व्यवस्थापन शाखेचे शिक्षण देणाऱ्या देशातील पहिल्या दहा क्रमांकामध्ये या संस्थेचा समावेश होतो. या संस्थेने काही वर्षापूर्वी पाच वर्षे कालावधीचा इंटिग्रेटड बिझिनेस ॲडमिनिस्ट्रेशन हा अभ्यासक्रम सुरू केला आहे. याचा अर्थ असा की तुम्ही १२वी नंतर या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला की, थेट एमबीए ही पदवी घेऊनच बाहेर पडणार. असा अभ्यासक्रम सुरू करणारी देशातील ही पहिलीच संस्था आहे. या अभ्यासक्रमाला १२वी विज्ञान, कला आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना प्रवेश मिळू शकतो. हा अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना म्हणजेच वयाच्या २२ किंवा २३ व्या वर्षी १५ लाख रुपये वार्षिक पॅकेज असलेली चांगल्या कंपनीत किंवा उद्योगात नोकरी मिळू शकते. या संस्थेमध्येही अतिशय अल्प प्रमाणात मराठी मुलांची निवड होते. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी मे महिन्याच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात आयपीएम ॲप्टिट्यूड ही प्रवेश परीक्षा घेतली जाते. त्यासाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया मार्च महिन्यात पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात सुरू होईल. या परीक्षेचे महाराष्ट्रातील केंद्र पुणे, मुंबई आणि नागपूर आहे.

**संपर्क–** इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट इंदौर, प्रबंध शिखर, रौ–पितांबर रोड, इंदौर–४५३ ५५६, **दूरध्वनी–**०७३१–२४३९६६६, **संकेतस्थळ–** http://www.iimidr.ac.in

अभ्यासक्रम चार वर्षे कालावधीचा आहे. बॅचलर ऑफ फॅशन टेक्नलॉजी या अभ्यासक्रमाला मात्र १२वी विज्ञान शाखेत भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांनाचा प्रवेश मिळू शकतो. हा अभ्यासक्रम सुद्धा चार वर्षे कालवधीचा आहे. या संस्थेचे देशात १६ ठिकाणी कॅम्पस आहेत.त्यापैकी एक नवी मुंबईतील खारघर येथे आहे. या संस्थेतील अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी चाळणी परीक्षा दरवर्षी फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात घेतली जाते. या परीक्षेसाठी महाराष्ट्रात पुणे, मुंबई, नागपूर ही परीक्षा केंद्रे आहेत.



**संपर्क–** एनआयएफटी कॅम्पस, हौज खास, गुलमोहर पार्कजवळ,नवी दिल्ली.
**संकेतस्थळ–** www.nift.ac.in, **ई–मेल –** info@nift.ac.in
Path: applyadmission.net/nift2017/Prospectus2017.pdf **दूरध्वनी–** ०११–२६५३५८९०

### इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टुरिझम ॲण्ड ट्रॅव्हल मॅनेजमेंट

आपल्या देशात आणि जगात पर्यटन हा व्यवसाय झपाट्याने वाढत आहे. या व्यवसायाला आता उद्योगाचे स्वरूप आले आहे. त्यामुळे या उद्योगासाठी तज्ज्ञ प्रशिक्षित मनुष्यबळाची अतिशय गरज आहे. ही गरज लक्षात घेऊन भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालयाने इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टुरिझम ॲण्ड ट्रॅव्हल मॅनेजमेंट या संस्थेची स्थापना केली. या संस्थेचे कॅम्पस ग्वाल्हेर, भुवनेश्वर, नॉयडा, गोवा आणि नेल्लोर या ठिकाणी आहेत. दोन वर्षापूर्वी या संस्थेमार्फत केवळ पदव्युत्तर पदवी म्हणजे एमबीए अभ्यासक्रम चालवण्यात येत होता. मात्र गेल्या दोन वर्षापासून बॅचलर आफ बिझिनेस ॲडमिनिस्ट्रेशन इन टुरिझम ॲण्ड ट्रॅव्हल हा पदवीस्तरीय तीन वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमाला १२ वी विज्ञान, कला आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी चाळणी परीक्षा जून महिन्याच्या तिसऱ्या किंवा चौथ्या आठवड्यात घेतली जाईल. परीक्षेसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया मे महिन्यात सुरू होईल. ही परीक्षा मे महिन्यात होणार आहे.

हा अभ्यासक्रम ग्वॉलिअर, भूवनेश्वर, नॉयडा आणि नेल्लोर या कॅम्पसमध्ये शिकवण्यात येतो. या प्रत्येक ठिकाणी प्रत्येकी ६० याप्रमाणे २४० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. अर्हता–१२वीमध्ये खुल्या संवर्गातील विद्यार्थ्यास ५० टक्के गुण आणि राखीव संवर्गातील विद्यार्थ्यांना ४५ टक्के गुण मिळणे आवश्यक आहे.

**संपर्क–** चेअरमन ॲडमिशन–बीबीए–टुरिझम ॲण्ड ट्रॅव्हल, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टुरिझम ॲण्ड ट्रॅव्हल मॅनेजमेंट, गोविंदपुरी, ग्वाल्हेर ४७४०११. **दूरध्वनी–** ०७५१–२४३७३००

### इंडियन मेरिटाइम युनिव्हर्सिटी

गेल्या काही वर्षात सागरी वाहतूक आणि दळवळण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. त्यामुळे या क्षेत्रात करिअरच्या विपुल संधी निर्माण होत आहेत. सध्या भारत सरकारने या क्षेत्राच्या विकासावर लक्ष केंद्रित केले आहे. त्यामुळे सागरी विज्ञानच्या क्षेत्रातील

अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांना करिअरच्या अनेक संधी मिळू शकतात. ही बाब लक्षात घेऊन भारत सरकारच्या सागरी वाहतूक मंत्रालयाने इंडियन मेरिटाइम युनिव्हर्सिटीची स्थापन केली आहे. अशा प्रकारची ही आपल्या देशातील पहिली संस्था आहे. या विद्यापीठामार्फत १२वी नंतरचे अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. यामध्ये चार वर्षे कालावधीचा बीटेक इन मरीन इंजिनीअरिंग, बीटेक इन नॅव्हल आर्किटेक्चर ॲण्ड ओशन इंजिनीअरिंग, ३ वर्षे कालावधीचा बी.एस्सी इन शिप बिल्डिंग आणि रिपेअर, बी.एस्सी इन मेरिटाईम सायन्स आणि बी.एस्सी इन नॉटिकल सायन्स या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. या अभ्यासक्रमाला १२वी विज्ञान शाखेत भौतिकशास्त्र, गणित आणि रसायनशास्त्र हे विषय घेतलेलेच विद्यार्थी बसू शकतात. या संस्थेतील प्रवेशासाठी या विद्यापीठामार्फत मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात किंवा जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात कॉमन एन्ट्रन्स टेस्ट घेतली जाईल.

प्रवेश अर्ज भरण्याची प्रक्रिया एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सुरू होणार आहे. महाराष्ट्रात या परीक्षेचे केंद्र पुणे मुंबई आणि नागपूर आहे. या संस्थेचे एक कॅम्पस नवी मुंबई येथे आहे. गेल्या वर्षीच्या शैक्षणिक सत्रापासून बीबीए इन लॉजिस्टिक्स,रिटेलिंग ॲण्ड ई– कॉमर्स हा ३ वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमाला कॉमन एन्ट्रन्स टेस्ट न देताही प्रवेश भेटू शकतो.

**संपर्क–** इंडियन मेरिटाईम युनिव्हर्सिटी, मुंबई कॅम्पस, कारावे, नेरुळ, नवी मुंबई–४००७०६, **दूरध्वनी–** ०२२– २७७०३८७६, २७७०१९३५, **संकेतस्थळ –** http://www.imu.edu.in

### इंदिरा गांधी राष्ट्रीय उड्डाण अकॅडमी

आपल्या देशात आणि जगामध्ये हवाई वाहतूक अतिशय मोठ्या प्रमाणात वाढत आहे. शासनाच्या विमानसेवेशिवाय खासगी विमानसेवाही सुरू झाल्या आहेत. अनेक श्रीमंत व्यक्तींकडे खासगी विमाने आली आहेत. हेलिकॉप्टर्स आली आली आहेत. हवाई वाहतुकीसाठी वैमानिकांची मोठी संख्या भविष्यात लागणार आहे. आपल्यापैकी अनेकांना वैमानिक होण्याची महत्त्वाकांक्षा असते.वैमानिक होण्यासाठीचे प्रशिक्षण देणारी इंदिरा गांधी उड्डाण अकॅडमी रायबरेली येथे भारत सरकारच्या केंद्रीय नागरी उड्डाण मंत्रालया सुरू केली आहे.



### कमर्शिअल पायलट लायसन्स कोर्स

या संस्थेचा अभ्यासक्रम, ब इनिशिओ टू कमर्शिअल पायलट लायसन्स कोर्स या नावाने ओळखला जातो. या अभ्यासक्रमाचा कालावधी दीड वर्षाचा आहे. यात प्रामुख्याने जमिनीवरील आणि हवेतील प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाते. हे प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना कमर्शिअल पायलट लायसन्स प्रदान केले जाते. या अभ्यासक्रमाच्या कालावधीत विविध प्रकारची आणि इंजिन क्षमता असलेली विमाने हाताळता येतात. हा अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी चाळणी परीक्षा घेण्यात येते ही परीक्षा १२वी विज्ञान शाखेत गणित, भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्र हे विषय घेतलेले विद्यार्थी देऊ शकतात. ही परीक्षा दरवर्षी जून महिन्यात घेतली जाते. महाराष्ट्रात या परीक्षेचे केंद्र मुंबई आहे.

### पायलट ॲप्टिट्यूड टेस्ट

लेखी परीक्षेच्या गुणांवर आधारित तयार केलेल्या गुणवत्ता यादीतील निवडक विद्यार्थ्यांना पायलट ॲप्टिट्यूड टेस्ट आणि सायकोमेट्रिक चाचणीसाठी बोलावले जाते. या चाचण्या जुलै महिन्यात रायबरेली येथे घेतल्या जातात. या चाचणीमध्ये राखीव संवर्गातील विद्यार्थ्यांना गुणांमध्ये कोणतीही सूट दिली जात नाही. मुलाखती

## नॅशनल कौन्सिल फॉर हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटेरिंग टेक्नॉलॉजी

हॉस्पिटॅलिटी ॲण्ड हॉटेल ॲडमिनिस्ट्रेशन या विषयातील अभ्यासक्रम देणाऱ्या अनेक शैक्षणिक संस्था महाराष्ट्रात आहेत. या संस्थांमधील प्रवेशासाठी मोठे शुल्क भरावे लागते. मात्र भारत सरकारच्या अंतर्गत कार्यरत असणाऱ्या देशातील हॉटेल मॅनेजमेंट अभ्यासक्रम चालवणाऱ्या संस्थामध्ये दर्जेदार शिक्षण दिले जातेच शिवाय शुल्कसुद्धा परवडणारे असते. या संस्थांमधील बॅचलर ऑफ सायन्स इन हॉस्पिटॅलिटी ॲण्ड हॉटेल ॲडमिनिस्ट्रेशन या तीन वर्षे कालावधीच्या प्रवेशासाठी प्रवेशासाठी नॅशनल कौन्सिल फॉर हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटेरिंग टेक्नॉलॉजी या संस्थेमार्फत देशपातळीवर जाईंट एन्ट्रन्स टेस्ट घेतली जाते. या परीक्षेद्वारे भारत सरकारच्या २१ संस्था, २० विविध राज्य शासनांमार्फत चालवण्यात येणाऱ्या संस्था आणि १५ नामवंत खासगी संस्थांमध्ये मिळून आठ हजारांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. ही संस्था भारत सरकारच्या पर्यटन विभागांतर्गत कार्यरत आहे.

या परीक्षेसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. ११ एप्रिल २०१८ पर्यंत अर्ज भरता येईल. २८ एप्रिल २०१८ रोजी ही परीक्षा घेतली जाणार आहे. या परीक्षेसाठी महाराष्ट्रात मुंबई आणि नागपूर ही केंद्रे आहेत.

देश–विदेशातील हॉटेल उद्योगामध्ये



संस्थेच्या रायबरेली कॅम्पसमध्ये घेतल्या जातात. यानंतर मुलाखती घेतल्या जातात.

**पत्ता:** द डायरेक्टर, इंदिरा गांधी राष्ट्रीय उड्डाण कॅडमी, फुरसतगंज एअर फिल्ड,रायबरेली,२२९३०२, **दूरध्वनी–** ०५३५–२४४११४७, **फॅक्स–** २४४१५२७, **संकेतस्थळ–** www.igrua.gov.in, **ई–मेल -** ops@igrua.gov.in

## सीएई ऑक्सफर्ड एव्हिएशन अकॅडमी

सीएई ऑक्सफर्ड एव्हिएशन अकॅडमीने गोंदिया येथे १९ महिने कालावधीचा पायलट प्रशिक्षण अभ्यासक्रम सुरू केला आहे. व्यावसायिक विमानांसाठी आवश्यक असलेल्या वैमानिकांचे प्रशिक्षण या ठिकाणी दिले जाते. हा अभ्यासक्रम डायरोक्टोरेट जनरल ऑफ सिव्हिल एव्हिएशनने निर्धारित केलेल्या मानकांनुसार आहे. हे प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केल्यावर उमेदवाराला कमर्शिअल पायलट लायसन्स प्रदान केले जाते. यामध्ये इन्स्ट्रूमेंट रेटिंग आणि मल्टी इंजिन रेटिंगचाही समावेश आहे. यासंस्थेने आतापावेतो २०००च्या आसपास वैमानिकांचे विविध विमानसेवांमध्ये प्लेसमेंट केले आहे.ही संस्था एअरपोर्ट ॲथॉरिटी ऑफ इंडियाच्या सहकार्याने सुरू करण्यात आली आहे.

**अर्हता–** १२वी विज्ञान परीक्षेत भौतिकशास्त्र, गणित, रसायनशास्त्र आणि इंग्रजी या विषयांमध्ये किमान ५५ टक्के गुण प्राप्त करायला हवेत. उमेदवाराला इंग्रजीमध्ये सराईतपणे लिहिता–बोलता आले पाहिजे. वैद्यकीयदृष्ट्या उमेदवार तंदुरुस्त असावा.

**निवड प्रक्रिया–** या अभ्यासक्रमासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांची निवड तीन टप्प्यात केली जाते. पहिल्या टप्प्यामध्ये लेखी परीक्षेचा समावेश आहे. ही परीक्षा गणित, भौतिकशास्त्र आणि इंग्रजी या विषयावर आधारीत राहील. अभ्यासक्रमाचा स्तर १२वी.

दुसऱ्या टप्प्यात उमेदवारांना दोन ऑनलाइन चाळणी परीक्षेला सामोरे जावे लागेल. यामध्ये मुलाखत, मानसशास्त्रीय चाळणी व उमेदवाराचा कल आणि शारीरिक क्षमतेची चाचपणी केली जाते. तिसऱ्या टप्प्यात समूह चर्चा आणि व्यक्तिगत मुलाखती इडिगोमार्फत घेतली जाते. प्रशिक्षणाचा प्रारंभ मार्च, जून, सप्टेंबर आणि डिसेंबरमध्ये होतो.

**पत्ता–** सीएई ऑक्सफर्ड एविएशन अकॅडमी, नॅशनल फ्लाईंग ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, एअरपोर्ट थारिटी ऑफ इंडिया, बिर्सी एअरपोर्ट, पोस्ट ऑफिस–पारसवाडा, गोंदिया–४४१६१४, **दूरध्वनी–** ०७१८२–६६५०२५, **ई–मेल–** gondiaacademy@cae.com, **संकेतस्थळ–** www.caeoaa.com/gondia

## इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूट

इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्युटची स्थापना १९३१ साली प्रा. प्रसन्नचंद्र महालानोबीस यांनी केली. गेल्या ८० वर्षात ही संस्था सांख्यिकी या विषयातील शिक्षण–प्रशिक्षण देणारी आणि संशोधनास वाव देणारी जागतिक कीर्तीची संस्था म्हणून ख्यातकीर्त झाली आहे. या संस्थेचे हे अनन्यसाधारण महत्त्व लक्षात घेऊन संसदेने विशेष अधिनियम पारित करून या संस्थेस इन्स्टिट्युशन ऑफ नॅशनल इम्पॉर्टन्सचा दर्जा प्रदान केला आहे. यामुळे या संस्थेस स्वतंत्ररीत्या पदवी आणि पदविका देण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे.

ही संस्था सांख्यिकीशास्त्रातील पदवी व पदविका देण्यासोबतच गणित, संख्यात्मक अर्थशास्त्र, संगणकशास्त्र आदी विषयातील पदवी व पदविका प्रदान करू शकते. या संस्थेचे मुख्यालय कोलकता येथे आहे. तेजपूर, बेंगळुरु, दिल्ली आणि चेन्नई येथे विभागीय केंद्रे आहेत. गिरीध येथील केंद्र कृषी आणि सामाजिक संशोधन कार्यावर लक्ष केंद्रित करते. कोईम्बतूर, हैदराबाद, पुणे आणि मुंबई येथील केंद्रे सांख्यिकी गुणवत्ता नियंत्रण आणि कार्यान्वय संशोधन या विषयांवर लक्ष केंद्रित करते. कोलकता येथील कॅम्पसमध्ये बहुतेक सर्व अभ्यासक्रम शिकवले जातात. तथापी काही अभ्याक्रम हे दिल्ली, बेंगळुरु, तेजपूर आणि चैन्नई येथील कॅम्पसमध्येही शिकवले जातातया



महत्त्वाच्या पदांवर कार्यरत आहेत. शिवाय अध्यापनाच्या क्षेत्रातही या उमेदवारांना संधी उपलब्ध झाली आहे. या संधीमध्ये रिसॉर्ट व्यवस्थापक, हॉटेल आणि संबंधित उद्योगात व्यवस्थापकीय प्रशिक्षणार्थी, बहुराष्ट्रीय हॉस्पिटॅलिटी कंपन्यांमध्ये व्यवस्थापक, प्रारंभीच्या प्रशिक्षणानंतर मोठ्या हॉटेल समूहांमध्ये किचन व्यवस्थापक, हाऊसकीपिंग व्यवस्थापक, राज्य पर्यटन विकास महामंडळात विविध संधी, विमानसेवेतील फ्लाईट किचन आणि विमानांतर्गत सेवा, रेल्वे आतिथ्य आणि खानपान सेवा, भारतीय नौसेना आतिथ्य सेवा, हॉटेल व्यवसाय आणि इतर सेवा क्षेत्रातील विक्री व विपणन अधिकारी, हॉटेल व्यवसाय आणि इतर सेवा क्षेत्रासाठी आवश्यक ग्राहकसेवा एक्झिक्युटिव्ह, प्रवासी जहाजांवरील खानपान व आतिथ्य सेवा, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय फास्टफूड साखळी उद्योगासाठी आवश्यक व्यवस्थापकीय प्रशिक्षणार्थी आणि एक्झिक्युटिव्ह, रुग्णालये आणि मोठ्या कार्पोरेट संस्थांमधील आतिथ्य व खानपान सेवा आदींचा ठळकरीत्या उल्लेख करावा लागेल.

**संपर्क–** नॅशनल कौन्सिल फॉर हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटेरिंग टेक्नॉलॉजी, ए–३४,सेक्टर–६२, नॉयडा–२०१३०९, **टोल फ्री नं.** १८००–१८०–३१५१ **संकेतस्थळ –** http://www.nchm.nic.in

संस्थेतर्फे चालवण्यात येणारे अभ्यासक्रम :-

**बॅचलर ऑफ स्टॅटिस्टिक्स (ऑनर्स)-** हा अभ्यासक्रम केवळ कोलकत्ता कॅम्पसमध्येच शिकवला जातो. या अभ्यासक्रमांची संरचना अशा पद्धतीने करण्यात आली आहे की, त्याच्या पूर्ततेनंतर संबंधित उमेदवारांना गणित आणि सांख्यिकीशास्त्र, संगणकशास्त्र, अर्थशास्त्र आणि तत्सम क्षेत्रे यामध्ये उच्च शिक्षण घेता येणे शक्य होते. या शिवाय संशोधन आणि वैज्ञानिक संस्था, प्रयोगशाळा, विविध शासकीय संस्था आणि उद्योग यामध्ये सांख्यिकी तज्ज्ञ म्हणून अभ्यासक्रम पूर्ण केल्याबरोबर करिअर सुरू करता येऊ शकते. गणित आणि इंग्रजी या विषयासह १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यास या अभ्यासक्रमास प्रवेश मिळू शकतो.

**प्रवेश प्रक्रिया-** प्रवेशासाठी दोन चाळणी परीक्षा घेतली जाते. यामध्ये पहिला परीक्षा ही बहुपर्यायी वस्तुनिष्ठ पद्धतीची आहे. प्रश्न १२ वी स्तरावरचे गणित विषयावरील विचारले जातात. वर्णनात्मक प्रश्न असलेली दुसरी परीक्षा घेतली जाते. यातीलही प्रश्न १२ वी गणितावर आधारित विचारले जातात. या परीक्षेतील कामगिरीवर आधारित उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावले जाते.




इंटरनॅशनल मॅथेमॅटिकल ऑलिम्पियाड ट्रेनिंग कॅम्पसाठी निवड झालेल्या उमेदवारांना लेखी परीक्षेपासून सूट देण्यात येते. हे ऑलिम्पियाड नॅशनल बोर्ड ऑफ हायर मॅथेमॅटिक्स, डिपार्टमेंट ऑफ टोमिक एनर्जी यांच्यामार्फत घेतली जाते. मात्र या उमेदवारांना इतर उमेदवारांसारखेच या अभ्यासक्रमासाठी अर्ज करावा लागतो. या उमदेवारांची अंतिम निवड ही मुलाखतीची प्रक्रिया पार पाडल्यानंतर घेतली जाते.

**बॅचरल ऑफ मॅथेमॅटिक्स (ऑनर्स)-** तीन वर्षे कालावधीचा हा अभ्यासक्रम बेंगळुरु कॅम्पस येथे शिकवला जातो. या अभ्यासक्रमाची संरचना अशा पद्धतीने करण्यात आली आहे की हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर उमेदवारास गणित, सांख्यिकी, संगणकशास्त्र, गणितीय भौतिकशास्त्र याविषयांमध्ये उच्च शिक्षण घेता येणे सुलभ जावे. शिवाय हे उमेदवार गणित विषयाचा ज्या ठिकाणी थेट उपयोग केला जातो, त्या ठिकाणी करिअर प्रारंभ करू शकतात. उमेदवारांच्या निवडीसाठी बॅचलर ऑफ स्टॅटिस्टिक्स या अभ्यासक्रमासाठी घेण्यात येणारी परीक्षा द्यावी लागते. यासाठीची चाळणी परीक्षा १३ मे २०१८ रोजी होणार आहे.अर्ज करण्याची शेवटची तारीख- ९ मार्च २०१८ आहे. महाराष्ट्रातील परीक्षा केंद्रे-मुंबई आणि पुणे.

इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूटच्या विविध अभ्यासक्रमांना प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना पुढील प्रमाणे शिष्यवृत्ती आणि इतर आर्थिक साहाय्य केले जाते. (१) बी.मॅथ आणि बी.स्टॅट- दरमहा ३ हजार रुपये आणि दरवर्षी पुस्तके व इतर शैक्षणिक खर्चासाठी ३ हजार रुपये. **संपर्क-** १) इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूट, २०३ बरॅकपोर, ट्रंक रोड, कोलकाता- ७००१०८. **दूरध्वनी-** ०३३-२५७५२५००/०१, **संकेतस्थळ-** www.isical.ac.in, **ई-मेल-** dean@isical.ac.in

## नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी

भारताची अमाप लोकसंख्या आणि विविध प्रकारच्या व्यामिश्र, महाक्लिष्ट ते बाळबोध समस्यांची प्रचंड संख्यासुद्धा जगभरातील अनेक देशांपेक्षा काकणभर जास्तच भरते. या समस्यांपैकी बऱ्याच समस्यांचे निराकरण करण्यासाठी न्यायालयांकडे धावण्याचा कल दिसून येतो. या समस्यांच्या निराकरणामध्ये वकिलांची महत्त्वाची भूमिका असते. उत्तम करिअर घडवण्याची क्षमता असणारा आणि अर्थातच चांगले उत्पन्न देणारा हा व्यवसाय आहे. मात्र त्यासाठी विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जेदार विधी महाविद्यालयातून शिक्षण घ्यायला हवे. या हेतूनचे भारत सरकारने देशभरात नॅशनल लॉ स्कूलची स्थापना केली आहे. या १८ संस्थांचा प्रवेशासाठी, कॉमन लॉ ॲडमिशन टेस्ट घेतली जाते. या परीक्षेद्वारे बी.ए-एलएलबी या पाच वर्षे कालावधीच्या इंटिग्रेटेड अभ्यासक्रमाला प्रवेश दिला जातो. या परीक्षेत उत्तीर्ण होण्याची मराठी मुलांची संख्या अद्यापही कमी दिसते. या परीक्षेला गेल्या काही वर्षात ३५ ते ४० हजार विद्यार्थी बसतात. लॉ स्कूलमधील एकूण जागा २००० आहेत. त्यामुळे स्पर्धा खूप प्रचंड आहे. या परीक्षेद्वारे पुढील संस्थामध्ये प्रवेश मिळू शकतो.

■ नॅशनल लॉ स्कूल ऑफ इंडिया युनिव्हर्सिटी, बेंगळुरु ■ नॅशनल अकॅडमी ऑफ लिगल स्टडी ॲण्ड रिसर्च युनिव्हर्सिटी ऑफ लॉ - हैदराबाद ■ नॅशनल लॉ इन्स्टिट्यूट युनिव्हर्सिटी - भोपाळ ■ वेस्ट बेंगाल नॅशनल युनिव्हर्सिटी ऑफ ज्युरिडिकल सायंसेस - कोलकता, ■ नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी - जोधपूर, ■ हिदायतउल्ला नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी - रायपूर, ■ गुजरात नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी - गांधीनगर, ■ डॉ.राममनोहर लोहिया नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, लखनौ, ■ राजीव गांधी नॅशनल युनिव्हर्सिटी ऑफ लॉ - पंजाब ■ चानक्य नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी - पाटणा ■ नॅशनल युनिव्हर्सिटी ऑफ लिगल ॲडव्हान्स्ड स्टडिज - कोची ■ नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी ओडीशा - कटक ■ नॅशनल युनिव्हर्सिटी ऑफ स्टडी ॲण्ड रिसर्च इन लॉ- रांची, ■ नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी ॲण्ड ज्युडिशिअल अकॅडमी - आसाम, ■ दामोरम संजीवय्या नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी- विशाखापट्टणम, ■ तामीळनाडू नॅशनल लॉ स्कूल - तिरुचिरापल्ली ■ महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी- मुंबई, ■ महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी- नागपूर.

नागपूर आणि मुंबई येथील संस्थेत प्रत्येकी ६० जागा आहेत. यापैकी पन्नास टक्के जागा महाराष्ट्रासाठी राखीव आहेत. हा अभ्यासक्रम

पूर्णकालीन आणि निवासी स्वरूपाचा आहे. **संपर्क-** ▪ महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, मुंबई, संकेतस्थळ-mnlumumbai.edu.in, **ई-मेल**-admission2018@mnlumumbai.edu.in **दूरध्वनी-** ०२२- २५७०३१८७, २५७०३१८८.

▪ महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, ज्युडिशिअल ऑफिसर्स ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, सिव्हिल लाइन्स, लेडिज क्लब जवळ, सीपी क्लब रोड, नागपूर-४४०००१, **संकेतस्थळ-** http://www.mnlunagpur.edu.in, **ई-मेल** - mnlunagpur@gmail.com, **दूरध्वनी-** ०७१०३-२९७४८८.

## सेंट्रल युनिव्हर्सिटी

भारत सरकारने देशात अनेक ठिकाणी केंद्रीय विद्यापीठांची स्थापना केली आहे. यामध्ये पदवी आणि पदवीनंतरचे अनेक अभ्यासक्रम करता येतात. कला, वाणिज्य, विज्ञान या शाखांमध्ये दर्जेदार पदवी व पदव्युत्तर शिक्षण देशातील विद्यार्थ्यांना मिळावे यासाठी या संस्थांना सेंटर ऑफ एक्सलंस म्हणजे गुणवत्तेचे केंद्रे म्हणून विकास करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. या विद्यापीठांच्या प्रवेशासाठी सेंट्रल युनिव्हर्सिटी कॉमन एन्ट्रस टेस्ट देशातील विविध केंद्रांमध्ये घेतली जाते. यामध्ये महाराष्ट्रातील, मुंबई, नागपूर या केंद्राचा समावेश आहे. गेल्या वर्षी या चाळणी परीक्षेद्वारे हरयाणा, जम्मू, राजस्थान, झारखंड, कर्नाटक, काश्मीर, केरळ, पंजाब आणि तामिळनाडू येथील केंद्रीय विद्यापीठांमध्ये प्रवेश देण्यात आला. हे अभ्यासक्रम कला. वाणिज्य विज्ञान शाखेत पदवीस्तरावरील आहेत. यातील काही अभ्यासक्रम पाच वर्षे कालावधीचे आहेत. म्हणजे १२वीनंतर अभ्यासक्रमाला प्रवेश घेतल्यानंतर पदव्युत्तर पदवी घेऊन बाहेर पडता येते. उदाहरणच द्यायचे झाले तर ज्या विद्यार्थ्याला १२वी नंतर भौतिकशास्त्रात पदव्युत्तर अभ्यासक्रम करायचा आहे, तो विद्यार्थी हा अभ्यासक्रम झारखंड राजस्थान, तामीळनाडू आणि जम्मू येथील केंद्रीय विद्यापीठात करू शकतो. इंग्रजी, अर्थशास्त्र, मानसशास्त्र, भूगोल विषयातील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम कर्नाटक केंद्रीय विद्यापीठात करता येतो. असे १२वीनंतरचे साधारण ५९ अभ्यासक्रम आहेत. केंद्रीय विद्यापीठाच्या प्रवेशासाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया ही मार्च महिन्याचा दुसऱ्या आठवड्यात सुरू होणार आहे. ही परीक्षा मे महिन्याच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात घेतली जाते. ही परीक्षा दरवर्षी वेगवेगळ्या केंद्रीय विद्यापीठांमार्फत घेतली जाते.गेल्या वर्षी ही परीक्षा राजस्थान केंद्रीय विद्यापीठाने घेतली होती. **संपर्क-** द कूऑर्डिनेटर, सेंट्रल युनिव्हर्सिटी ऑफ राजस्थान, एनएच -८, बंदारसिंद्री, जि. अजमेर- ३०५८१७, **दूरध्वनी-** ०१४६३-२३८७५५, **संकेतस्थळ-** www.curaj.ac.in, **ई-मेल** - imfo@curaj.ac.in

## मोरारजी देसाई नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ योग

मोरारजी देसाई नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ योग या संस्थेची स्थापना भारत सरकारने १९९८ साली केली. योग शिक्षण आणि प्रशिक्षणांसदर्भात सेंटर ऑफ एक्सलन्स म्हणून या संस्थेची स्थापना करण्यात आली. संस्थेमार्फत ▪ बी.एस्सी इन योगा हा तीन वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. अर्हता- १२ वी विज्ञान परीक्षेत भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र या विषयात सरासरीने ५० टक्के गुण. प्रत्येक विषयात स्वतंत्ररीत्या उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. १ ऑगस्ट रोजी उमेदवाराचे वय २१ वर्षांपेक्षा अधिक नसावे. हा अभ्यासक्रम गुरु गोविंद सिंघ इंद्रप्रस्थ युनिव्हर्सिटीशी संलग्न आहे. या अभ्यासक्रमासाठी निवड झालेल्या प्रत्येक उमेदवारास ३ हजार रुपयाचे विद्यावेतन दिले जाते. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी चाळणी परीक्षा घेतली जाते. या परीक्षेद्वारे ६० विद्यार्थ्यांना प्रवेश दिल जातो. या अभ्यासक्रमाला ५० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. कालावधी- एक महिना. **संपर्क-** मोरारजी देसाई नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ योग, ६८, अशोका रोड गोल डाकखाना, नवी दिल्ली-११०००१, **दूरध्वनी-** ०११-२३७३०४१७/२३७३०४१८, **संकेतस्थळ** - www.yogamdniy.nic.in, **ई-मेल-** mdniy@yahoo.co.in

## भातखंडे कॉलेज ऑफ हिंदुस्थानी म्युझिक

पंडित विष्णू नारायण भातखंडे यांनी संगीत शिक्षणाला संस्थात्मक स्वरूप देण्यास फार मोठे ऐतिहासिक कार्य केले. १९२६ साली त्यांनी लखनौ येथे मॅरीस कॉलेज ऑफ म्युझिक या नावाने संगीत शिक्षण सुरू केली. १९६६ साली हे विद्यालय उत्तरप्रदेश शासनाच्या अखत्यारित आले. या विद्यालयास भातखंडे कॉलेज ऑफ हिंदुस्थानी म्युझिक असे नाव सरकारने दिले. ऑक्टोबर २००० मध्ये या संस्थेस केंद्र सरकारने डीम्ड युनिव्हर्सिटीचा दर्जा प्रदान केला.

या विद्यालयात पुढील विषयांचे शिक्षण- प्रशिक्षण दिले जाते. ▪ कंठसंगीत (शास्त्रीय कंठसंगीत, ठुमरी, दादरा, सुगम संगीत),



▪ नृत्य (कथ्थक, भरतनाट्यम, कुचिपुडी, लोकनृत्य), ▪ स्वरवाद्ये (सितार, सरोद, गीटार, व्हायोलिन, सारंगी, हार्मोनिअम, बासरी), ▪ तालवाद्य-(तबला ,पखवाज) आणि ▪ संगीतशास्त्र. या पाचही प्रकाराचे अभ्यासक्रम शिकवण्यासाठी पाच स्वतंत्र विभाग आहेत.

विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी चाळणी परीक्षा घेतली जाते. ही परीक्षा दरवर्षी साधारणत: ९ ते १७ जुलै रोजी घेतली जाते.

**संपर्क- दूरध्वनी** - ०५२२-३२२४११२
**संकेतस्थळ-** bhatkhandemusic.edu.in

# समाज माध्यमांची शक्ती

**रवींद्र चिंचोलकर**

**समाज माध्यमे (सोशल मीडिया), डिजिटल माध्यमे, ऑनलाइन माध्यमांचा वापर अलीकडे मोठ्या प्रमाणात वाढल्याने या नव्या क्षेत्रात रोजगाराच्या नवीन संधीही वाढल्या आहेत. संदेशाचा सर्वत्र व झटपट प्रसार करण्याची शक्ती या माध्यमात आहे. कमी खर्चात जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी ही माध्यमे उपयुक्त आहेत. त्यामुळे या क्षेत्रात करिअर करण्यासाठी अनेक संधी आहेत.**

एकविसाव्या शतकाच्या आरंभाबरोबरच भारतात माहिती तंत्रज्ञानाचा प्रसार वाढू लागला होता. त्या काळात मला एका मित्राने म्हटले अरे गूगलवर शोधल्यावर तुझी काहीच माहिती दिसत नाही. त्या वेळीच मला धक्का बसला होता. आता तर फेसबूक, ट्विटर, इन्स्टाग्राम, लिंक्डइन, वॉटसअप यासारख्या समाज माध्यमांशिवाय आपल्या अस्तित्वाला काहीच अर्थ नाही असे प्रत्येक व्यक्तीला वाटू लागले आहे.

माहिती तंत्रज्ञानाच्या झपाट्यामुळे जग गतीने बदलले आहे, हेच खरे. याचा मोठा प्रभाव समाजजीवनावर पडला असून, त्यामुळे नवनवीन क्षेत्रे विकसित झाली. त्यात समाज माध्यमे (सोशल मीडिया), डिजिटल माध्यमे, ऑनलाइन माध्यमे यांचा प्रामुख्याने समावेश करता येईल. या नव्या क्षेत्रात रोजगाराच्या नवीन संधीही वाढल्या आहेत. संदेशाचा सर्वत्र व झटपट प्रसार करण्याची शक्ती या माध्यमात आहे. कमी खर्चात जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी ही माध्यमे उपयुक्त आहेत. त्यामुळे या माध्यमांकडील ओढ वाढत आहे. या माध्यमांमध्ये ज्या करिअर संधी निर्माण झाल्या आहेत, त्यातील प्रमुख संधी खालीलप्रमाणे आहेत.

### डिजिटल मार्केटिंग मॅनेजर

ऑनलाइन मार्केटिंगसाठी (विपणन) केल्या जाणाऱ्या कार्याला एकत्रितपणे डिजिटल मार्केटिंग असे म्हटले जाते. वेबसाईट, सर्च इंजिन, ई-मेल, मोबाइल ॲप इत्यादीद्वारे जाहिराती लक्ष्यित गटापर्यंत पोहोचवणे हे यात महत्त्वाचे असते. 'कंटेंट इज द किंग' हा आजच्या काळातील यशस्वितेचा मंत्र आहे. त्यामुळे आपल्या उत्पादन अथवा सेवांची माहिती प्रभावीपणे ग्राहकापर्यंत पोहोचवणे हे सर्वात महत्त्वाचे कार्य बनले आहे. विपणनाच्या क्षेत्रात सध्याच्या काळात फार मोठी स्पर्धा सुरू आहे. कंपन्यांची आणि उत्पादनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे लक्ष्यित गटापर्यंत विपणनाचा संदेश कसा पोहोचवायचा हा अवघड प्रश्न आहे. याचे उत्तर डिजिटल मार्केटिंगमध्ये आहे. आता प्रत्येक कंपनी आपली उत्पादने, योजनांची माहिती देण्यासाठी डिजिटल मार्केटिंगचा उपयोग करतात. बाजारपेठ निश्चित करणे, जाहिरात धोरण ठरवणे यासाठी तसेच विपणन योजनेचे विश्लेषण करण्यासाठी डिजिटल मार्केटिंग उपयुक्त ठरते. ॲमेझॉन, फ्लिपकार्ट, ओएलएक्स यासारख्या ऑनलाइन विक्री करणाऱ्या कंपन्या, मेक माय ट्रिप, रेडबस तसेच ओला, उबरसारख्या वाहन सेवा पुरवणाऱ्या कंपन्यांसह अनेक कंपन्यांमध्ये अशी पदे उपलब्ध होतात. या पदांवर काम करण्यासाठी पत्रकारिता/ मार्केटिंगचा अभ्यासक्रम पूर्ण असणे, मराठी व इंग्रजी भाषेवर चांगले प्रभुत्व असणे, प्रभावी जाहिरात लेखनाचे कौशल्य असणे आवश्यक आहे.

### ऑनलाइन प्रॉडक्ट जर्नालिस्ट

ऑनलाइन माध्यमांद्वारे उत्पादनाची माहिती ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याचे काम यात पत्रकाराला करावे लागते. कंपनीची उत्पादने ग्राहकासांठी कशी उपयुक्त आहेत, याचे फायदे कोणते आहेत, याचा वापर कसा करावा, ज्या ग्राहकांनी याचा वापर केला ते कसे समाधानी आहेत यावर आधारित वृत्तान्त देण्याचे काम यात करावे लागते. ही माहिती फेसबूक, ट्विटर, यूट्युब यासारखी समाजमाध्यमे अथवा मोबाइल ॲपद्वारे ग्राहकांपर्यंत पोहोचविण्याचे काम या पत्रकाराला प्रभावीपणे करावे लागते. यात उत्पादनाला ब्रँड म्हणून प्रस्थापित करणे, ब्रँडची प्रतिष्ठा वाढवणे, ब्रँडबद्दल ग्राहकांचा दृष्टिकोन जाणून घेणे यासारखी कामे करणे अपेक्षित आहे.



या पदावर काम करण्यासाठी पत्रकारितेचा अभ्यासक्रम केलेला असण्याबरोबर, इंटरनेट वापराचे चांगले ज्ञान असणे गरजेचे आहे. समाजमाध्यमांद्वारे प्रभावीपणे लेखन करणे, ब्लॉगवर मजकूर लिहिणे, व्हिडिओ तयार करणे व संपादित करणे इत्यादी कामे करता येणे आवश्यक आहे.

## कंटेंट रायटर/एडिटर

माहिती प्रस्फोटाच्या युगात आपण आहोत. माहितीचा प्रवाह सर्व दिशांनी लक्षावधी माहिती स्रोतातून निरंतर वाहत असतो. आपल्या वाचकांना नेमक्या ज्या माहितीत स्वारस्य आहे अशीच माहिती तयार करणे आवश्यक झाले आहे. समाज माध्यमांवर असे लेखन करणाऱ्यांची खूप गरज असते. असे लेखनाचे काम करणाऱ्यास कटेंट रायटर म्हटले जाते. वाचकांना हवी असणारी माहिती निवडून संपादित करणाऱ्यास कंटेंट एडिटर म्हणतात. यात प्रामुख्याने संकेतस्थळ, ब्लॉग, समाज माध्यमांसाठी मजकूर लेखन करणे, संपादित करणे ही कामे करावी लागतात. या पदावर नोकरीच्या अनेक संधी सोशल व डिजिटल माध्यम क्षेत्रात उपलब्ध आहेत. न्यूज हंट, वे टू एसएमएस यासह विविध संस्थांमध्ये अशा नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत.

या पदावर काम करण्यासाठी पत्रकारिता/ इंग्रजी भाषा अभ्यासक्रम पूर्ण केलेला असणे आवश्यक आहे. भाषेवर प्रभुत्व असणे, लेखनाची आवड व क्षमता असणे, मराठीतील मजकूर इंग्रजीत, इंग्रजीतील मजकूर मराठीत भाषांतरित करता यायला हवा.

## वेब जर्नालिस्ट

वृत्तपत्रांच्या ऑनलाइन आवृत्ती तसेच ऑनलाइन वृत्तपत्रे (वेबपोर्टल) यांची त्याचबरोबर त्यांच्या वाचकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते आहे. या माध्यमांसाठी उपसंपादक, वरिष्ठ उपसंपादक इत्यादी पदे गरजेची असतात. इनाडू, वेबदुनिया यासारख्या अनेक वेबपोर्टल्समध्ये तसेच प्रमुख वृत्तपत्रांच्या ऑनलाइन आवृत्तीत या संधी उपलब्ध आहेत. स्वतःचे वेबपोर्टल सुरू करणे हा पर्यायही सहज उपलब्ध आहे. कारण वेबपोर्टल सुरू करणे फारसे खर्चीक नाही. उस्मानाबाद लाईव, आज लातूर, बार्शी लाईव यासह जिह्याच्या ठिकाणी पत्रकारांनी सुरू केलेली वेब पोर्टल्स चांगली कार्यरत आहेत.

हे काम करण्यासाठी पत्रकारितेचा अभ्यासक्रम पूर्ण असणे, संगणक हाताळणीचे चांगले ज्ञान असणे, ऑनलाइन वृत्तपत्रासाठी लेखन व संपादन करण्याची क्षमता असणे गरजेचे आहे.

## ॲडव्होकसी मॅनेजर

एखाद्या विचाराचे, कार्याचे समर्थन करण्यासाठी, समाजाचा पाठिंबा मिळवण्यासाठी केल्या जाणाऱ्या कामगिरीला मीडिया ॲडव्होकसी असे म्हटले जाते. या क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांमध्येही नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध आहेत.

या पदावर कार्य करण्यासाठी पत्रकारितेची पदवी, सामाजिक प्रश्नांची जाण, संगणकावर काम करण्याचे तांत्रिक कौशल्य, भाषेवर प्रभुत्व ही कौशल्ये असणे आवश्यक आहे. याशिवाय मार्केटिंग ब्लॉगर, डिजिटल मीडिया एक्झिक्युटिव्ह, डिजिटल मीडिया प्लॅनर, सोशल मीडिया एक्सपर्ट, सोशल मीडिया प्लॅनर, सोशल मीडिया मार्केटिंग हेड यांसारखी समकक्ष पदेही उपलब्ध आहेत. स्वतःचे न्यूज ॲप सुरू करणे अथवा स्वतःचे यूट्युब चॅनल सुरू करणे देखील सहज शक्य आहे. एकंदरीत सोशल मीडिया, डिजिटल मीडिया हेच यापुढच्या काळातील वास्तव आहे. या क्षेत्रातील नोकरीच्या संधी मिळवण्यासाठी पत्रकारितेच्या अभ्यासक्रमाशिवाय डाटा ॲनालिटिक्स, डिजिटल मार्केटिंग, सोशल मीडिया यांच्याशी निगडित एखादे प्रमाणपत्र अभ्याक्रम पूर्ण करणे आवश्यक आहे.

**विभागप्रमुख, पत्रकारिता विभाग, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर**
**संपर्क: ०९८६००९१८५५**

## सोशल मीडिया मॅनेजर

आपल्या अथवा संस्थेच्या, कंपनीच्या प्रगतीसाठी सोशल मीडियाचा वापर केला, तरच आपण टिकून राहू शकू याची जाणीव आता सर्वांना झाली आहे. त्यामुळे सोशल मीडियाद्वारे आपली चांगली प्रतिमा निर्माण करण्याचे, जोपासण्याचे काम व्यक्ती, संस्था, कंपनीला करावे लागते. फेसबूक, ट्विटर, इन्स्टाग्राम, व्हॉट्सॲप इत्यादी सोशल मीडियाद्वारे लोकांपर्यंत संस्थेची, कंपनीची माहिती पोहोचवण्यासाठी कुशल मनुष्यबळ लागते.



राजकीय पक्ष, कार्पोरेट संस्था, सेलेब्रिटी यांना तर त्यांच्यासाठी हे काम करणाऱ्यांची मोठी फौजच लागते. यासाठी सोशल मीडिया मॅनेजर व त्यांच्या हाताखाली अनेकजण कार्यरत असतात. तालुक्याच्या, जिल्ह्याच्या ठिकाणी काम करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांनादेखील याची गरज भासू लागली आहे. प्रसिद्ध व्यक्तींच्या समाजमाध्यमांवरील मजकुराचे नियोजन करणे, त्यातील मजकूर अद्ययावत करणे, विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांना उत्तरे देणे इत्यादी कामे यात करावी लागतात. या पदावर काम करण्यासाठी पत्रकारितेचा अभ्यासक्रम पूर्ण असणे, मराठी व इंग्रजी भाषेवर चांगले प्रभूत्व असणे, सोशल मीडियाच्या हाताळणीचे चांगले ज्ञान असणे, कमी शब्दात आशयघन लेखनाची सृजनशीलता असणे गरजेचे आहे.

**आधुनिक शैक्षणिक क्षेत्रात चित्र आणि शिल्प या दोन कलाप्रकारांना मूलभूत स्थान देऊन विविध कलाप्रकारांवर आधारित असे व्यावसायिक कला अभ्यासक्रम यशस्वीपणे राबवले जातात. गायन, वादन, नृत्य, चित्र, शिल्प या मुख्य कला प्रकारांमध्ये चित्र आणि शिल्प या दृश्य स्वरूपात व्यक्त केल्या जाणाऱ्या कला असून कुठल्याना कुठल्यातरी माध्यमाद्वारे त्या दृश्यमान होतात.**



# कलेचा आनंद आणि आनंदाची कला

**गजानन सीताराम शेपाळ**

जगातल्या कुठल्याही संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी त्या त्या ठिकाणच्या उत्खननात सापडलेल्या वस्तू आणि त्या वस्तूंवरील चित्रांकने, नक्षीकाम इत्यादींवरून अगदी कालावधी-राहणीमान-सांस्कृतिकता इत्यादी सर्व माहिती मिळवता येते. एकूणच चित्र आणि शिल्पकला या इतर उपलब्ध चौसष्ट कलांमधून, अत्यंत महत्त्वाच्या म्हणून गणल्या जातात. या कलांना जात-धर्म-रूढी-परंपरा-वर्ग आदी प्रचलित बाबींचे बंधन लागू होत नाही. त्या सर्वत्र वावर करण्याऱ्या अशा 'संस्कृतिरक्षक' आहेत. याच महत्त्वाच्या कला प्रकारांना भारतीय सांस्कृतिकतेत तर अत्यंत मानाचे स्थान अगदी पुराणकाळापासून देण्यात आल्याचे संदर्भ आहेत. अगदी इ.स.पूर्व काळांमध्ये निर्माण झालेल्या लेणी स्थापत्यांतील चित्रे आणि उठाव शिल्पे जरी आठवलीत तरी वरील विधानाचे महत्त्व पटायला वेळ लागणार नाही.

ही प्रस्तावना अगदी थोडक्यात का होईना देणे आवश्यक वाटले याचे कारण आधुनिक शैक्षणिक क्षेत्रात चित्र आणि शिल्प या दोन कला प्रकारांना मूलभूत स्थान देऊन विविध कला प्रकारांवर आधारित असे व्यावसायिक कला अभ्यासक्रम यशस्वीपणे राबवले जातात.

## क्षेत्र निवडीच्या संधी

आज आपण ऐकले असेल- वाचले असेल चित्रकार, व्यक्ती चित्रणकार, ॲनिमेटर, आर्टिस्ट, कॅरिकेचरिस्ट, कार्टूनिस्ट, कॉपीरायटर, कमर्शिअल आर्टिस्ट, ग्राफिक डिझायनर, बॅकग्राऊंड आर्टिस्टस्, स्टेज डिझायनर, मीडिया प्लानर, इव्हेंट मॅनेजर, स्लोगन मेकर्स, कलर कम्पोझिटर, व्हीज्युलायझर, इलेस्ट्रेटर, फोटोग्राफर, स्टील फोटोग्राफर, मॉडेल फोटोग्राफर, इंडस्ट्रियल फोटोग्राफर, प्लाईट आर्टिस्ट, स्कल्पटर (शिल्पकार) अशा विविध नामाभिदानाने ओळख निर्माण करून देणारे क्षेत्र या कलाप्रकारातून निवडता येते.

## अभ्यासक्रम

आकाशाची अन् क्षितिजाचीच सीमा असलेल्या या क्षेत्रात मेहनत, सराव आणि सातत्याने नावीन्याचा शोध घ्यावा लागतो. आपल्याकडे १०+२+३ या सूत्रात बसणाऱ्या अभ्यास विषयांमध्येच या क्षेत्रातील अभ्यासक्रमांना बद्ध करण्यात आले आहे. म्हणजे दहावी (दहा वर्षात) बारावी (पुढील दोन वर्षात) आणि पदवी (त्यापुढील तीन वर्षात)

शिक्षण घेतले जाते. त्यातही पदविका म्हणजे डिप्लोमा आणि पदव्युत्तर पदवी म्हणजे मास्टर डिग्रीच्या अभ्यासक्रमाचा कालावधी जसा अभ्यासक्रमाच्या स्वरूपावर निर्धारित असतो. तद्वतच कलाप्रकारांतही प्रमाणपत्र अभ्यासक्रम, पदविका अभ्यासक्रम, पदव्युत्तर अभ्यासक्रम अगदी 'वाचस्पती' म्हणजे पीएच.डी. पर्यंतही अध्ययन करता येण्याची सुविधा आपल्या देशात आहे.

दहावीनंतर डिप्लोमा वा पदविका कला शिक्षण घेण्याची सोय आहे तर बारावीनंतर पदवी कला शिक्षण आणि पुढील उच्च शिक्षणाचे मार्ग खुले होतात. कला शिक्षणात जी.डी. आर्ट, बी.एफ.ए., एम.एफ.ए. हे अनुक्रमे पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी-अभ्यासक्रम करता येतात. या अभ्यासक्रमांतर्गत ज्या विषयांत कलाकाराने विशेष शिक्षण पूर्ण केले आहे त्याचा नामोल्लेख कंसात केला जातो. उदा. जी.डी. आर्ट (कमर्शिअल) किंवा जी.डी.आर्ट (पेंटिंग), बी.एफ.ए. (उपयोजित कला) इत्यादी. या सर्व कलाप्रकारांचे अधिकृत म्हणजे शासनमान्य किंवा शासकीय स्तरावर मान्यता पावलेले कलाशिक्षण देणारे अभ्यासक्रम, महाराष्ट्र राज्यात कला संचालनालयांतर्गत शिकवले जातात. भारतातील सर्व राज्यांपैकी महाराष्ट्र हे एकमेव असे राज्य आहे की, जिथे 'कलासंचालनालय' हा स्वतंत्र विभाग आहे. या विभागांतर्गत वर उल्लेख केलेले अभ्यासक्रम चालतात. याशिवाय पदवी आणि पदव्युत्तर पदवी हे अभ्यासक्रम अगदी पीएच.डी पर्यंतचे हे इतर विद्यापीठांमध्ये, अभिमत विद्यापीठांमध्ये देखील याच नावाने राबवले जातात. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली आणि विद्यापीठ अनुदान मंडळ (यु.जी.सी.) यांच्या अंतर्गत मान्यता असलेल्या वरील अभ्यासक्रमांपैकी बरेच अभ्यासक्रम राबवले जातात.

### इव्हेंट मॅनेजमेंट

पदवी-पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची माहिती घेतल्यानंतर हा स्नातक आणखी काय करू शकतो ? या उत्सुकता वाढवणाऱ्या प्रश्नाचे उत्तर द्यायल हवे...!! आधुनिक माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात, दैनंदिनी दर्जेदारपणाला तितकीच मागणी आहे. या साऱ्यांच्या अपेक्षा पूर्ण होण्यासाठी सादरीकरणाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. हे सेलिब्रेशन सर्वत्र असते. मग लग्नाचे स्टेज असो, खासगी व सामाजिक कार्यक्रमाचे स्टेज असो, अगदी वाढदिवसांपासून तर प्रत्येक समूह कार्यक्रमांपर्यंत कार्यक्रमांना उत्तम स्मृतिप्रवण असे साजरे करण्याचा 'ट्रेंड' जगभर वाढत चाललाय आणि हा 'कल' बाळसेदार करण्यासाठी प्राधान्याने कलाक्षेत्रातील, कल्पजक (व्हिज्युलायझर) यांनी अक्षरश: यशाची परिसीमा गाठलेली आहे. गाठत आहे. अशा या नव्याने नावीन्य घेतलेल्या क्षेत्राला एक गोंडस नाव देण्यात आले आहे. 'इव्हेंट मॅनेजमेंट'...!! कलाक्षेत्रात 'इव्हेंट मॅनेजमेंट'ने प्रचंड संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यामुळे विविध रोजगाराच्या संधीची दारे उघडून उभ्या आहेत. वाट बघत...कुणाची? ..... तर ज्याच्याकडे बुद्धी-विकास कौशल्य आणि कल्पना विलासासह चिकाटी आहे अशा तरुणांची वा तरुणींची...!!

**वरिष्ठ अधिव्याख्याता, सर ज.जी. उपयोजित कला महाविद्यालय, मुंबई**
**संपर्क: ०८१०८०४०२१३**

**बऱ्याचशा पालकांना किंवा इच्छुकांना प्रश्न पडतो की, आज स्वावलंबी राहण्यासाठी निश्चित कोणत्या कलाप्रकारांतून अभ्यासक्रम निश्चित करावा? कोणती पदविका किंवा पदवी पूर्ण करावी, यासाठी तक्त्यातील माहिती उपयुक्त ठरेल.**

| अभ्यासक्रम | दहावी/बारावी नंतर वा अन्य | कालावधी | संधी कोठे मिळेल |
|---|---|---|---|
| ए.टी.डी. (आर्ट टीचर्स डिप्लोमा) | बारावी नंतर | २ वर्ष | प्राथमिक/माध्यमिक शाळांमध्ये कलाशिक्षण |
| ए.एम. (आर्ट मास्टर) | ए.टी.डी. नंतर | १ वर्ष | शैक्षणिक क्षेत्रात पदोन्नतीसाठी |
| जी.डी. आर्ट (सर्व शाखांसाठी) | दहावीनंतर (पायाभूत अभ्यासक्रम एक वर्षाचा पूर्ण करून) | ४ वर्ष (एकूण ५ वर्ष) | शासकीय, निमशासकीय आणि खासगी कार्यालयांमध्ये जिथे आर्टिस्टची आवश्यकता आहे, शैक्षणिक संकुले, विविध प्रेस फर्मसंस्था स्थापून देशविदेशातील जाहिरात संस्था, स्टुडिओज, अनेक क्षेत्र.... |
| बी.एफ.ए. (सर्व शाखांसाठी) | बारावीनंतर | ४ वर्ष | वरीलप्रमाणे |
| एम.एफ.ए. (सर्व शाखा) | बी.एफ.ए.नंतर | २ वर्ष | वरीलप्रमाणे |
| पीएच.डी. (मर्यादित शाखा) | एम.एफ.ए. नंतर | विद्यापीठीय नियमानुसार २५ महिने ते ४ वर्ष | वरीलप्रमाणे |

# डॉ. आंबेडकर थॉट: नवी संधी

**डॉ. प्रदीप आगलावे**



**‘डॉ. आंबेडकर थॉट’मध्ये करिअर करण्याची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध आहे. ‘डॉ. आंबेडकरांचे कार्य आणि तत्त्वज्ञान’ या विषयाच्या संदर्भात भारतातील बहुतांश विद्यापीठात डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्र, डॉ. आंबेडकर अध्यासन, डॉ. आंबेडकर थॉट विभाग किंवा दलित अभ्यास केंद्र किंवा विभाग आहेत. देशातील अनेक विद्यापीठात ‘डॉ. आंबेडकर थॉट’ या विषयात पदव्युत्तर अभ्यासक्रम (एम.ए.) आणि पदविका अभ्यासक्रम आहेत.**

आधुनिक काळामध्ये विद्यार्थ्यांना करिअरचा प्रश्न विशेष महत्त्वाचा वाटतो. कोणत्या विषय किंवा अभ्यासक्रमामध्ये करिअरची संधी आहे,याचा विचार करून विद्यार्थी अभ्यासक्रम निवडत असतात. त्यासाठी त्यांना योग्य मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे. जर विद्यार्थ्यांना अशी माहिती मिळाली तर विद्यार्थी, त्या दृष्टीने विचार करून अभ्यासक्रमाची निवड करू शकतात.

## विविध अभ्यासक्रम

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जागतिक स्तरावरील फार मोठे तत्वज्ञ होते. त्यांनी अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, कायदा, धर्मशास्त्र, इत्यादी विविध विषयांमध्ये श्रेष्ठ दर्जाचे विपूल लेखन केले आहे. त्यामुळे डॉ. आंबेडकरांचे कार्य आणि तत्त्वज्ञानावर आधारित स्वतंत्र ‘एम.ए.’चा अभ्यासक्रम तयार करणे शक्य झाले. सर्वप्रथम डॉ. आंबेडकर थॉट मध्ये ‘एम.ए.’चा अभ्यासक्रम तयार करून तो सुरू करण्याचे श्रेय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला आहे.

या विद्यापीठाने १९८७ मध्ये ‘डॉ. आंबेडकर थॉट’चा पदव्युत्तर अभ्यासक्रम तयार केला. १९८८ पासून तो प्रत्यक्ष सुरू कारण्यात आला.

महाराष्ट्रातील नागपूर विद्यापीठासह, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, संत गाडगे महाराज अमरावती विद्यापीठ, गोंडवाना विद्यापीठ या विद्यापीठामध्ये आंबेडकर थॉटमध्ये एम.ए.चा अभ्यासक्रम आहे.


नागपूर विद्यापीठात १९९८ पासूनच पदवी अभ्यासक्रमात ‘आंबेडकर थॉट’ या विषयाचा समावेश करण्यात आला. त्यानंतर डॉ. आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने देखील बी.ए.च्या अभ्यासक्रमात डॉ. आंबेडकर थॉट विषयाचा अंतर्भाव केला. त्यानंतर अनेक महाविद्यालयांनी बी.ए.करिता ‘आंबेडकर थॉट’ विषय सुरू केला.

महाराष्ट्रातील नागपूर विद्यापीठ आणि एसएनडीटी महिला विद्यापीठात ‘आंबेडकर थॉट’ या विषयात पीएच.डी.चा अभ्यासक्रम आहे. तर मुंबई विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ इत्यादी विद्यापीठामध्ये आंबेडकर थॉटमध्ये पदविकेचा अभ्यासक्रम आहे. नागपूर विद्यापीठ आणि एसएनडीटी महिला विद्यापीठ येथे डॉ. आंबेडकर प्रतिष्ठान, सामाजिक व सबलीकरण मंत्रालय भारत सरकारद्वारे अनुदानित डॉ. आंबेडकर अध्यासने आहेत.

## डॉ. आंबेडकर अध्यासने

डॉ. आंबेडकरांच्या कार्याचा आणि विचारांचा प्रचार-प्रसार करणे आणि डॉ. आंबेडकरांच्या विचारांवर संशोधनकार्य व्हावे म्हणून भारत सरकारच्या न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयांतर्गत असलेल्या डॉ. आंबेडकर प्रतिष्ठानतर्फे देशातील विविध राज्यात डॉ. आंबेडकर अध्यासने १९९३ पासून सुरू केली आहेत.

१) अलीगढ मुस्लीम विद्यापीठ,अलीगढ, २) डॉ. आंबेडकर सामाजिक विज्ञान विद्यापीठ, महू (मध्यप्रदेश), ३) आचार्य नागार्जून विद्यापीठ, गुंटूर, ४) सामाजिक कार्य आणि सामाजिक संस्था भुवनेश्वर, ५) जवाहरलाल नेहरू विद्यापीठ दिल्ली ६) मद्रास विद्यापीठ चेन्नई ७) कोलकता विद्यापीठ, ८) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर, ९) विक्रम विद्यापीठ उज्जैन,(मध्यप्रदेश), १०) इंडियन इन्स्टिट्यूट पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन नवी दिल्ली या दहा विद्यापीठात डॉ. आंबेडकर अध्यासने १९९३ पासून आहेत. या व्यतिरिक्त २०१६ पासून ११ विद्यापीठात डॉ. आंबेडकर अध्यासन सुरू करण्यात आली. त्या विद्यापीठाची यादी पुढीलप्रमाणे आहेत. १) महाराजा सयाजीराव विद्यापीठ, बडोदा, २) इंदिरा गांधी राष्ट्रीय आदिवासी विद्यापीठ, अमरकंटक, (मध्यप्रदेश) ३) डॉ. हरिसिंग गौर विद्यापीठ, सागर, (मध्यप्रदेश), ४) एसएनडीटी महिला विद्यापीठ मुंबई, ५) केंद्रीय हिमाचल विद्यापीठ धर्मशाला (हिमाचलप्रदेश),६) आंध्र विद्यापीठ, ७) अन्नामलाई विद्यापीठ, ८) तेजपूर विद्यापीठ, आसाम, ९) राजस्थान विद्यापीठ, जयपूर, १०) बनारस हिंदू विद्यापीठ, वाराणसी (उत्तरप्रदेश), ११) पाटणा विद्यापीठ बिहार. अशा प्रकारे भारतातील २१ विद्यापीठांमध्ये डॉ. आंबेडकर अध्यासन आहेत. याशिवाय विविध राज्यातील विद्यापीठात आंबेडकर अध्यासन आहेत. काही अध्यासने विद्यापीठाने स्वत: सुरू केली आहेत, तर काही अध्यासने ही राज्यशासनाने सुरू केली आहेत.



## वेगळी संधी

कर्नाटकातील मैसूर विद्यापीठात डॉ. आंबेडकर संशोधन आणि विस्तार केंद्र आहे. येथे १९९४ पासून डॉ. आंबेडकर अध्यासन आणि २००० पासून डॉ. आंबेडकर केंद्र आहे. या केंद्रातर्फे आंबेडकर स्टडीजमध्ये एम.फील. आणि पीएच.डी.चा अभ्यासक्रम आहे. गुजरात येथील अहमदाबादस्थित डॉ. आंबेडकर मुक्त विद्यापीठात आंबेडकरांच्या जीवन आणि विचारांवर प्रमाणपत्र अभ्यासक्रम आहे. डॉ. आंबेडकर सामाजिक विज्ञान विद्यापीठ महू (मध्यप्रदेश) येथे डॉ. आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानामध्ये एम.फील.चा अभ्यासक्रम तर वर्धेच्या म.गांधी आंतरराष्ट्रीय विद्यापीठात डॉ. आंबेडकर सेंटरतर्फे एम.ए.एम.फील.आणि पीएच.डी.चा अभ्यासक्रम आहे. कर्नाटक विद्यापीठात डॉ. आंबेडकर थॉट मध्ये पदविका अभ्यासक्रम आहे. तिरवा माझी भागलपूर विद्यापीठातील डॉ. आंबेडकर विचार आणि सामाजिक कार्य विभागातर्फे आंबेडकर थॉटमध्ये एम.ए. आणि पीएच.डी.चा अभ्यासक्रम आहे. मद्रास विद्यापीठ डॉ. आंबेडकर थॉटमध्ये पदव्युत्तर पदविका तर कुरूक्षेत्र विद्यापीठ हरीयाणा आणि महात्मा गांधी विद्यापीठ कोट्टायाम येथे प्रमाणपत्र अभ्यासक्रम आहे.

वरील विद्यापीठांव्यतिरिक्त पुढील विद्यापीठात डॉ. आंबेडकर अध्यासन किंवा आंबेडकर अभ्यास केंद्र आहेत. १) पंजाब विद्यापीठ चंदीगढ, २) केरळ विद्यापीठ, ३) बेंगळुरू विद्यापीठ, ४) कुवेम्पू विद्यापीठ कर्नाटक, ५) दिल्ली विद्यापीठ, ६) हैदराबाद विद्यापीठ, ७) बंदेलखंड विद्यापीठ, झांसी,८) गुजरात विद्यापीठ, ९) कोटा विद्यापीठ, कोटा १०) जाधवपूर विद्यापीठ, ११) डॉ. आंबेडकर विद्यापीठ, लखनौ.

## जगभरात विशेष अभ्यास

विदेशातील विद्यापीठांमध्ये देखील डॉ. आंबेडकरांचे कार्य आणि तत्त्वज्ञान यावर विशेष अभ्यास केला जातो. डॉ. ऐलिनार झेलिएट, डॉ. ख्रिस्टोफर क्रिन इत्यादी अनेक विदेशी संशोधकांनी डॉ. आंबेडकरांची चळवळ आणि त्यांच्या तत्त्वज्ञानावर संशोधन करून अनेक ग्रंथ लिहिले आहेत.

अमेरिकेच्या जगप्रसिद्ध विद्यापीठातील लॉ विभागात 'भारतीय संविधानात्मक कायदा' या विषयात डॉ. आंबेडकर अध्यासन आहे. इंग्लंड येथील लंडन स्कूल ऑफ इकोनॉमिक्स येथे डॉ. आंबेडकरांवरील संशोधन कार्यास विशेष प्रोत्साहन दिले जाते. अमेरिकेतील पेनसिल्हानिया विद्यापीठात 'आंबेडकर स्टडीज' मध्ये संशोधन केले जाते. युरोपातील हंगेरी देशातील बुडापेस्ट विद्यापीठ तसेच जपान, श्रीलंका, थायलंड इत्यादी देशातील विविध विद्यापीठात डॉ. आंबेडकरांच्या चळवळ आणि तत्त्वज्ञानावरील संशोधनास विशेष प्रोत्साहन दिल्या जाते. यावरून हे स्पष्ट होते की, 'डॉ. आंबेडकर थॉट' हा विषय आता केवळ एका विशिष्ट विद्यापीठातील अध्ययनाचा राहिलेला नाही. भारतातील बहुतांश विद्यापीठांत या विषयांचे अभ्यासक्रम, अभ्यासकेंद्र किंवा अध्यासने आहेत. कोलंबिया, लंडन, पेनसिल्हानिया इत्यादी आंतरराष्ट्रीय विद्यापीठातदेखील डॉ. आंबेडकर अध्यासने आहेत.

**प्रमुख, डॉ. आंबेडकर विचारधारा विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ, नागपूर. संपर्क: ०९८८१२६२६६०**

**पुरातत्त्वशास्त्र म्हणजे प्राचीन मानव, मानवी समाज, इतिहास आणि त्याच्याशी निगडित गोष्टींचे अध्ययन. इतिहास आणि पुरातत्त्वशास्त्रमध्ये एक महत्त्वाचा फरक आहे, तो म्हणजे इतिहासामध्ये आपण लेखी दस्तवेजांवर अवलंबून असतो; मात्र पुरातत्त्वशास्त्रात आपण लिखित दस्तवेजांबरोबर मानवाने मागे ठेवलेल्या अवशेषांचा आढावा घेऊन, त्याचा अभ्यास करतो. त्यांचे सखोल निरीक्षण आणि विश्लेषण केले जाते. ज्यावर निष्कर्ष अवलंबून असतात. पुरातत्त्वशास्त्रामध्ये आपण मानवी उत्क्रांतीपासून ते सांस्कृतिक उत्क्रांती आणि संपूर्ण इतिहास जाणून घ्यायचा प्रयत्न करतो. या विषयाची आवड असणाऱ्यांसाठी या क्षेत्रात अनेक संधी आहेत.**



# पुरातत्त्वशास्त्र : शोध मानववंशाचा

**हर्षदा दिपक विरकूड**

पुरातत्त्वशास्त्राची सुरुवात पुराण वस्तुसंशोधन आणि त्यांची विक्री तसेच स्वतःसाठी संग्रह करणे यापासून झाली. मात्र यामुळे गैरव्यवहार वाढीस लागले जसे तस्करी, मंदिरांची, शिल्पांची अथवा महत्त्वाच्या पुरातन जागांची नासधूस वगैरे. त्यामुळे सरकारने त्यावर निर्बंध आणले. भारतामध्ये अँटीक्विटी ॲण्ड आर्ट ट्रेजर्स ॲक्ट (१९७२) आणि ॲनशीएन्ट मॉन्युमेंट्स प्रिजर्वेशन ॲक्ट (१९०४) हे कायदे आपल्या वारशाच्या संरक्षणासाठी आहेत. संग्रह काळानंतर क्लासिकल (शास्त्रोक्त) पुरातत्त्वशास्त्र, त्यानंतर प्रोशेशुअल आणि शेवटी पोस्ट– प्रोशेशुअल या अभ्यासाच्या विविध पद्धती आल्या. प्रत्येक पद्धत पुरातत्त्व अभ्यासाचा एक महत्त्वाचा टप्पा आहे. कारण या प्रत्येक पद्धतीबरोबर एक वेगळा दृष्टिकोन पुरातत्त्वशास्त्रात समाविष्ट होत गेला.

## पुरातत्त्वशास्त्र आणि मानववंशशास्त्र

मानवी इतिहास समजून घेण्यासाठी आपल्याला त्या कालखंडातील भौगोलिक परिस्थिती, पर्यावरण, भाषा, लिपी, कला, औद्योगिक ज्ञान, प्राणी, पक्षी तसेच इतर जीव, खाद्य, शेती आणि धान्य, पाळीव प्राणी या सर्वांविषयी माहिती असावी लागते. अशा अनेक गोष्टींचा अंतर्भाव असल्यामुळे पुरातत्त्वशास्त्र विज्ञान आणि मानववंशशास्त्र या दोन्ही विभागात समाविष्ट आहे.

भारताबाहेर पुरातत्त्वशास्त्र मानववंशशास्त्राचा एक भाग आहे. मात्र भारतामध्ये आपण हा स्वतंत्र विषय म्हणून अभ्यासतो. आज भारतामध्ये अनेक संस्थामध्ये हा विषय शिकवला जातो. तसेच या शास्त्रांतर्गत येणारे साहाय्यक विषय जसे नाणकशास्त्र, पुरालेखविद्या, भारतविद्या, पुराभाषाशास्त्र, पुराभूगर्भशास्त्र, संवर्धनशास्त्र, संग्रहालय अभ्यास इत्यादी स्वतंत्र विषय म्हणूनही शिकवले जातात.

> ***आधुनिक भारताला त्याची ओळख आणि आधुनिक भारतीयाला त्याचा आत्मा तेव्हाच गवसेल जेव्हा नागरिकांना आपल्या देशाच्या अनमोल वारशाबद्दल थोडीफार जाणीव होईल. महान भूतकाळ असलेला असा हा देश मग आपल्या भवितव्याकडे आत्मविश्वासाने आगेकूच करेल.***
>
> ***– नानी अर्देशिर पालखीवाला***

## पुरातत्त्वशास्त्रातील संधी


भारतामध्ये पुरातत्त्वशास्त्र विषयात खूप गती आहे. आज नानाविध प्रकारच्या संधी या क्षेत्रात आहेत. शैक्षणिक संस्थांसहित अनेक खासगी संस्था या क्षेत्रात नोकरी आणि वेगवेगळ्या संधी उपलब्ध करून देत आहेत. शिक्षणक्षेत्रात जसे शाळा किंवा महाविद्यालयात नेट आणि पीएच.डी. किंवा एमए.नंतर डी.एड/बी. एड. केल्यावर शिकवणे, संग्रहालय, संवर्धन, संशोधन, शोध प्रकल्प, उत्खनन योजना, विविध संस्थांसाठी जसे एपिक चॅनेलसाठी आशयसंपन्न मजकूर लिहिणे अथवा वेगवेगवेगळ्या विषयांवर कार्यक्रम तयार करून देणे, वरसास्थळांची सफर आयोजित करणे किंवा पुरातत्त्व शास्त्रज्ञ म्हणून भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाची लेखी परीक्षा देऊन तिथे रुजू होणे, अशा अनेक संधी आहेत. वर्तमानपत्रात आणि त्यांच्या संकेतस्थळावर याबाबत जाहिराती प्रसिद्ध होतात. आर्किओझूलॉजी, आर्किओबोटनी, आर्किओकेमिस्ट्री, आर्किओअस्ट्रोनॉमी, एथनोआर्किओलॉजी इत्यादी विषयांमध्येही खूप वाव आहे.

## विविध शैक्षणिक संस्था

देशातील संस्थांमध्ये भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाचे इन्स्टिट्यूट ऑफ आर्किओलॉजी येथील पदविका कोर्स, डेक्कन कॉलेज, पुणे येथील एम.ए., केरळ युनिव्हर्सिटी येथील एम.ए. कोर्स तसेच बी. एच.यु बनारस हिंदू युनिव्हर्सिटी, एम.एस.यू. बरोडा, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, संत झेवीयर कॉलेज, मुंबई येथील बी.ए, एम.ए हे

## देशातील काही महत्त्वाच्या संस्था

- इन्स्टिट्यूट ऑफ आर्किओलॉजी, न्यू दिल्ली, ०११-२३२७७१०७ www.asi.nic.in
- डेक्कन कॉलेज पोस्ट ग्रॅज्युएट अँड रिसर्च इन्स्टिट्यूट, पुणे, महाराष्ट्र ०२०-२६५१३२००, २६५१३२०७ www.dcpune.ac.in
- द महाराजा सयाजीराव युनिव्हर्सिटी ऑफ बडोदा, वडोदरा, गुजरात, ०२६५-२७९५५५५ www.msubaroda.ac.in
- युनिव्हर्सिटी ऑफ केरळ, थिरूवनंथपुरम ,केरळ, ०४७१-२३० ५९९४ www.keralauniversity.ac.in
- बनारस हिंदू युनिव्हर्सिटी, वाराणसी, उत्तर प्रदेश, ०५४२-६७०२११३ www.bhu.ac.in
- युनिव्हर्सिटी ऑफ कलकत्ता, कोलकाता, वेस्ट बंगाल, ०३३-२२४१००७१ www.caluniv.ac.in
- युनिव्हर्सिटी ऑफ मद्रास, चेन्नई, तामिळनाडू, ०४४-२५३९९४२२ www.unom.ac.in
- दिल्ली इन्स्टिट्यूट ऑफ हेरिटेज रिसर्च अँड मॅनेजमेंट, न्यू दिल्ली, ०११-२६५६७३२४ dihrm.delhigovt.nic.in
- नॅशनल म्युझियम इन्स्टिट्यूट ऑफ हिस्टरी ऑफ आर्ट, कॉन्सरवेशन अँड म्युसीउओलॉजी, न्यू दिल्ली, ०११-२३०१२१०६, nmi.gov.in
- बहि:शाल शिक्षण विभाग, युनिव्हर्सिटी ऑफ मुंबई, सांताक्रुझ, मुंबई, महाराष्ट्र, ०२२-२६५३०२६६ www.extramural.org
- कर्नाटक युनिव्हर्सिटी धारवाड, धारवाड, कर्नाटक, ०८३६-२२१५२७०/२२८/२९६ www.kud.ac.in
- फॅकल्टी ऑफ मॅन्युस्क्रिप्टोलॉजी, तामिळ युनिव्हर्सिटी, थंजाऊर, ०४३६२२२७०४०, www.tamiluniversity.ac.in
- डिपार्टमेंट ऑफ अँथ्रोपोलॉजी, वेस्ट बंगाल स्टेट युनिव्हर्सिटी, ०३३-२५२४१९७६ www.wbsubregistration.org
- आचार्य नागार्जुन युनिव्हर्सिटी, गुंटूर, आंध्रप्रदेश, ०८६३-२३४६११४ www.nagarjunauniversity.ac.in
- युनिव्हर्सिटी ऑफ म्हैसूर, म्हैसूर, कर्नाटक, ०८२१-२४१९४५० www.uni-mysore.ac.in
- इंदिरा गांधी नॅशनल ट्रायबल युनिव्हर्सिटी, अमरकंटक, मध्य प्रदेश, ०७६२९- २६९७०१ www.igntu.ac.in
- झेवीयर कॉलेज, मुंबई, ०२२-२२६२०६६१ www.xaviers.edu
- के जे सोमैय्या सेन्टर फॉर बुद्धिस्ट स्टडीज, ०२२-२१०२२५३७ www.somaiya.edu/buddhist
- कन्या गुरुकुल महाविद्यालय, जी के वि डेहराडून, उत्तराखंड ०१३५-२७४८३३४ www.gkv.ac.in
- सेंटर फॉर म्युझिऑलॉजी अँड कॉन्झरवेशन, युनिव्हर्सिटी ऑफ राजस्थान, जयपूर, राजस्थान, ०९४६८६३७९००, www.unirajcmc.ac.in
- महात्मा जोतिबा फुले रोहिलखंड युनिव्हर्सिटी, बरेली, उत्तर प्रदेश, ०५८१-२५२७२६३ mjpru.ac.in
- युनिव्हर्सिटी ऑफ मिझोराम, एझवाल, मिझोराम, ०३८९-२३३०६५४ www.mzu.edu.in
- साठ्ये कॉलेज, विलेपार्ले, मुंबई, ०२२-२६१४११४९



कोर्स आघाडीचे मानले जातात. म्युझिओलॉजी आणि संवर्धन यासाठी दिल्ली मधील नॅशनल म्युझियम इन्स्टिट्यूट हे अग्रणी मानले जाते. आजकाल खूपशा ठिकाणी पुरातत्त्व आणि संवर्धनकला शिकवण्यासाठी मर्यादित काळाचे अभ्यासक्रमही घेतले जातात. जसे छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालय आणि भाऊ दाजी लाड संग्रहालय येथील संवर्धन अभ्यासक्रम, मुंबई विद्यापीठाच्या कलिना कॅम्पसमधील संस्कृत आणि पाली विभागाचा कंपॅरिटीव्ह मॉथॉलॉजी, संस्कृत, पाली आणि शारदा लिपी अभ्यासक्रम आणि युनिव्हर्सिटी ऑफ मुंबईच्या बहि:शाल शिक्षण विभाग पुरातत्त्व आणि साहाय्यक विषयांसाठी प्रमाणपत्र तसेच पदविका अभ्यासक्रम इत्यादी. बहि:शाल शिक्षण विभागात येथे आता एम.ए. अभ्यासक्रमही सुरु करण्यात आला आहे.



या सर्व संस्थामध्ये आपल्याला या विषयाचे योग्य प्रशिक्षण मिळेल. शैक्षणिक तसेच व्यावहारिक. त्यांच्या अभ्यासक्रमाप्रमाणे तुम्हाला एखाद्या काम सुरू असलेल्या ठिकाणी उत्खननाचे प्रशिक्षण घ्यावे लागते. व्यावहारिक ज्ञान म्हणून एक शोधनिबंध सादर करावा लागतो. प्रयोगशाळेतही काम करायची संधी मिळते. या सर्व गोष्टींचा उपयोग तुम्हाला पुढे एम.फिल. आणि पीएच.डी. करताना होतो. बाहेरच्या देशांप्रमाणेच आता आपल्या देशातदेखील या विषयाचे शिक्षण घेऊन आपली नवी ओळख निर्माण करता येऊ शकते. या विषयाचा अभ्यास करण्यासाठी देशविदेशात शिकण्यासाठी अनेक शिष्यवृत्या उपलब्ध आहेत.

**रीसर्च स्कॉलर- आर्किओलॉजी, डेक्कन कॉलेज पोस्ट ग्रॅज्युएट ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, पुणे. संपर्क: ०८०८२१३३३७४/०८८०५२३२४७५**

**जागतिकीकरण आणि संगणकीकरणामुळे तंत्रज्ञान झपाट्याने बदलत असल्याने मानवी व्यवहारात मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत. ते आत्मसात करून भविष्यातील तांत्रिक बदलांना अनुकूल ठरणारी युवा पिढी घडवण्याचे काम व्यावसायिक प्रशिक्षण संस्था करत आहेत. भविष्यातील स्वप्ने साकार होण्यासाठी रोजगाराला उपयोगी ठरणारे प्रशिक्षण घेणे गरजेचे आहे. अशा परिस्थितीत औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील विविध व्यवसायांचे कौशल्य शिकवणारे प्रशिक्षण हे रोजगार व स्वयंरोजगारासाठी वरदान आहे. येथे प्रत्येकासाठी उज्ज्वल भविष्याची संधी उपलब्ध आहे.**

# कौशल्यातून उन्नतीकडे...



व्यावसायिक प्रशिक्षण संस्थेंतर्गत एक वर्ष कालावधीचे ४७ व २ वर्ष कालावधीचे ३२ व्यवसाय अभ्यासक्रम घेतले जातात. १० वी अनुत्तीर्ण उमेदवार ११ व्यवसाय अभ्यासक्रमात प्रवेशासाठी पात्र आहेत. सर्व व्यवसाय अभ्यासक्रम हे रोजगार महासंचालनालय, कौशल्य विकास व उद्योजकता, भारत सरकार यांच्या अंतर्गत राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (एनसीव्हीटी) यांच्याशी संलग्नित आहेत. प्रशिक्षणाअंती उत्तीर्ण उमेदवारांना अखिल भारतीय व्यवसाय प्रमाणपत्र दिले जाते. गुणवत्तापूर्ण प्रशिक्षणाची हमी म्हणून अखिल भारतीय व्यवसाय प्रमाणपत्रास आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता देण्यात आली आहे.

### ४१७ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था

महिलांसाठी १५ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (१०० टक्के जागा महिलांसाठी राखीव), आदिवासी ६१ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (७५ टक्के जागा अनुसूचित जमातींसाठी राखीव), आदिवासी २८ आश्रमशाळा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (१०० टक्के जागा अनुसूचित जमातींसाठी राखीव), अनुसूचित जाती व नवबौद्धांच्या मुलामुलींसाठी ४ उच्चस्तर औद्योगिक प्रशिक्षण संस्था (८० टक्के जागा अनुसूचित जातींसाठी राखीव), अल्पसंख्याक उमेदवारांसाठी २ स्वतंत्र शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (७० टक्के जागा अल्पसंख्याक उमेदवारांसाठी राखीव), ४२ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये अल्पसंख्याक उमेदवारांसाठी राखीव तुकड्या, ३०७ सर्वसाधारण शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, २५० शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप (सार्वजनिक-खासगी-सहभाग) योजनेंतर्गत दर्जा वाढवण्यात आला आहे. ८७ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा जागतिक बँक साहाय्यित प्रकल्पांतर्गत दर्जावाढ करण्यात आला आहे. १२ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना दर्जावाढ करण्यात आला आहे. औद्योगिक आस्थापनांसोबत सामंजस्य करार करून शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत अद्ययावत तंत्रज्ञानावर आधारित प्रशिक्षण सुविधा विकसित करण्यात येत आहेत. ऑगस्ट २०१७ सत्रातील प्रवेशासाठी साधारणत: ४,२०० तुकड्यांतून प्रवेशासाठी ९५,००० जागा उपलब्ध आहेत.

### ४५४ खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था

सर्व संस्था महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त व एनसीटीव्ही, नवी दिल्ली यांचेशी संलग्नित, ३८५ सर्वसाधारण खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, महिलांसाठी ३ खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (१०० टक्के जागा महिलांसाठी राखीव), अल्पसंख्याक उमेदवारांसाठी ३५ खासगी औद्योगिक प्रशिक्षण

संस्था (अल्पसंख्याक उमेदवारांसाठी राखीव जागा), १ माजी सैनिकांसाठी खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (१०० टक्के जागा संरक्षण सेवा श्रेणीतील उमेदवारांसाठी राखीव), ऑगस्ट २०१७ सत्रातील प्रवेशासाठी साधारणत: २,००० तुकड्यातून प्रवेशासाठी ४५,००० जागा उपलब्ध आहेत.



## प्रशिक्षण संस्था

उमेदवारांच्या सोईसाठी व प्रशिक्षण सुविधेचा महत्तम वापरासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत ३ पाळ्यात (शिफ्ट) प्रशिक्षण देण्यात येते. सकाळी ७.०० ते दुपारी २.३० सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.३०, दुपारी २.३० ते सायंकाळी १०.००, ७० टक्के प्रात्यक्षिक व ३० टक्के सैद्धान्तिक प्रशिक्षणाद्वारे अद्ययावत व रोजगारक्षम कौशल्यपूर्ण प्रशिक्षण, रोजगाराभिमुख कौशल्य सारख्या विषयामुळे प्रशिक्षणार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास, सर्व व्यवसाय अभ्यासक्रमात संगणक प्रशिक्षणाचा समावेश, औद्योगिक आस्थापनांच्या साहाय्याने नि:शुल्क अल्पमुदतीचे प्रशिक्षण, औद्योगिक भेटी सुविधा, १७६ शासकीय व ६२ खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये वसतिगृहांची सुविधा, प्रवेशित उमेदवारांना विद्यावेतन, निर्वाहभत्ता, एस.टी.बस पास सुविधा, हत्यार पेटी, पुस्तक पेढी, स्वयंरोजगारासाठी कर्ज इ. सुविधा.

## रोजगाराच्या संधी

शिकाऊ उमेदवारी योजनेंतर्गत साधारणत: ११,००० औद्योगिक आस्थापनांमध्ये १ लक्ष जागा स्थित, ४३ मूलभूत अनुषंगिक सूचना केंद्रांमधून रोजगार मेळाव्यातून शिकाऊ उमेदवारी व नियमित रोजगाराची हमी मिळते.

## शिल्पकारागीर प्रशिक्षण योजना

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत 'माहितीपुस्तिका भाग १– प्रवेश पद्धती व नियमावली' व 'माहितीपुस्तिका भाग–२ प्रवेश प्रक्रियेतील विविध स्तरावर करावयाच्या कार्यवाहीसाठी प्रमाणित कार्यपद्धती' उपलब्ध करून देण्यात येते. प्रवेशेच्छुक उमेदवारांनी व पालकांनी माहिती पुस्तिकेत देण्यात आलेली माहिती व प्रवेशाबाबतच्या पद्धती व नियमांचा अभ्यास करून ऑनलाइन प्रवेश अर्ज सादर करावा.

## प्रवेश अर्ज

ऑनलाइन प्रवेश अर्जासाठी admission.dvet.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी. ऑनलाइन अर्जात प्राथमिक माहिती भरल्यानंतर उमेदवारांचे प्रवेश खाते (अॅडमिशन अकाऊंट) त्यांचा नोंदणी क्रमांक (रजिस्ट्रेशन नंबर) हाच युजर आयटी म्हणून तयार होईल.

नोंदणी क्रमांक व युजर आयडीचा वापर करून संकेतस्थळावर संपूर्ण प्रवेश अर्ज भरल्यानंतर प्रवेश अर्जाची छापील प्रत (प्रिंट आऊट) घ्यावी.

## प्रवेश अर्ज निश्चितीकरण

या प्रवेश अर्जाची छापील प्रत, उमेदवारांनी अर्जात केलेल्या दाव्यांच्या पृष्ठ्यर्थ सर्व मूळ दस्तऐवज, कागदपत्रांचा स्वयं सत्यापित (सेल्फ अटेस्टेड) प्रतींचा एक संच व लागू असलेले अर्जशुल्क राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत अर्ज निश्चितीसाठी सादर करावेत.

अर्ज स्वीकृती केंद्रामधील अधिकारी हे अर्जाची छापील प्रत व उमेदवारांने दिलेल्या मूळ दस्तऐवजावरून काळजीपूर्वक छाननी करून तपासणी करतील. तपासणीनंतर अर्जाचे निश्चितीकरण करून उमेदवारास 'अर्ज निश्चितीकरण पावती' (अॅप्लीकेशन कन्फर्मेशन स्लिप) देतील.

## पहिल्या प्रवेश फेरीसाठी विकल्प

प्रवेश अर्ज निश्चित केल्यावरच पहिल्या प्रवेश फेरीसाठी व्यवसाय व संस्थानिहाय विकल्प व प्राधान्य सादर करण्यासाठी प्रवेश संकेतस्थळावर नोंदणी क्रमांक (रजिस्ट्रेशन नंबर) व पासवर्डद्वारे प्रवेश (लॉगीन) करून सादर करावेत.

## प्राथमिक गुणवत्ता यादी तपासणे व हरकती नोंदवणे

प्राथमिक गुणवत्ता यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येते. उमेदवारांना एसएमएसद्वारे कळवण्यात येते. उमेदवारास गुणवत्ता यादीबाबत हरकती असल्यास प्रवेश संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या प्रपत्रात लेखी स्वरूपात नजीकच्या शासकीय व खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत हरकत नोंदवावी.

### प्रवेशाची प्रत्यक्ष कार्यवाही

प्रवेश फेरीसाठी संस्था व व्यवसायनिहाय निवड यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येऊन उमेदवारांना एसएमएसद्वारे कळवण्यात येते. पहिल्या प्रवेशफेरीसाठी निवड झालेल्या संस्थेत उमेदवारांनी सर्व मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी उपस्थित राहून प्रवेशाची प्रत्यक्ष कार्यवाही करावी.



### पुढील प्रवेश फेरीसाठी विकल्प

निवड न झालेल्या व प्रवेश न घेतलेल्या उमेदवारांनी पुढील प्रवेश फेरीसाठी ऑनलाइन पद्धतीने व्यवसाय व संस्थानिहाय विकल्प व प्राधान्य सादर करावे. उमेदवाराने नव्याने विकल्प सादर न केल्यास उमेदवाराने पूर्वीच्या प्रवेश फेरीमध्ये सादर केलेले जुनेच विकल्प या प्रवेश फेरीमध्ये विचारात घेण्यात येतील.

### नव्याने अर्ज करणे

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (एसएससी) पुरवणी परीक्षेत उत्तीर्ण/अनुत्तीर्ण व अद्यापपर्यंत कोठेही प्रवेश न घेतलेल्या तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रवेशासाठी अर्ज न केलेल्या उमेदवारांसाठी प्रवेशाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी ५ व्या प्रवेश फेरीपूर्वी नव्याने अर्ज करण्याची किंवा अर्जात बदल करणे व प्रवेश अर्ज निश्चित करण्यासाठी संधी.

### समुपदेशन फेरीसाठी नाव नोंदणी

नोंदणीकृत उमेदवारांनी संबंधित पाचव्या प्रवेश फेरीसाठी जिल्ह्याच्या ठिकाणी असणाऱ्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये वा सहाव्या प्रवेश फेरीसाठी संबंधित शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत व्यक्तिश: हजर राहून समुपदेशन फेरीकरिता हजेरी नोंदवावी.

### समुपदेशन फेरी

हजर असलेल्या उमेदवारांना राज्यस्तर गुणवत्ता क्रमांकानुसार समुपदेशनाकरिता बोलावण्यात येईल. प्रवेशाकरिता उपलब्ध जागा, उमेदवाराची मागणी, उमेदवाराची अर्हता या आधारावर प्रवेशाच्या जागांचे वाटप करण्यात येते.

### संस्थास्तरावरील प्रवेश

खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये संस्थास्तरावरील जागा व पाचव्या प्रवेश फेरीनंतर रिक्त राहिलेल्या जागांवर ज्या उमेदवारांची प्रवेश घेण्याची इच्छा आहे. त्यांनाही तपशीलवार माहितीसह संकेतस्थळावर नोंदणी करावी लागेल. नोंदणीकृत उमेदवारांनी ज्या खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रवेश घ्यावयाचा आहे. त्या संस्थेत व्यक्तिश: हजर राहून सर्व मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीनंतर प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी. केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या दिवसापासून ते प्रवेशाच्या अंतिम दिनांकापर्यंत खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये संस्थास्तरावरील जागांवर उमदेवारांना प्रवेश घेता येतो.

## व्यावसायिक शिक्षण अंतर्गत राबवण्यात येणाऱ्या योजना

व्यवसाय प्रशिक्षणाची व्याप्ती मोठी आहे. व्यवसाय प्रशिक्षणाचे प्रामुख्याने चार अभ्यासक्रम आहेत. पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम, द्रिलक्षी अभ्यासक्रम, उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रम यांचा समावेश आहे. व्यवसाय शिक्षणांतर्गत राबवण्यात येणाऱ्या काही योजना.

### माध्यमिक स्तरावरील पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम

१९८६च्या शैक्षणिक धोरणानुसार माध्यमिक स्तरावर कार्यानुभव आधारित विषय घेण्यावर भर देण्यात आला होता. जेणेकरून भावी आयुष्यात विद्यार्थी प्रत्यक्ष काम करण्यासाठी तयार होऊ शकतील. या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल व इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी विषयातील मूलभूत कौशल्ये आत्मसात करता येतात. त्या कौशल्यांचा दैनंदिन जीवनात उपयोग करता येतो. आवश्यकतेनुसार या कौशल्याची व्याप्ती वाढवण्यासाठी विद्यार्थी अभियांत्रिकी क्षेत्रातील उच्च शिक्षणाकडे वळू शकतो अथवा आपल्या आवडीप्रमाणे रोजगार/स्वयंरोजगार निवडू शकतो. माध्यमिक स्तरावर भाषा व समाजशास्त्र विषयांवरील तांत्रिक विषय हा मुख्य विषय म्हणून निवडता येतो.

इ. ९ वी व १० वीमध्ये पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम शिकवला जातो. शासकीय तंत्र माध्यमिक शाळा/ केंद्रांच्या १० कि.मी. परिसरातील सहयोगी शाळांमधील इ. ९ वी व १० वी स्तरावरील शालेय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आठवड्यात १ दिवस पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम शिकवला जातो.

२०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांतर्गत खालील अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात आला आहे. मल्टी स्किल फाऊंडेशन कोर्स, मेकॅनिकल टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रिकल टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी, ऑटोमोबाइल सर्व्हिसेस टेक्निशियन, जनरल ड्युटी असिस्टंट, प्रायव्हेट

सिक्युरिटी आणि रिटेल बिझनेस, अभियांत्रिकी चित्रकलेची मूलतत्वे, विद्युत व इलेक्ट्रॉनिक्स विषयातील सर्किट डायग्राम तसेच संगणकाची मूलभूत तत्त्वे विद्यार्थ्यांना शिकवण्यात येतात.

इ. १० वी उत्तीर्ण उमेदवारांना तंत्रनिकेतन प्रवेशासाठी १५ टक्के जागा राखीव आहेत. इ. ११ वी व्यावसायिक प्रवेशासाठी ४० टक्के जागा राखीव आहेत. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रवेशासाठी २५ टक्के जागा राखीव आहेत.

## + २ स्तरावरील द्विलक्षी अभ्यासक्रम

डॉ. कोठारी आयोगाच्या शिफारशीनुसार + २ स्तरावर व्यवसाय करण्याची जोड देऊन अधिकाधिक विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात येऊन व रोजगार/स्वयंरोजगार करण्यास प्रवृत्त करण्यात येत आहे. महाविद्यालयीन शिक्षणाकडे जाणारा लोंढा थांबणे अपेक्षित आहे. द्विलक्षी अभ्यासक्रम त्यासाठी उपयुक्त ठरले आहेत. इयत्ता १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी स्वयंरोजगार करावा व ते शक्य नसल्यास पुढील शिक्षण सुरू ठेवावे असा दुहेरी हेतू या योजनेमध्ये आहे, म्हणून या योजनेस द्विलक्षी अभ्यासक्रम असे संबोधण्यात येते.



तांत्रिक, वाणिज्य, कृषी व मत्स्य अशा चार गटांमधून १६ द्विलक्षी अभ्यासक्रम राबवण्यात येत आहेत. इ.११ वी, १२ वी मध्ये आवश्यक ६ विषयांपैकी एक भाषा व एक विज्ञान शाखेतील सूट देऊन त्या ऐवजी ३३ टक्के व्याप्ती असलेला २०० गुणांचा एक व्यवसाय अभ्यासक्रम शिकवण्यात येतो.

इ. १२ वी उत्तीर्ण झाल्यानंतर शिकाऊ उमेदवारी कायदा १९६१ अंतर्गत निर्देशित अभ्यासक्रमात व्होकेशनल टेक्निशियन म्हणून १ वर्षाची शिकाऊ उमेदवारी करण्याची संधी असून, प्रशिक्षण काळात विद्यावेतन अनुज्ञेय आहे.

इ.१२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाच्या ठरावीक प्रमाणपत्र अभ्यासक्रमांना थेट बसण्याची मुभा आहे.

## + २ स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम

डॉ. कोठारी आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र शासनाने इ.११ वी व इ. १२ वीच्या स्तरावर व्यवसाय शिक्षणाची जोड द्यावी व जास्त विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देऊन रोजगार व स्वयंरोजगार करण्यास प्रवृत्त करावे व महाविद्यालयीन शिक्षणाकडे जाणारा लोंढा थांबवावा, या हेतूने ७० टक्के व्याप्ती असलेले व्यवसाय अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. या व्यवसाय अभ्यासक्रमांमध्ये ७० टक्के प्रात्यक्षिकांचा व उर्वरित ३० टक्के अभ्यासक्रमात दोन भाषा विषय व एक पायाभूत अभ्यासक्रम (जनरल फाऊंडेशन कोर्स) यांचा समावेश आहे. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून हे व्यवसाय अभ्यासक्रम सुधारित करण्यात आले आहेत.

तांत्रिक, वाणिज्य, कृषी, मत्स्य, अर्धवैद्यकीय व गृहशास्त्र अशा ६ विषयांच्या चार गटांमधून सुधारित २० व्यवसाय अभ्यासक्रम २०१६-१७ पासून सुरू करण्यात आले आहेत.

इ.१२ वीची अंतिम परीक्षा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाद्वारे घेण्यात येते. प्रशिक्षण कालावधीत कारखान्यात/उद्योगात प्रत्यक्ष कामाच्या जागी प्रशिक्षण घेण्याची सोय असते.

इ.१२ वी उत्तीर्ण झाल्यानंतर शिकाऊ उमेदवारी कायदा १९६१ अंतर्गत निर्देशित व्यवसायात व्होकेशनल टेक्निशियन म्हणून १ वर्षाची शिकाऊ उमेदवारी करण्याची संधी असून या काळात विद्यावेतन अनुज्ञेय आहे. पदविकेच्या द्वितीय वर्षात थेट प्रवेशासाठी २ टक्के जागा आरक्षित आहे. डी.एड. प्रवेशासाठी पात्र आहेत.

## व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम

शालेय स्तरावरील शिक्षण अर्धवट सोडलेल्या व उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेऊ न शकलेल्या विद्यार्थ्यांसाठी रोजगार/स्वयंरोजगारास उपयुक्त महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे अल्प मुदतीचे अभ्यासक्रम राबवण्यात येत आहेत. सद्य:स्थितीत राज्यातील २५ शासकीय व १५०० अशासकीय विनाअनुदानित तंत्र माध्यमिक शाळा/केंद्रांमधून ६ महिने ते २ वर्षे कालावधीचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबवण्यात येत आहेत.

६ महिने ते २ वर्षे या कालावधीचे (पूर्णवेळ व अर्धवेळ) एकूण ३१५ व्यवसाय अभ्यासक्रम राबवण्यात येत आहेत.

राज्यात मध्यम व मोठ्या औद्योगिक आस्थापनांची तसेच लघुउद्योगांची वाढ झाल्यामुळे कुशल कामगारांची गरज निर्माण झाली आहे. त्याचबरोबर स्वयंरोजगाराच्या संधीसुद्धा उपलब्ध झाल्या आहेत. त्याकरिता विविध क्षेत्रात कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देणे, हा मंडळाचा प्रमुख उद्देश आहे.

शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या तसेच प्राथमिक व उच्च माध्यमिक शिक्षण अर्धवट सोडलेल्या विद्यार्थ्यांना तांत्रिक कौशल्ययुक्त करून रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येतात. उपरोक्त अभ्यासक्रमांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानानुसार बदल होत आहेत. तसेच औद्योगिक व सेवाक्षेत्रामध्ये असलेली तांत्रिक मनुष्यबळाची मागणी पूर्ण करण्यासाठी या योजनेमध्ये अंतर्भूत असलेल्या अभ्यासक्रमांची व्याप्ती वाढत आहे.

**संकलन: गजानन पाटील**
संपर्क: ०९६६५९९७०३४

**शिक्षण हे व्यक्तिमत्त्व विकासाचे, समाज परिवर्तनाचे आणि राष्ट्रीय विकासाचे एक प्रमुख साधन आहे. ही बाब विचारात घेऊन केंद्र शासनाच्या व राज्य विविध शैक्षणिक योजना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी विविध विभागामार्फत राबवल्या जात आहेत. कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये आणि त्याला देशपरदेशात उच्च शिक्षण घेता यावे यासाठी, शासनाच्या विविध विभागांतर्गत शैक्षणिक योजना राबवण्याबरोबरच त्यासाठी शिष्यवृत्ती दिली जाते.**



# स्वप्नांना शिष्यवृत्तीचे बळ

**वर्षा फडके**

अल्पसंख्याक विकास विभागामार्फत राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध शिष्यवृत्ती देण्यात येतात. त्यांचा लाभ घेऊन अनेक होतकरू विद्यार्थी उच्च शिक्षण घेऊन मोठ्या पदांवर कार्यरत आहेत.

## अल्पसंख्याक विभाग

### उच्च शिक्षण आणि व्यावसायिक शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

उच्च व्यावसायिक आणि इयत्ता बारावीनंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरिता ही शिष्यवृत्ती योजना आहे. बारावीनंतर वैद्यकीय, तांत्रिक आणि व्यावसायिक, इतर पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळतो.

पालकांचे उत्पन्न ६ लाख रुपयांपेक्षा कमी असावे. वैद्यकीय शिक्षणासाठी वैद्यकीय शिक्षण संचालक तर तंत्रशिक्षण शिक्षणासाठी तंत्रशिक्षण संचालक हे या योजनेची अंमलबजावणी करत असतात.

वैद्यकीय आणि व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी २५ हजार रुपये तर पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणासाठी ५ हजार रुपये अशी शिष्यवृत्तीची रक्कम आहे. विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येते.

### मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती

केंद्र शासनाच्या अल्पसंख्याक कार्य मंत्रालयाकडून मॅट्रिकपूर्व योजना राबवण्यात येते. शासकीय आणि खासगी शाळांमध्ये इयत्ता पहिली ते दहावीमध्ये शिकत असलेले विद्यार्थी या शिष्यवृत्तीचे लाभार्थी आहेत.

पालकांचे वार्षिक उत्पन्न १ लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी असणे आवश्यक आहे. राज्यातील शालेय शिक्षण आणि अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण संचालनालय या योजनेची अंमलबजावणी करतात. वसतिगृहात राहणाऱ्या इयत्ता ६वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी कमाल १० हजार रुपये तसेच वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कमाल ५ हजार रुपये आणि इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना वार्षिक आहारभत्ता १ हजार रुपये दिला जातो.

### पोस्टमॅट्रिक शिष्यवृत्ती

केंद्र शासनाच्या अल्पसंख्याक कार्य मंत्रालयाकडून पोस्ट मॅट्रिक योजना राबवण्यात येते. अल्पसंख्याक समाजातील अकरावी ते पीएच.डी. तसेच एनसीव्हीटीशी मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये तांत्रिक, व्यावसायिक अभ्यासक्रम शिकणाऱ्या अकरावी आणि बारावी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्तीचा लाभ मिळतो.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी पालकांचे वार्षिक उत्पन्न २ लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी असणे आवश्यक आहे.

राज्यातील उच्च व तंत्रशिक्षण आणि शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) या योजनेची अंमलबजावणी करतात. प्रत्येक वर्षी २० हजार रुपये, आहारभत्ता १,४०० रुपयांपासून ५,१०० रुपयांपर्यंत मिळतो.

### गुणवत्ता नि साधन आधारित शिष्यवृत्ती

केंद्र शासनाच्या अल्पसंख्याक कार्य मंत्रालयाकडून पोस्ट मॅट्रिक योजना राबवण्यात येते. इंजिनिअरिंग, वैद्यकीय पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम, तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्तीचा फायदा घेता येतो.

पालकांचे वार्षिक उत्पन्न २.५० लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी असणे आवश्यक आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, तंत्र शिक्षण संचालक या योजनेची अंमलबजावणी करतात. वसतिगृहातील विद्यार्थ्यांना ३० हजार रुपये तर वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना २५ हजार रुपये दिले जातात.



### उच्च व्यावसायिक आणि १२ वीनंतर सर्व अभ्यासक्रमांसाठी शिष्यवृत्ती

या योजनेचा फायदा अल्पसंख्याक समाजातील उच्च व तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना मिळतो. या योजनेंतर्गत हा विद्यार्थी ज्या शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेत असेल, त्या अभ्यासक्रमाकरिता आकारण्यात आलेले वार्षिक शैक्षणिक शुल्क किंवा २५ हजार रुपये यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम शिष्यवृत्ती म्हणून देण्यात येते. २९ जुलै २०१८ च्या शासन निर्णयानुसार या योजनेंतर्गत या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची सर्व स्रोतांद्वारे मिळणाऱ्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा २.५ लाख रुपयांवरून ६ लाख रुपये करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत मागील ८ आर्थिक वर्षांमध्ये जवळपास ६०० कोटी रुपये वितरित करण्यात आले असून, या योजनेचा फायदा जवळपास २.५० लाख विद्यार्थ्यांनी घेतला आहे.

२०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी १०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, १९,५०० नवीन विद्यार्थ्यांना अधिक नूतनीकरणाची शिष्यवृत्ती देण्याचे उद्दिष्ट आहे. वैद्यकीय शिक्षण संचालक, तंत्रशिक्षण संचालक या योजनेची अंमलबजावणी करणारी यंत्रणा आहे.

## शालेय शिक्षण

### पूर्व माध्यमिक आणि माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती

राज्यातील गुणवान विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी पूर्व माध्यमिक आणि माध्यमिक शाळातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत घेतलेल्या



स्पर्धात्मक शिष्यवृत्ती परीक्षांच्या निकालातील गुणवत्तेनुसार शिष्यवृत्ती दिली जाते. साधारणपणे शिष्यवृत्तीचा कालावधी तीन वर्षांचा असतो. शैक्षणिक वर्षात दहा महिन्यांसाठी शिष्यवृत्तीची रक्कम दिली जाते. प्रत्येक जिल्ह्यांचे ग्रामीण आणि नागरी क्षेत्रासाठी शिष्यवृत्त्यांचे स्वतंत्र आणि ठरावीक संच निर्धारित केले आहेत. गणित, भाषा आणि बुद्धिमत्ता या तीन विषयांचा शिष्यवृत्ती परीक्षेत समावेश असावा, असा आग्रह शिक्षक आणि पालकांकडून होत असे. विविध मतांचा विचार करून शिक्षण तज्ज्ञांच्या मदतीने शिष्यवृत्ती परीक्षांची पुनर्मांडणी करण्यात आली. त्यानुसार शासनाने सुधारीत अभ्यासक्रम तयार केला आहे. शासनामार्फत प्रथमच शिष्यवृत्ती परीक्षेची पुस्तके तयार केली आहेत. २९ जून २०१५ च्या शासन निर्णयानुसार पूर्व माध्यमिक आणि माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षेचा स्तर इयत्ता चौथी ऐवजी पाचवी आणि इयत्ता सातवी ऐवजी आठवी करण्यात आला आहे. शिष्यवृत्ती एकूण ४ संचात वर्गवारी करण्यात आले असून, ३० रुपयांपर्यंत ते १५० रुपयांपर्यंत साधारणपणे १० महिन्यांसाठी शिष्यवृत्तीची रक्कम मिळते.

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग

### डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता

व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतल्यानंतर ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना समस्या भेडसावते ती शहरांमध्ये येऊन शिक्षण घेण्याची. काही महाविद्यालयांमध्ये वसतिगृहाची सुविधा उपलब्ध असते, तर काही ठिकाणी विद्यार्थी जागा भाड्याने घेऊन राहतात. केवळ शिक्षणशुल्कासाठी शिष्यवृत्ती देणे पुरेसे नाही हे लक्षात ठेवून राज्य शासनाने 'डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना' सुरू केली.

ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्पभूधारक शेतकरी किंवा नोंदणीकृत मजूर आहेत. अशा विद्यार्थ्यांना शासनाने निश्चित केलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेण्यासाठी, डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना फायद्याची ठरणार आहे.

या योजनेत शासकीय, शासन अनुदानित आणि विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालय किंवा तंत्रनिकेतनमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा निर्वाह भत्ता मिळणार आहे.

या योजनेत महानगरात (मुंबई महानगर क्षेत्र, पुणे, औरंगाबाद, नागपूर) शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रतिमहा तीन हजार रुपये (वार्षिक ३०

हजार रुपये) तर या शहरांव्यतिरिक्त अन्य शहरात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रतिमहा दोन हजार रुपये (वार्षिक २० हजार रुपये) वसतिगृह निर्वाह भत्ता मिळणार आहे. हा निर्वाहभत्ता शैक्षणिक वर्षातील सुटीचा कालावधी वगळून उर्वरित १० महिन्यांच्या कालावधीकरिता आहे. या योजनेची अंमलबजावणी मागील शैक्षणिक वर्षापासूनच लागू करण्यात आली असून, यापूर्वीच्या वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाही या वर्षापासून लाभ मिळणार आहे.

पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा १ लाख रुपये असलेल्या आणि व्यावसायिक अभ्यासक्रमात असणाऱ्या विद्यार्थ्यांनाही वार्षिक निर्वाह भत्ता देण्यात येतो. ही योजना पुढील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी लागू.

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग:** पदविका – दहावीनंतर अभियांत्रिकी पद, १२ वीनंतर औषधी निर्माण शास्त्र पदविका, १२ वीनंतर हॉटेल व्यवस्थापन पदविका. पदवी – इंजिनीअरिंग, फार्मसी, हॉटेल मॅनेजमेंट व केटरिंग टेक्नॉलॉजी, आर्किटेक्चर. पदव्युत्तर पदवी – एम.बी.ए./एम.एम.एस., एम.सी.ए.

**वैद्यकीय शिक्षण विभाग**: पदवी – एमबीबीएस, बीडीएस, बीएएमएस, बीएचएमएस, बीयूएमएस, बीपीटीएच, बीओटीएच, नर्सिंग.



**कृषी विभाग:** पदविका – कृषी पदविका/पदवी कृषी, फलोत्पादन, जैवतंत्रज्ञान, अन्न तंत्रज्ञान, शेती व्यवस्थापन.

पदव्युत्तर पदवी – कृषी व संलग्न अभ्यासक्रम

**पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग**: पदविका – दुग्धव्यवसाय व्यवस्थापन, पशुसंवर्धन व्यवस्थापन. पदवी – प्राणिशास्त्र व पशुसंवर्धन, दुग्धतंत्रज्ञान, मत्स्य विज्ञान. पदव्युत्तर पदवी – प्राणिशास्त्र.

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती

व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी शासनाने राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना आणली. विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असताना शिक्षणाची गुणवत्ता आणि उपयुक्तता तपासून घेणे आवश्यक आहे.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना विद्यार्थी केंद्रित असून, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या आणि इतर काही विभागांतर्गत असणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या शासकीय, शासन अनुदानित, खासगी विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित संस्थांमध्ये प्रवेश घेणाऱ्या मागासवर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

विद्यार्थ्यांसाठी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाकडून देण्यात येणारा आधार क्रमांक प्राप्त करून हा क्रमांक बँकेच्या खात्याशी संलग्न करून घेण्यात येत आहे. आधार पेमेंट ब्रिज सिस्टिमद्वारे शासनाच्या विविध योजनांचे अनुदान, शिष्यवृत्ती, प्रतिपूर्ती इत्यादीची रक्कम थेट लाभार्थींच्या (डीबीटी) खात्यात पाठवता येईल, अशी कार्यपद्धती विकसित करण्यात आली आहे.

## या योजनेचे फायदे

या योजनेंतर्गत ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीची मर्यादा आता १ लाख रुपयावरून ८ लाख रुपये करण्यात आली आहे.

उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण, कृषी विभाग, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्य व्यवसाय विभाग यांचे अभ्यासक्रम शिकणाऱ्या जवळपास ६ लाख विद्यार्थ्यांना १२०० कोटी रुपयांचा लाभ मिळणार आहे.

ईबीसी आणि ओबीसी विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काच्या ५० टक्के रक्कम आता शिष्यवृत्तीच्या स्वरूपात मिळणार आहे. ही रक्कम आधार संलग्नित बँकेत विद्यार्थ्यांच्या खात्यावर थेट जमा होणार आहे.

वैद्यकीय शिक्षणासाठी बँक कर्ज घेतल्यास त्यावरील व्याजाची रक्कम शासन भरणार आहे. सर्व नव्या सवलती डीबीटीद्वारे (डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर–थेट लाभ हस्तांतरण) यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यात आल्या आहेत. यामध्ये एकूण ६०५ अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

## पात्र महाविद्यालये

राज्यातील सर्व खासगी विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये/तंत्रनिकेतने (खासगी अभिमत/स्वयं अर्थसाहाय्य विद्यापीठे वगळून) आणि सरकारी, सरकार अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतनामधील (सरकारी अभिमत विद्यापीठांसह) या योजनेंतर्गत निर्धारित केलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सक्षम प्राधिकरणामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणारे विद्यार्थी पात्र असतील.

## निकष

राज्य शासनाने निर्धारित केलेल्या वरील व्यावसायिक अभ्यासक्रमांना सरकारी, अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतनामध्ये प्रवेश घेणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्पभूधारक किंवा नोंदणीकृत मजूर आहेत, त्यांच्यासाठी वसतिगृह निर्वाह भत्ता

योजना आहे. या योजनेबाबत सविस्तर माहिती महाराष्ट्र सरकारच्या 'महाडीबीटी' या संकेतस्थळावरून घेता येईल.

### सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती

ही शिष्यवृत्ती केंद्र शासन पुरस्कृत आहे. राज्यातील विविध परीक्षा मंडळ, सीबीएसई, आयसीएसईमधून १२ वीमध्ये किमान ८० टक्के गुण प्राप्त होणे आवश्यक आहे.

अर्जदाराच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न ४.५० लाख रुपयांपेक्षा अधिक नसावे. अर्जदाराने इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला नसावा. यामध्ये पदवीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी १० हजार रुपये तर पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रतिवर्षी २० हजार रुपये प्रतिवर्षी देण्यात येतात.

### पोस्ट मॅट्रिक अल्पसंख्याक शिष्यवृत्ती

अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यास मागील वर्षीच्या परीक्षेत ५० टक्क्यांपेक्षा कमी गुण नसावे. आईवडील/पालकांचे वार्षिक उत्पन्न दोन लाख रुपयांपेक्षा अधिक नसावे. या शिष्यवृत्तींतर्गत १० महिन्यांकरिता दरमहा २३० ते १२०० रुपयांपर्यंत शिष्यवृत्ती मिळते.

### अहिंदी भाषिकांसाठी हिंदी शिष्यवृत्ती

अहिंदी राज्यातील विद्यार्थ्यांना शालांत परीक्षेनंतर अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी केंद्र शासनाने ही शिष्यवृत्ती सुरू केली.

या शिष्यवृत्तीचे एकूण २५५ संच मंजूर आहेत. यामध्ये अकरावी आणि बारावीसाठी १५३, पदवीसाठी ७७ आणि पदव्युत्तरसाठी २५ असे निवडले जातात. अहिंदी भाषक विद्यार्थ्यांस हिंदी विषयात शालांत परीक्षेत किमान ६० गुण मिळणे आवश्यक आहे.

कनिष्ठ महाविद्यालयात शिकत असताना ३०० रुपये, पदवी शिक्षण घेताना ५०० रुपये आणि पदव्युत्तर शिक्षण घेताना १००० रुपये दरमहा शिष्यवृत्ती म्हणून दिले जातात.

### राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती

गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यास उत्तेजन मिळावे म्हणून राज्य शासनाने खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती सुरू केली. जी कला, वाणिज्य, विज्ञान आणि विधी शाखेतील पदवी घेण्यासाठी देय आहे. ही शिष्यवृत्ती मिळण्यासाठी बारावीच्या परीक्षेत किमान ६० टक्के गुण असणे आवश्यक आहे. यामध्ये दरमहा १०० रुपये शिष्यवृत्ती मिळते. ही शिष्यवृत्ती नवीन मंजुरीसाठी १० महिने व नूतनीकरणासाठी १२ महिन्याकरिता दिली जाते.



या शिष्यवृत्तीची नवीन मंजुरी संचालक(उच्च शिक्षण) आणि नूतनीकरण मंजुरी उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक यांच्याकडून करण्यात येते. यासाठी विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालयामार्फत सप्टेंबरपर्यंत मिळणे आवश्यक असून, अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख ३० सप्टेंबर नमूद करण्यात आली आहे.

### गणित आणि भौतिकशास्त्रातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती

या शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना दर महिन्याला १०० रुपये प्रमाणे शिष्यवृत्ती दिली जाते. इयत्ता बारावी परीक्षेत किमान ६० टक्के गुण आणि गणित, भौतिकशास्त्र या विषयात ६० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांनाही दिली जाते. या शिष्यवृत्तीत १०० मंजूर संच असून यामध्ये गणितासाठी ५० आणि भौतिकशास्त्रसाठी ५० संच देण्यात आले आहेत. या शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालयामार्फत सप्टेंबरपर्यंत मिळणे आवश्यक असून या शिष्यवृत्तीसाठी अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख ३० सप्टेंबर नमूद करण्यात आली आहे.

### शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती योजना

ही शिष्यवृत्ती राज्यातील शासकीय विद्यानिकेतनमधून शालांत परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी दिली जाते. या शिष्यवृत्ती ८० (शासकीय विद्यानिकेतन पुसेगाव, अमरावती, औरंगाबाद) मंजूर संच आहेत. राज्यातील शासकीय विद्यानिकेतन मधून ६०% गुणांसह दहावी पूर्ण केलेले विद्यार्थी यासाठी पात्र असून, त्यांनी या शिष्यवृत्तीसाठी त्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांमार्फत अर्ज सादर करणे आवश्यक आहे. या शिष्यवृत्तींतर्गत कनिष्ठ महाविद्यालयाकरिता १ हजार रुपये प्रतिवर्षी तर वरिष्ठ महाविद्यालयाकरिता १२०० रुपये प्रतिवर्षी मिळतात.

### एकलव्य आर्थिक साहाय्य

होतकरू आणि गरीब विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करता यावे, यासाठी एकलव्य आर्थिक साहाय्य योजना सुरू केली आहे. पदवी अभ्यासक्रमामध्ये विधी, वाणिज्य आणि कला शाखेकरिता किमान ६० टक्के, विज्ञान शाखेत ७० टक्के गुण मिळणे आवश्यक आहे. पालकांचे वार्षिक उत्पन्न ७५ हजार रुपयांपेक्षा कमी असावे. यामध्ये दरवर्षी ५ हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळते. या शिष्यवृत्तीचा फायदा



मिळवण्यासाठी विद्यार्थी कुठेही पूर्ण किंवा अर्ध वेळ काम करणारा नसावा.

### गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक साहाय्य

माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत वरचा क्रमांक मिळवणाऱ्या गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक साहाय्य देण्याची ही योजना आहे.

### दक्षिणा अधिछात्रवृत्ती

राज्यातील विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षणासाठी दक्षिणा अधिछात्रवृत्ती सुरू करण्यात आली आहे. शासकीय विज्ञान संस्था आणि महाविद्यालये, अकृषी महाविद्यालये आणि विद्यापीठे येथे पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्यांना लाभ मिळतो. यामध्ये दरमहा २५० रुपयांची शिष्यवृत्ती मिळते.

### शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती

विद्यार्थ्यांना पीएच.डी. करता यावी, या उद्देशाने ही शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती देण्यात येते. पीएच.डी.साठी निवड समितीने शिफारस केलेल्या विद्यार्थ्यांना दरमहा १७५० रुपयाची शिष्यवृत्ती मिळते. बीए/बीएससी, बीएड आणि एमएड, एमएस्सीएमएड यापैकी एक पदवी परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्य पदवी परीक्षेत किमान द्वितीय श्रेणी प्राप्त होणे आवश्यक आहे. अर्जदार कोठेही सेवेत नसावा. तसेच त्याने यापूर्वी कोणतीही शिष्यवृत्ती घेतलेली नसावी.

### जवाहरलाल नेहरू विद्यापीठ शिष्यवृत्ती

जवाहरलाल नेहरू विद्यापीठाकडून या शिष्यवृत्तीसाठी संच निर्धारित केले जातात. महाराष्ट्रासाठी एक संच निर्धारित करण्यात आला आहे. यामध्ये दरमहा ८,००० ते १०,००० रुपये शिष्यवृत्ती मिळते.

### माजी सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक साहाय्य

महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र दाखल केलेल्या मेजर, नौदल, वायुदल दर्जाच्या किंवा त्यापेक्षा कमी हुद्द्याच्या माजी सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलती दिल्या जातात. स्वातंत्र्यसैनिकांच्या पाल्यांना सर्व स्तरांवर शैक्षणिक सवलत देण्यात येते.

### गुणवान विद्यार्थ्यांना अर्थसाहाय्य

माध्यमिक आणि उच्च माध्यमिक परीक्षेतील गुणवत्ता यादीत वरच्या क्रमांकाने स्थान मिळवणाऱ्या गुणवान विद्यार्थ्यांना शासनमान्य आणि अनुदानित महाविद्यालयांकडून आकारण्यात येणाऱ्या सर्व शुल्काची पूर्तता करण्यात येते. एकूण मंजूर संच माध्यमिक परीक्षेसाठी ८८ आणि उच्च माध्यमिक परीक्षेसाठी १२० संच मंजूर आहेत.

### स्पर्धा परीक्षेसाठी शिष्यवृत्ती

केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत निवड होणाऱ्या अखिल भारतीय सेवांमध्ये महाराष्ट्रातील अधिकाऱ्यांचे प्रमाण वाढावे, यासाठी गुणवत्ताधारित विशेष शिष्यवृत्ती योजना राबवली जाते. या शिष्यवृत्तीकरिता दिल्लीस्थित नामांकित खासगी प्रशिक्षण संस्थांपैकी शासनाने निवड केलेल्या तीन संस्थांपैकी एका संस्थेमध्ये प्रवेश घेण्याची विद्यार्थ्यांना मुभा देण्यात आली आहे. या शिष्यवृत्तीचा लाभ घेणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला, दिल्ली येथील त्याच्या प्रशिक्षणाच्या वास्तव्याच्या कालावधीसाठी दरमहा १० हजार रुपये निर्वाह भत्ता देण्यात येतो.

**विभागीय संपर्क अधिकारी**

## सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग

### माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

**उद्दिष्ट:** इ. ५ वी ते ७ वी मधील २ गुणवत्ताधारक मागासवर्गीय विद्यार्थ्यांना तसेच इ. ८ वी ते १० वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या पहिल्या दोन मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते.

**अटी व शर्ती:** ■ मागील वार्षिक परीक्षेत किमान ५० टक्के व त्याहून अधिक गुण मिळवणे आवश्यक ■ उत्पनाची अट नाही. ■ शाळेतील नियमित हजेरी, समाधानकारक प्रगती व चांगली वर्तणूक आवश्यक ■ ही शिष्यवृत्ती दरवर्षी जून ते मार्च या १० महिन्यासाठी मंजूर करण्यात येईल. (इयत्ता पाचवी ते सातवी दरमहा ५० रुपये/इयत्ता आठवी ते दहावी दरमहा १०० रुपये)

**संपर्क:** ■ संबंधित शाळेचे मुख्याध्यापक ■ जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद

### अस्वच्छ व्यवसायातील पालकांच्या मुलांना मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती

अस्वच्छ व्यवसायात काम करणारे, या व्यवसायाशी परंपरेने संबंधित सफाईगार, कातडी सोलणे व कमावणे या व्यवसायात गुंतलेल्या व्यक्तींच्या पाल्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाते.

**अटी व शर्ती:** ■ ही शिष्यवृत्ती सर्व जाती-धर्माला लागू आहे. ■ ही योजना केंद्र पुरस्कृत असून यासाठी कोणतीही उत्पन्नाची अट नाही. ■ अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींना ग्रामसेवक व सरपंच, नगरपालिका

मुख्याधिकारी महानगरपालिका आयुक्त/उपायुक्त/प्रभाग अधिकारी यांच्याकडून अस्वच्छ व्यवसाय करत असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. ■ अनुसूचित जातीमध्ये समावेश केलेल्या पालकांच्या पाल्यांसाठी जातीचा दाखला आवश्यक आहे.

**लाभाचे स्वरूप:** ■ १ ली ते २ रीच्या वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना रु. ११०/- दरमहा व तदर्थ अनुदान रु. ७५०/- ■ इ. ३ री ते १० वीचे वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ११०/- दरमहा व तदर्थ रु. ७५०/- दरमहा ■ वसतिगृहात राहणाऱ्या इ. ३ री ते १० वी दरमहा रु. ७००/- व तदर्थ अनुदान रु. १०००/-

**संपर्क :** ■ संबंधित शाळेचे मुख्याध्यापक व संबंधित जिल्ह्याचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद.

### भारत सरकारची मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती

**योजनेचा उद्देश:** अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे शाळेतील गळतीचे प्रमाण कमी व्हावे. **योजनेच्या प्रमुख अटी:** ■ शासकीय शाळेत ९ वी व १० वी मध्ये शिकत असणारे विद्यार्थी ■ उत्पन्नाची मर्यादा २ लाख रुपये.

**दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरूप :** १० महिन्यांसाठी (वसतिगृहात न राहणारे विद्यार्थी - दरमहा १५० रुपये आणि पुस्तके व तदर्थ अनुदान (वार्षिक) ७५० रुपये/वसतिगृहात राहणारे विद्यार्थी दरमहा ३५० रुपये) आणि पुस्तके व तदर्थ अनुदान (वार्षिक) १००० रुपये)

**अर्ज करण्याची पद्धत :** या योजनेसाठी https//mahaeschol.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज भरणे आवश्यक. **संपर्क :** ■ संबंधित जिल्ह्याचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद ■ समाज कल्याण अधिकारी (वर्ग-२) बृहन्मुंबई

### राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती

इयत्ता १० वी मध्ये ७५ टक्के व त्यापेक्षा जास्त गुण मिळवून इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेतलेला अनुसूचित जाती संवर्गातील विद्यार्थी आणि इयत्ता ११ वी व १२ वी मध्ये असणारे अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांसाठी ही शिष्यवृत्ती आहे. **शिष्यवृत्ती स्वरूप (१० महिन्यांसाठी):** इयत्ता ११ वी आणि १२ वी दरमहा ३०० रुपये.

या शिष्यवृत्तीसाठी https//mahaeschool.maharashtra.gov.in या संकेतस्थळवर ऑनलाइन अर्ज भरावा.

**संपर्क:** ■ संबंधित जिल्ह्याचे, साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण व महाविद्यालयाचे प्राचार्य.

### भारत सरकार शिष्यवृत्ती

**लाभाचे स्वरूप :** ■ परीक्षा शुल्क व इतर मान्य बाबींवरील शुल्क प्रदान ■ दरमहा रु. २३० व रु. ४५० या दराने निर्वाहभत्ता ■ वसतिगृहात राहून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यासाठी दरमहा रु. ३८० ते रु. १२०० निर्वाहभत्ता. **अटी व शर्ती:** ■ पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. २ लाख किंवा त्यापेक्षा कमी असावे. ■ विद्यार्थी शालांत परीक्षोत्तर व त्यापुढील शिक्षण घेत असलेला असावा आणि महाराष्ट्राचा रहिवासी असावा.

### मागासवर्गीय विद्यार्थ्यासाठी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क

शालांत परीक्षोत्तर शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना त्यांचे वय व उत्पन्न विचारात न घेता जिल्हास्तरावरील मान्यताप्राप्त संस्थांमध्ये मॅट्रिकोत्तर शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व विहित केलेले शुल्क देण्यात येते.

या योजनेसाठी https//mahaeschool.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज भरणे आवश्यक.

**संपर्क:** ■ संबंधित जिल्ह्याचे, साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण व महाविद्यालयाचे प्राचार्य.

### उच्च शिक्षण घेण्यासाठी गुणवत्ता शिष्यवृत्ती

**उद्दिष्ट:** अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील विद्यार्थ्यांना मोफत उच्च शिक्षण देण्यासाठी राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. १०० विद्यार्थ्यांना देशातील नामांकित व शासनमान्य शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी ही शिष्यवृत्ती देण्यात येते.

**अटी व शर्ती:** ■ विद्यार्थ्याच्या पालकांचे सर्व मार्गांनी वार्षिक उत्पन्न ४.५० लाख रुपयांपर्यंत असावे. ■ या योजनेसाठी महाराष्ट्र शासनाने मान्य केलेल्या संस्थेत प्रवेश मिळालेला असावा.

**लाभाचे स्वरूप:** ■ संस्थेने आकारणी केलेले शैक्षणिक शुल्क, वसतिगृह व भोजन शुल्क. ■ क्रमिक पुस्तके व शैक्षणिक साहित्य यांच्या खर्चासाठी प्रतिवर्षी १०,००० रुपये. दरवर्षी जुलै महिन्यात अर्ज मागवण्यात येतात. **संपर्क:** आयुक्त, समाज कल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे-१.


### परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

**उद्दिष्ट:** परेदशातील नामांकित विद्यापीठामध्ये ज्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर व पीएच.डी. अभ्यासक्रमाकरिता प्रवेश मिळाला आहे. अशा ५० विद्यार्थ्यांना (पीएच.डी-२४ व पदव्युत्तर-२६) शिष्यवृत्ती देण्यात येते.

**अटी व शर्ती:** ■ विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा. ■ विद्यार्थ्याचे वय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाकरिता ३५ वर्षापेक्षा जास्त नसावे व पीएच.डी अभ्यासक्रमाकरिता ४० वर्षापेक्षा जास्त नसावे. ■ विद्यार्थ्याच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ६ लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे. ■ जागतिक क्रमवारीत ३०० क्रमांकापर्यंतच्या विद्यापीठांमध्ये प्रवेश मिळालेला असावा.

**लाभाचे स्वरूप:** ■ विद्यापीठाने प्रमाणित केलेल्या शिक्षण शुल्काची पूर्ण रक्कम व इतर खर्च मंजूर करण्यात येतो. ■ विद्यार्थ्यास वार्षिक निर्वाह भत्ता - अमेरीका व इतर राष्ट्रांसाठी

१४००० अमेरिकन डॉलर तर इंग्लंडसाठी ९,००० पौंड इतका अदा करण्यात येतो. ■ विद्यार्थ्याला अमेरिका व इतर राष्ट्रांसाठी आकस्मिक खर्चासाठी १३७५ अमेरिकन डॉलर आणि इंग्लंडमध्ये १००० पौंड इतके अर्थसहाय्य देण्यात येतात. पुस्तके, अभ्यासदौरा इत्यादी खर्चाचा यात समावेश आहे. ■ विद्यार्थ्यास परदेशात जाताना व अभ्यासक्रम झाल्यानंतर परत येताना विमान प्रवासाचा खर्च (नजीकचा इकॉनॉमी वर्ग) तिकीट सादर केल्यानंतर मंजूर करण्यात येतो. जाहिरातीद्वार दरवर्षी मे महिन्यात अर्ज मागवण्यात येतात. **संपर्क :** आयुक्त, समाज कल्याण, आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.



**– विष्णु काकडे**
विभागीय संपर्क अधिकारी

■■

## आदिवासी विकास विभाग

### सुवर्णमहोत्सवी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती

अनुसूचित जमातीच्या १ ली ते १० वी मध्ये आश्रमशाळेव्यतिरिक्त शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहित करणे तसेच शैक्षणिक व इतर किरकोळ खर्च भागवण्यासाठी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती देण्यात येते. विद्यार्थ्यांना १ ली ते ४ थी पर्यंत १ हजार रुपये आणि ५ वी ते ७ वी पर्यंत दीड हजार रुपये, ८ वी ते १० पर्यंत २ हजार रुपये शिष्यवृत्ती दिली जाते.

### भारत सरकार शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती

या योजनेंतर्गत कला, विज्ञान, वाणिज्य या शाखेतील पदवीपूर्व, पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण किंवा अनुत्तीर्ण झाल्यावर मान्यताप्राप्त व्यावसायिक किंवा तांत्रिक प्रमाणपत्र, पदविका, पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती देण्यात येते. ज्या पालकांचे वार्षिक उत्पन्न अडीच लाखापेक्षा जास्त असेल अशा विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क देण्यात येते. यात विज्ञान, अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना महिन्याला १२०० रुपये आणि वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना ५५० रुपये देण्यात येते. तांत्रिक, आयुर्वेदिक, अभियांत्रिकी प्रमाणपत्र, वास्तुकला, उपयोगिताशास्त्र प्रमाणपत्र या अभ्यासक्रमांसाठी वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना महिन्याला ८२० रुपये आणि वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना ५३० रुपये, पदवीचे सामान्य अभ्यासक्रम द्वितीय वर्षापासून पुढे वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना महिन्याला ५७० रुपये, वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना महिन्याला ३०० रुपये आणि ११ वी १२ पदवीच्या प्रथम वर्षासाठी वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना महिन्याला ३८० रुपये आणि वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा २३० रुपये निर्वाह भत्ता दिला जातो.

### केंद्रीय शिष्यवृत्ती

आदिवासी वैद्यकीय व अभियांत्रिक अभ्यासक्रमातील निवासी विद्यार्थ्यांना ७४० रुपये आणि अनिवासी विद्यार्थ्यांना दरमहा ३३० रुपये दिले जातात. तांत्रिक, आयुर्वेदिक, होमिओपॅथिक इ. शास्त्र अभ्यासक्रमातील निवासी विद्यार्थ्यांसाठी ५१० रुपये व अनिवासी विद्यार्थ्यांसाठी दरमहा ३३० रुपये दिले जातात. पदवीचे सामान्य अभ्यासक्रम, अभियांत्रिकी पदविका प्रमाणपत्र वास्तुकला अभ्यासक्रमासाठी निवासी विद्यार्थ्यांसाठी ३५५ रुपये, अनिवासी विद्यार्थ्यांना १८५ रुपये एवढी रकम दिली जाते. ११ वी, १२ वी आणि पदवीच्या पहिल्या वर्षातील निवासी विद्यार्थ्यांसाठी दरमहा २३५ रुपये, अनिवासी विद्यार्थ्यांना १४० रुपये एवढा निर्वाह भत्ता देण्यात येतो.

### परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

परदेशातील उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या १० विद्यार्थ्यांना पदवी आणी पदव्युतर शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्याची योजना. शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्याच्या कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा जास्तीत जास्त ६ लाख रुपयापर्यंत ठेवली आहे. या योजनेंतर्गत एम.बी.ए, वैद्यकीय अभ्यासक्रम, बी.टेक, विज्ञान, कृषी व इतर विषयांच्या अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृती देण्यात येते.

### सैनिक शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन

सैनिकी शाळेत शिकणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न भारत सरकार शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्तीकरिता निर्धारित केलेल्या उत्पन मर्यादेत असल्यास, अशा विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा संपूर्ण खर्च सरकारतर्फे केला जातो. शालेय शिक्षण विभागाने निर्धारित केल्यानुसार वार्षिक शुल्क रुपये १५ हजार रुपये मंजूर करण्यात येते. ही योजना समाजकल्याण विभागाकडून राबवण्यात येते.

**संपर्क:** सर्व प्रकल्प कार्यालय – आदिवासी विकास विभागाचे अधिकृत **संकेतस्थळ:** tribalmaharashtra.gov.in, शिष्यवृत्ती, वसतिगृहे प्रवेश इ.करिता **संकेतस्थळ:** etribal.mahaashtra.gov.in, आश्रमशाळा व वसतिगृहातील विद्यार्थी विद्यार्थिनीकरिता टोल फ्री क्रमांक: १८००२६७००७.

**– शैलजा वाघ दांदळे**
विभागीय संपर्क अधिकारी

■■

# यशदामध्ये नागरी सेवा परीक्षेची तयारी

**डॉ. बबन जोगदंड**

केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी) या परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, यशदा, पुणे या महाराष्ट्र शासनाच्या शिखर प्रशिक्षण संस्थेमध्ये २००६ पासून डॉ. आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्रामधून आतापर्यंत अनेक विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. दरवर्षी या केंद्रामार्फत ७० विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेच्या प्रशिक्षणासाठी प्रवेश परीक्षा घेऊन प्रवेश दिला जातो. हे केंद्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) आदिवासी विकास विभाग आणि अल्पसंख्यांक विभाग व यशदा यांच्या आर्थिक साहाय्यातून चालवले जाते.

## सोयी-सुविधा

डॉ. आंबेडकर स्पर्धा परीक्षा केंद्रात निवड झालेल्या विद्यार्थ्यांसाठी मोफत निवास, अभ्यासिका, ग्रंथालय, इंटरनेट, टेस्ट सिरीज, शिकवणी, अभ्यास साहित्य आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन तसेच प्रती महिना २५००/- शिष्यवृत्ती आदी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.

## प्रवेशासाठी पात्रता

कोणत्याही विद्यापीठाची पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेले विद्यार्थी या केंद्राच्या प्रवेश परीक्षेसाठी बसू शकतात. यासाठी वयोमर्यादा २१ ते ३२ वर्षे असावी लागते. अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी पाच वर्षे तर विशेष मागासवर्गीयांसाठी तीन वर्षांची वयामध्ये शिथिलक्षमता आहे. यासाठी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा लागतो.

## प्रवेश परीक्षा

या केंद्रासाठी यूपीएससी पूर्व परीक्षेच्या धर्तीवर प्रवेश परीक्षा घेतली जाते. त्यामध्ये सामान्य अध्ययन पेपर-१ प्रश्न ५० गुण १०० हा एक पेपर असतो व सामान्य अध्ययन पेपर-२ सीसॅट प्रश्न ४० गुण १०० अशी २०० गुणांची ही परीक्षा असते. साधारणत: दोन तासाचा वेळ या परीक्षेसाठी असतो. या पूर्व परीक्षेची जाहिरात दर वर्षी साधारणत: सप्टेंबरमध्ये महाराष्ट्रातल्या काही प्रमुख वर्तमानपत्रांमध्ये व यशदा संकेतस्थळावर www.yashada.org/abeb प्रकाशित होते. पूर्व परीक्षा नोव्हेंबरमध्ये घेतली जाते. यामध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवर्गनिहाय प्रवेश दिला जातो. जे विद्यार्थी यूपीएससीची पूर्व परीक्षा उत्तीर्ण होतात, त्यांना पुढे येथे राहता येते. अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द होतो. त्यांच्या जागी बाहेरून महाराष्ट्रातील जे विद्यार्थी यूपीएससीची पूर्व परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत, त्यांना नियमानुसार मुख्य परीक्षेच्या तयारीसाठी प्रवेश दिला जातो.

## प्रवर्गनिहाय जागा

डॉ. आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात प्रवर्गनिहाय जागांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अनुसूचित जाती-३० जागा. यापैकी ६ जागा मुलींसाठी आणि १ जागा अपंगांकरिता राखीव आहे. अनुसूचित जमातीसाठी १२ जागा राखीव आहेत त्यापैकी २ जागा मुलींसाठी आहेत त्यापैकी १ जागा अपंगांकरिता राखीव आहे. व्हीजे (ए) १ जागा, एनटी (बी) १ जागा, एनटी (सी) १ जागा, एनटी (डी) १ जागा, एसबीसी-१, ओबीसी-४ यापैकी मुलींसाठी १ जागा, खुला संवर्ग-९ पैकी २ जागा मुलींसाठी राखीव व १ जागा अपंगांकरिता राखीव. अल्पसंख्याकांच्या १० जागांपैकी मुस्लीम-५ जागा. त्यापैकी १ जागा मुलींसाठी. ख्रिश्चन-१, बुद्धिस्ट-१, शीख-१, पारशी-१, जैन-१ असा जागांचा तपशील आहे.

## प्रवेश परीक्षा केंद्र

या केंद्राची प्रवेशपूर्व परीक्षा महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात ३६ केंद्रांवर घेतली जाते. ही परीक्षा वस्तुनिष्ठ स्वरूपाची असून, या परीक्षेसाठी नकारात्मक गुण पद्धती आहे. परीक्षेसाठी ३७५ रुपये एवढे शुल्क असून, ते बँकेत चलनाद्वारे स्वीकारले जाते. या परीक्षेचे अर्ज व प्रवेशपत्र ऑनलाइन पद्धतीने स्वीकारले जातात. या परीक्षेच्या संदर्भात अधिक माहितीसाठी www.yashada.org/abeb/ या संकेतस्थळावर किंवा ०२०-२५६०८२०३ या क्रमांकावर संपर्क साधावा.

**संशोधन अधिकारी, (प्रकाशन) यशदा, पुणे.**
**संपर्क : ०९८२३३३८२६६**



**राज्यातील शहरी व ग्रामीण बुद्धिमान मुलांमध्ये स्पर्धा परीक्षेविषयी ओढ निर्माण व्हावी. जास्तीत जास्त मुले केंद्रीय प्रशासकीय सेवेमध्ये दाखल व्हावीत व मराठी टक्का वाढावा या हेतून शासनाच्या वतीने इच्छुक मुलांना स्पर्धा परीक्षेसाठी मार्गदर्शन व तयारी करण्यासाठी मुंबई येथील राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्थेतून प्रशिक्षण दिले जाते. या संस्थेच्या मार्गदर्शनाखाली अनेक मुलांना प्रशासकीय सेवेमध्ये दाखल होण्याची संधी मिळाली आहे. त्यामुळे महाराष्ट्रात जनमानसात या संस्थेची ओळख निर्माण झाली आहे.**

# प्रशासकीय सेवेचा राजमार्ग

**डॉ. म.बा. भिडे**

महाराष्ट्रातील यशस्वी प्रशासकीय परंपरा उंचावण्यासाठी राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था भरीव कार्य करीत आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील अनेक विद्यार्थ्यांचा ओढा या संस्थेकडे आहे. या संस्थेतील अनेक विद्यार्थी यशस्वी झालेले आहेत.

ही संस्था छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसला लागून अगदी जवळच आहे. संस्थेच्या आवारात हिरवी गार झाडी,संस्थेची ओळख करून देणारी पांढऱ्या रंगाची उंच कमान आणि आयएएस ट्रेनिंग सेंटर त्यामुळे संस्थेबददल एक आदराची भावना निर्माण झाली आहे.

## निवड परीक्षा

संस्थेच्या प्रवेशासंबंधी व प्रशिक्षणासंबंधी जाणून घेताना मुळात राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था ही केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) नागरी सेवा परीक्षांची तयारी करण्यासाठी प्रशिक्षण व प्रशिक्षणासाठी उमेदवारांची निवड करण्यासाठी संस्थेची प्रवेश परीक्षा (सीईटी) घेतली जाते. या परीक्षेतून ज्या उमेदवारांची निवड होईल, त्या उमेदवारांना प्रवेशानंतर तयारीकरिता सेवा सुविधा पुरवण्यात येतात. त्या सेवा नि:शुल्क असतात इतकी माहिती मिळाली तरी पालकांचे व विद्यार्थ्यांचे पाय माहिती घेण्याकरिता संस्थेकडे वळतात. संस्थेतून माहिती व मार्गदर्शन मिळते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या इच्छाशक्तीला राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्थेतून एक मार्ग मिळतो. त्यातूनच विद्यार्थ्यांना त्यांच्या उद्दिष्टापर्यंत पोहोचता येते.

## संस्थेची प्रवेश पद्धती

- **शैक्षणिक पात्रता :** संस्थेत प्रवेश घेण्यासाठी उमेदवारांना प्रवेश परीक्षा द्यावी लागते. या परीक्षेकरिता उमेदवार हा मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कोणत्याही शाखेची पदवीधर असला पाहिजे. त्याला टक्केवारीची अट नसते. तसेच महाराष्ट्राचा आधिवास असला पाहिजे. तसे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.
- **वयाची अट :** (युपीएससी प्रमाणे ) खुला संवर्ग २१–३२ वर्षे, इतर मागासवर्ग २१–३५ वर्षे, अनुसुचित जाती/जमाती संवर्ग २१–३७ वर्षे यु पी एस सी परीक्षेकरिता जी वयाची अट आहे. त्यानुसार संस्थेत प्रवेशासाठी हीच वयाची अट आहे.
- वैद्यकीय शाखेचा उमेदवार असल्यास त्या उमेदवारांनी इंटर्नशीप (अधिवासिता कालावधी) पूर्ण केलेली असावी.

## प्रवेश परीक्षा व कालवधी

संस्थेच्या प्रवेश परीक्षेसाठी सीईटीची जाहिरात ही संस्थेच्या www.siac.org.in या संकेतस्थळावरून जाहिरात दिली जाते. तसेच महाराष्ट्रातील अनेक प्रसिद्ध वृत्तपत्रांमध्ये जाहिरात प्रसारित केली जाते. जाहिरातीच्या दिनांकापासून एक महिना हा अर्ज भरण्यासाठी दिला जातो. परीक्षा अर्ज हा ऑनलाइन भरावयाचा असतो.

**परीक्षा शुल्क –** उमेदवारांनी परीक्षा अर्ज भरल्यानंतर परीक्षा शुल्क ही चलनद्वारे स्टेट बँकेत भरावयाची असते. परीक्षा शुल्क भरल्यानंतरच उमेदवारांना प्रवेश पत्र संस्थेच्या संकेतस्थळावर ऑनलाइन उपलब्ध करून दिले जाते.

**परीक्षा केंद्र –** संस्थेची प्रवेश परीक्षा ही फक्त मुंबई केंद्रावर घेतली जाते. त्यामुळे मुंबई हे एकच परीक्षा केंद्र असते.

**प्रवेश परीक्षा स्वरूप –** प्रवेश परीक्षा ही वस्तूनिष्ठ पद्धतीची

असून, यूपीएससीच्या नागरी सेवा (पूर्व) परीक्षेच्या अभ्यासक्रमावर आधारित असते. ही परीक्षा सामान्य अध्ययनावर २०० गुणांची परीक्षा घेतली जाते. त्यामध्ये भाग १ सामान्य अध्ययन १०० गुण आणि भाग २ सीसॅट (CSAT–सिव्हिल सर्व्हिस ॲप्टिट्यूड टेस्ट) १०० गुण असे असते. हा Qualifying Section असल्याने या पेपरमध्ये विद्यार्थ्यांना कमीत–कमी ३३% गुण असणे आवश्यक आहे. यामध्ये qualify झाल्यानंतरच या भागातून गुणवत्तेनुसार संस्थेत प्रवेशकरिता अंतिम निवड करण्यात येते.

## प्रवेश परीक्षेचा अभ्यासक्रम

**सामान्य अध्ययन पेपर**

भाग एक : **(सामान्य अध्ययन – १०० गुण)**

- राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय महत्त्वपूर्ण चालू घडामोडी
- भारताचा इतिहास व राष्ट्रीय चळवळी
- भारत व जगाचा भूगोल (भौतिक, सामाजिक, आर्थिक)
- भारतीय राजकारण व प्रशासन (राज्यघटना, राजकीय यंत्रणा, पंचायत राज, सार्वजनिक धोरण, मानवी हक्क इ.)
- सामाजिक व आर्थिक विकास (शाश्वत विकास, दारिद्र्य, सर्वसमावेशकता, लोकसंख्या व सामाजिक क्षेत्रात घेतलेला पुढाकार)
- पर्यावरणाशी संबंधित घडामोडी व बाबी, जैव विविधता व वातावरणातील बदल (यामध्ये विशेष अभ्यासाची आवश्यकता नाही)
- सामान्य विज्ञान

भाग दोन : **(सीसॅट : सिव्हिल सर्व्हिस ॲप्टियट्युड टेस्ट – नागरी सेवा कल चाचणी – १०० गुण)**

**(या पात्रता परीक्षेत किमान ३३ टक्के गुण मिळवणे आवश्यक)**

आकलन ■ अंतरकौशल्य व संवादकौशल्य ■ तर्कशास्त्र व विश्लेषन क्षमता ■ निर्णयक्षमता व समस्या निवारण ■ सामान्य मानसिक क्षमता ■ सामान्य संख्याशास्त्र (आकडे व त्यांचे परस्पर संबंध, परिमाणांचा क्रम ई.) (काठिन्यपातळी : इयत्ता दहावीपर्यंतची), माहितीचा अर्थ लावणे (तक्ता, आलेख, ई.)

**संस्थेच्या प्रवेश परीक्षेचे व प्रशिक्षण सत्रांचे वेळापत्रक (अंदाजित)**

| परीक्षा | जाहिरात | कालावधी |
|---|---|---|
| प्रवेश परीक्षा जाहिरात | ऑगस्ट | १ महिना |
| प्रवेश परीक्षा प्रवेशपत्र | परीक्षेच्या आधी | १५ दिवस |
| प्रवेश परीक्षा | नोव्हेंबर (रविवार) | १ दिवस |
| प्रवेशासाठी निवड | डिसेंबर | १५ दिवस |
| प्रशिक्षण सत्र सुरू (पूर्व परीक्षा) | डिसेंबर/जानेवारी | जूनपर्यंत |
| प्रशिक्षण (मुख्य परीक्षा) | पूर्वपरीक्षा निकालानंतर | जुलै ते ऑक्टोबर |
| मुलाखत प्रशिक्षण | मुख्य परीक्षा निकालानंतर | १ आठवडा |

## उपयुक्त माहिती

संस्थेत प्रशिक्षणाचा कालावधी ११ महिन्याचा असून, या काळात विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या सेवा सुविधा खालीलप्रमाणे आहेत.

- **ग्रंथालय** – वाचन साहित्य सुविधा, अभ्यासिका, इंटरनेट, वाय–फाय इत्यादी.
- **वर्ग**– अभ्यासक्रमानुसार पूर्व व मुख्य परीक्षेकरिता विशेष व्याख्याने, व्हर्चुअल क्लासरुम
- **सराव पेपर** – दिल्ली येथील खासगी संस्थांचे सराव पेपर्स (शनिवार/रविवार)
- **वसतिगृह** – मुंबईबाहेरील विद्यार्थ्यांना नि:शुल्क २५ जागा राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्थेमध्ये आणि शासकीय वसतिगृह (जीसीएच) चर्चगेट, मुंबई येथे ३५ जागा असून त्याचे नियमानुसार शुल्क आकारले जाते. एकूण १० जागा (५+५) शासकीय मुलींच्या वसतिगृहामध्ये आहेत. नियम वरीलप्रमाणे आहेत.

## विद्यावेतन

संस्थेत प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना प्रत्येक महिन्याला २००० रुपये विद्यावेतन दिले जाते. त्याकरिता विद्यार्थ्यांची ८०टक्के उपस्थिती असणे आवश्यक आहे.

संस्थेत प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना कोणतेच शैक्षणिक शुल्क आकारले जात नाही. फक्त ग्रंथालय ठेव ५०० रुपये व वसतिगृहाकरिता १०० रुपये ठेव घेतले जाते. परंतु प्रशिक्षण संपल्यानंतर त्यांना ही ठेव रक्कम परत केली जाते.

अशा प्रकारे राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई मधून युपीएससीच्या नागरी सेवा परीक्षांच्या तयारीकरिता प्रशिक्षण दिले जाते. हे प्रशिक्षण नागरी सेवा पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा व मुलाखत या तिन्ही टप्प्यांकरिता प्रवेश घेऊन तयारी करता येते. या परीक्षेतूनच भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय विदेश सेवा, भारतीय पोलीस सेवा व या व्यतिरिक्त वर्ग अ व वर्ग–ब केंद्रीय सेवांचा समावेश असतो. या सेवांमध्ये जाण्याकरिता शासनाकडून अनेक उपक्रम राबवले जात आहेत.

या संस्थेशिवाय राज्य शासनाचे अमरावती, नागपूर, औरंगाबाद, कोल्हापूर आणि नाशिक येथे आयएएस पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्रे आहेत.

**संचालक, राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई.**



# मॅग्नेटिक महाराष्ट्र गुंतवणूक परिषद २०१८

मुंबईत गेल्या वर्षी झालेल्या 'मेक इन इंडिया' जागतिक परिषदेत ८ लाख कोटींचे सामंजस्य करार झाले, त्यापैकी प्रत्यक्षात ४.५ लाख कोटींची गुंतवणूक महाराष्ट्रात झाली आहे. उद्योगांना आवश्यक पायाभूत सुविधा पुरवण्यात महाराष्ट्र अग्रेसर राज्य ठरले आहे.

देशाच्या एकूण परकीय गुंतवणुकीपैकी ५० टक्के परकीय गुंतवणूक राज्यात झाली आहे. उद्योगांसाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा तसेच निर्यात आणि वित्त क्षेत्रातही राज्य आघाडीवर आहे. राज्याचा विकासदर दुहेरी आकड्यात आहे. अर्थव्यवस्थेची हीच गती कायम ठेवत येत्या ७-८ वर्षात राज्याला देशातील ट्रीलियन डॉलर अर्थव्यवस्था बनवण्याचा संकल्प महाराष्ट्र शासनाने केला आहे. त्या अनुषंगाने 'मॅग्नेटिक महाराष्ट्र गुंतवणूक परिषद २०१८'चे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देशविदेशातील गुंतवणूकदारांना मॅग्नेटिक महाराष्ट्र परिषदेत सहभागी होण्याचे आवाहन केले.

१८ ते २० फेब्रुवारी २०१८ दरम्यान मुंबईतील वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स येथे आयोजित 'मॅग्नेटिक महाराष्ट्र कन्व्हर्जन २०१८' या जागतिक गुंतवणूक परिषदेत राज्याची उद्योग क्षेत्रातील भरारी, उद्योग क्षेत्रासाठी असलेले पूरक वातावरण, औद्योगिक वृद्धीमध्ये असलेले राज्याचे योगदान व या दिशेने राज्याची असलेली तयारी दर्शवण्यात येणार आहे.

या परिषदेत सहभागी होण्यासाठी 'मॅग्नेटिक महाराष्ट्र - कन्व्हर्जन्स २०१८' या स्मार्टफोन ॲप्लिकेशन आणि परिषदेविषयीची सर्व माहिती पुरवणाऱ्या www.midcindia.org/convergence2018/registration या संकेतस्थळावर नोंदणी करता येईल. नवोदित व तरुण व्यावसायिकांना पाठिंबा देण्याच्या दृष्टीने या परिषदेत 'मॅग्नेटिक महाराष्ट्र स्टार्ट अप अंडर ३०' या स्पर्धेचेही आयोजन करण्यात येणार आहे.



**देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री

## यशस्वी दावोस दौरा

मुंबईत फेब्रुवारी महिन्यात होणाऱ्या मॅग्नेटिक महाराष्ट्र या उद्योग परिषदेसाठी जागतिक समुहात अनुकुल वातावरण तयार करण्यात दावोस येथील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक परिषदेत महाराष्ट्राला यश मिळाले आहे. अनेक आघाडीच्या संस्था- समुहांनी या परिषदेत सहभागी होण्याचे संकेत दिले आहेत.

राज्याच्या शिष्टमंडळाने मॅग्नेटिक महाराष्ट्र उपक्रमाची विविध जागतिक संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना माहिती दिली. उद्योग उभारणीसाठी राज्यात उपलब्ध असलेल्या विविध सोयी-सुविधांची माहिती देतानाच गेल्या तीन वर्षात उद्योग सुलभतेसाठी केलेल्या प्रयत्नांमुळे औद्योगिक गुंतवणुकीसाठी महाराष्ट्र हे भारतातील सर्वोत्तम केंद्र ठरल्याचे संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात आले.

महाराष्ट्र सरकारसोबत अन्नप्रक्रिया, प्लास्टिकचा पुनर्वापर आणि कचरा व्यवस्थापन या क्षेत्रात राज्य सरकारसोबत काम करण्याची तयारी कोकाकोला समुहाने दाखवली आहे. या परिषदेतील महाराष्ट्र पॅव्हिलियनमध्ये कोकाकोलाचे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जेम्स क्विन्सी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली.

भविष्यात महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ट्रिलियन डॉलर्सच्या टप्प्यावर नेण्यासाठी करावयाच्या प्रयत्नांबाबत केपीएमजी या संस्थेसोबत विचारविमर्श करण्यात आला. रोजगार निर्मिती, ऑटोमेशन आणि पुन:कौशल्य या बाबींचा यात समावेश होता.

दावोस येथे श्री. फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधला. महाराष्ट्र हे गुंतवणुकीसाठी सर्वोत्तम ठिकाण असल्याची माहिती



देताना मुख्यमंत्री म्हणाले, 'आर्थिक राजधानी म्हणून मुंबईने मागील काही वर्षांमध्ये स्वत:ला विकसित केले असून, ते आता देशाचे ग्रोथ इंजिन बनले आहे. मुंबईसह महाराष्ट्र हे गुंतवणुकीसाठी योग्य ठिकाण असल्याची माहिती देण्यासाठी 'मॅग्नेटिक महाराष्ट्र' ही जागतिक गुंतवणूक परिषद मुंबईत होणार आहे. पायाभूत सुविधा, उत्पादकता यामध्ये गुंतवणूक करण्यासह नवीन उपक्रम राबविण्यास उत्सुक आहोत. 'फिनटेक'च्या माध्यमातून रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होत आहेत. ऑग्मेन्टेड रियालिटी तंत्राने केवळ मनोरंजनाचे नव्हे तर अनेक क्षेत्रांमध्ये बदल होत आहेत. त्यावरही लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.



बीएई या अग्रगण्य संरक्षक सामग्री कंपनीचे अध्यक्ष रॉजर कार यांच्याशी चर्चा करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.

महाराष्ट्राचा विकास दर १० टक्के आहे. येत्या आठ वर्षांत १० टक्के किंवा त्याहून अधिक दर कायम राहिला तर महाराष्ट्र ट्रिलियन अर्थव्यवस्था नक्कीच होईल, त्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत.'

### संरक्षण उत्पादनांच्या निर्मितीसाठी 'बीएई' गुंतवणूक करणार

संरक्षणविषयक उत्पादनांची महाराष्ट्रात निर्मिती करण्यास 'बीएई सिस्टीम्स' ही ब्रिटीश कंपनी उत्सुक असून त्यासाठी आवश्यक असणाऱ्या प्रशिक्षणासाठी ट्रेनर हॉकची निर्मिती करण्यात येणार आहे. बीएई सिस्टीम्सचे अध्यक्ष रॉजर कार यांच्यासोबत दावोस येथे झालेल्या चर्चेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात माहिती दिली. बीएई सिस्टीम्स ही संरक्षण, सुरक्षा आणि एरोस्पेस क्षेत्रातील बहुराष्ट्रीय कंपनी आहे. या कंपनीने महाराष्ट्रात संरक्षण उत्पादनाला चालना देण्यासाठी गुंतवणूक करण्यास उत्सुकता दाखवली आहे. त्यासाठी राज्य सरकार त्यांना आवश्यक त्या सर्व सुविधा देणार आहे.

जागतिक बँकेच्या फूड अँड ग्रिकल्चर ग्लोबल प्रॅक्टिस विभागाचे वरिष्ठ संचालक जॉर्जेन व्योगेल यांनीही दावोस येथे मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. यावेळी जागतिक बँकेच्या मदतीने राज्य सरकार राबवणार असलेल्या हवामानपूरक शेतीचा प्रकल्प अर्थात नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेबाबत चर्चा झाली. या प्रकल्पासाठीच्या बहुतेक बाबींची पूर्तता केंद्र सरकारकडे करण्यात आल्याने जागतिक बँक लवकरच त्यावर निर्णय घेणार आहे.

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमने जगातील चौथ्या औद्योगिक क्रांतीसाठी स्थापन केलेल्या केंद्राचा मुंबईत विस्तार करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचे अन्नसुरक्षा विषयक विभागाचे प्रमुख सीन डी क्लिन यांनी श्री. फडणवीस यांची भेट घेतली. राज्यातील शेतकऱ्यांसाठी व्हॅल्यूचेन, शेतीसाठी तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर, नवीन संशोधनांचा उपयोग आणि सकस अन्नाची गरज अशा अनेक विषयांवर चर्चा झाली.

सार्वजनिक–खासगी भागिदारीतून व्हॅल्यूचेनला अधिक चालना देऊन राज्यातील २५ लाख शेतकऱ्यांना सहभागी करून घेण्यात येणार आहे. शेती क्षेत्रामध्ये ड्रोनचा वापर, बँकांसोबत व्यापक भागिदारी, प्रत्यक्ष पीक पद्धतीवर आधारित अर्थपुरवठा आणि सुयोग्य विम्याच्या सुविधा या विषयांवरही चर्चा झाली.

### पर्यावरणस्नेही शहरांसाठी सिमन्स आणि हिताचीचे सहकार्य

सिमन्स आणि हिताची या प्रमुख उद्योगसमुहांनी पर्यावरणस्नेही शहरांसाठी राज्य शासनासोबत काम करण्याची तयारी दर्शवली आहे. याअनुषंगाने सिमन्सच्या व्यवस्थापकीय मंडळाचे सदस्य सेड्रिक निक यांच्याशी मुख्यमंत्र्यांनी चर्चा केली. स्मार्ट शहरे निर्माण करतानाच ती अधिकाधिक पर्यावरणानुकूल करण्यासाठीच्या उपाययोजनांबाबत चर्चा झाली. अशा शहरांच्या निर्मितीसाठी एक समग्र व्यवस्था उभारण्यासाठी महाराष्ट्र शासनासोबत अधिक सहकार्य करण्यात येईल, असे आश्वासन श्री. निक यांनी यावेळी दिले.

हिताची इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक भारत कौशल यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. यावेळी सांडपाणी आणि घनकचरा व्यवस्थापनाच्या अधिक परिणामकारकतेसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाधारित काम करण्याचा मनोदय व्यक्त करतानाच महाराष्ट्रात पथदर्शी प्रकल्पाच्या दृष्टीने पुढाकार घेण्यात येईल, असे हिताचीतर्फे सांगण्यात आले. स्वित्झर्लंडच्या पर्यावरण, वाहतूक, ऊर्जा आणि संवाद विभागाच्या मंत्री श्रीमती डोरिस ल्यूथर्ड यांची मुख्यमंत्र्यांनी भेट घेतली. शहरांना प्रदूषणाच्या विळख्यातून दिलासा देण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांवर यावेळी उभय नेत्यांमध्ये चर्चा झाली.


68% 10.37 AM
सोशल मीडिया महामित्र
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन
typing...
सत्यमेव जयते
TODAY
DGIPR
सोशल मीडियामध्ये ॲक्टिव्ह आहात? 10.20 AM
हो आहे 10.22 AM
DGIPR
मग सिद्ध करा तुमची सोशल मीडियाची क्षमता 10.23 AM
काय आहे हा उपक्रम? 10.25 AM
DGIPR
सोशल मीडिया
महा
मित्र
सोशल मीडियाचा सदुपयोग करणाऱ्या प्रभावी व्यक्तींचा सन्मान करण्याचा हा उपक्रम आहे.
10.27 AM
मी का सहभागी व्हावे? 10.28 AM
DGIPR
मान्यवरांना प्रत्यक्ष भेटण्याची, सेल्फी घेण्याची
तसेच सोशल मीडियात सक्रीय मंडळींसोबत विचार व्यक्त करण्याची संधी.
10.30 AM
अजून काय असेल यात? 10.31 AM
DGIPR
मा. मुख्यमंत्र्यांच्या स्वाक्षरीने डिजिटल प्रशस्तीपत्र आणि खूप काही ... 10.32 AM
व्वा! Coool! पण सहभागी कसं व्हायचं? 10.34 AM
DGIPR
सहभागी होण्यासाठी `mahamitra´ App Download करा
Google Play
App Store
mahamitra
वेबसाइट - www.mahamitra.in
नोंदणी १ ते १८ फेब्रुवारी... 10.35 AM
DGIPR
चला, आताच नोंदणी करा आणि तुम्ही 'महामित्र' असल्याचे सिद्ध करा... 10.37 AM

# मायबोली

लाभले अम्हास भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी
धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी
एवढ्या जगात माय मानतो मराठी

आमुच्या मनामनांत दंगते मराठी
आमुच्या रगारगात रंगते मराठी
आमुच्या उराउरांत स्पंदते मराठी
आमुच्या नसानसांत नाचते मराठी

आमुच्या पिलापिलांत जन्मते मराठी
आमुच्या लहानग्यांत रांगते मराठी
आमुच्या मुलांमुलीत खेळते मराठी
आमुच्या घराघरांत वाढते मराठी

आमुच्या कुलाकुलात नांदते मराठी
येथल्या फुलाफुलांत हासते मराठी
येथल्या दिशादिशांत दाटते मराठी
येथल्या नगानगात गर्जते मराठी

येथल्या दरीदरीत हिंडते मराठी
येथल्या वनावनात गुंजते मराठी
येथल्या तरुलतात साजते मराठी
येथल्या कळीकळीत लाजते मराठी

येथल्या नभामधून वर्षते मराठी
येथल्या पिकांमधून डोलते मराठी
येथल्या नद्यांमधून डोलते मराठी
येथल्या चराचरांत राहते मराठी



सुरेश भट

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month




दिल्ली येथे झालेल्या प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक सोहळ्यावर आधारित महाराष्ट्राच्या चित्ररथाने प्रथम क्रमांक पटकावला आहे.

Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति/TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

मीनल जोगळेकर
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक मीनल जोगळेकर, वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा.लि. प्लॉट नं. ईएल /२०१, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, महापे, नवी मुंबई - ४०० ७०४ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.

मुख्य संपादक: ब्रिजेश सिंह